

मराठी अनुवाद :

श्री. अशोक कोठारे

# महाभारत



खंड ३३ : सल्यपर्व १

# महाभारत

## महाभारत खंड तेहतिसावा

## सल्य पर्व भाग पहिला

अशोक कोठारे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.

http://www.esahity.com/2309234323812351236623402381235O.html

# महाभारत


## मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.



**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**



©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचना व्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



**प्रकाशन : १० ऑक्टोबर २०२०**

## अनुवादकाचे दोन शब्द –

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याच वेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, एक शैक्षणिक माध्यम म्हणून वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना तो गद्यात केला आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये. त्या शिवाय, सामान्य वाचकांना कथाभाग अधिक चांगल्या प्रकारे समजावा म्हणून कांहीं टीपा दिल्या आहेत.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम प्राचीन (Archaic) शब्दप्रयोग वापरतात परंतु, माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत चाळीसांपेक्षां

जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्यातील हा तेहतिसावा खंड, सल्य पर्व भाग पहिला आपण आता वाचणार अहात.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्या आधीची असती तर त्याचा उल्लेख त्या काळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्या नंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, सम्राट अशोकाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका

करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे. कदाचित असें म्हणता येईल कीं, महाभारत हा एक दंतकथांचा संग्रह आहे व त्याद्वारा नैतिकमुल्ये शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राज्यांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही असे माझे मत आहे. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता, व्याध गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई–साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः

धन्यवाद.

अशोक कोठारे



माझा ई-मेल –
ashokkothare@gmail.com
ashokkothare@yahoo.co.in
ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई–पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई–साहित्य करणार आहेत परंतु, हे ई–पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

**माझे ब्लॉग –**

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/ for stories
I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy
Ideas and tips on any subject, http://kotharay.blogspot.in/ for intelligent discussions.

Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.
http://www.esahity.com/2309234323812351236623402381235O.html

# - सल्य पर्व एक (सुरू) –

## भाग पहिला

नारायणाला व नराला वंदन करून जे सर्वश्रेष्ठ पुरूष आहेत, त्यानंतर सरस्वतीला वंदन करून जय असा उच्चार करून जनमेजय बोलतो, "कर्णाचा अशाप्रकारे वध झाल्यानंतर कौरवांचे उरलेले योद्धे काय करतात? अहो ब्राह्मण, पांडवांचे मोठे सैन्य पाहून दुर्योधनाची कोणती प्रतिक्रीया झाली? मला ते सगळे सांगा. मला माझ्या पूर्वजांच्या कथा ऐकावयाला आवडते".

वैशंपायान त्यावर बोलतात, कर्णाचा वध झाल्यावर धृतराष्ट्राचा मुलगा दुर्योधन मोठ्या विचारात पडला. त्याला त्याचे दुःख आवरणे शक्य नव्हते. तो कर्णाच्या नांवांने शोक करत राहीला. मोठ्या कष्टाने तो त्याच्या तंबूकडे गेला. त्याच्या बरोबर त्याचे अजून हयात असलेले साथी सुद्धा होते, तेथे विचार विनिमय केल्यानंतर सल्याची नेमणूक पुढील लढाईसाठी सरसेनापति म्हणून होते. त्यावेळी पांडवांचे व कौरवांचे ह्यांत एक भयंकर युद्ध होते. त्याची तुलना देव आणि असुरांच्या युद्धाशी करता येणार होती. त्या युद्धात मोठा संहार युधिष्टीर करतो. ती दुपारची वेळ होती, त्या लढाईत दुर्योधनाचे उरलेले मित्रसुद्धा मारले जातात. जे जीवंत असतात ते युद्धभूमी सोडून पळून जातात. दुर्योधन स्वतः सुद्धा एका मोठ्या सरोवराच्या आत लपून बसतो. त्या सरोवराच्या भोवती भिमसेन पहारा टाकतो अशासाठी कीं, तो दुर्योधनाला शोधून काढू शकेल. तो दुर्योधनाला हांका मारू लागतो. म्हणजे त्याचा वध पटकन करता येईल. त्याला तो भिम मोठ्या शिताफीने त्या पाण्यातून बाहेर काढतो. त्याचा वध करतो. दुर्योधनाच्या वधानंतर कुरु सैन्याचे तीन योद्धे, कृप, अश्वत्थामा आणि कृतवर्मन त्यांना फार क्रोध होतो. ते पांचालांच्या फौजांचा नाश करण्याचा सपाटा लावतात. सबंध रात्रभर ते तो संहार करत होते. दुसर्या दिवशी संजय त्या युद्धभूमीच्या भागातून निघून हस्तिनापुरी येतो. त्याला दुःख आवरत नसते. तो मोठ्याने रडू लागतो. तो राजाला सांगतो, "अहो राजे, घात झाला, तुमचे सैन्य हरले आहे व त्यात तुमचा मुलगा दुर्योधन कामी आला आहे. काळ सर्वशक्तीमान आहे. तो सगळे घडवत असतो. तुमचे सगळे बलाढ्य योद्धे पांडवांनी ठार मारले आहेत. आपण आता राजे राहिले नाहीत. संजयाला दुःखी अवस्थेत परत आलेले पाहून राजाचे लोक चिंतीत

होतात. ते सगळे शोकसागरात बुडतात. तो संजय धृतराष्ट्राच्या महालात जातो. तो पहातो कीं, त्याचा राजा त्याच्या सुनांच्या घेरात त्याच्या आसनावर बसला आहे. त्याच्या एका बाजूस गांधारी व दुसर्या बाजूस विदूर होते. त्याशिवाय इतर मित्र व नातेवाईक सुद्धा तेथे हजर होते. त्यांना समजलेले असते कीं, त्यांचा मुख्य योद्धा व त्यांचा दुर्योधन दोघेही मारले गेले आहेत. संजय ते वृत्त पुन्हा त्या सगळ्यांना रडत रडत सांगतो. अश्रूनी भरलेल्या डोळ्यानी तो सांगतो, "मी संजय तुमचा सेवक, तुम्हा सर्वांना नमस्कार करतो. तो सांगतो सल्य मद्र देशाचा राजासुद्धा मारला गेला आहे. त्याच प्रमाणे शकूनी, उलूक आता राहीलेले नाहीत. सगळे संसप्तक नष्ट झाले आहेत. सगळे आपल्या बाजूचे कंबोज, शक, म्लेच्छ, पहाडी लोक, यवन सगळे पांडवांनी मारले आहेत. पूर्वेकडील, दक्षिणी, उत्तरकडील व पश्चिमेकडील सुद्धा मारले गेले आहेत. राजा दुर्योधनसुद्धा ठार मारला गेला आहे. पंडुच्या मुलांनी त्या सगळ्याचा संहार केला आहे. दुर्योधनाचा मृत्यू कसा झाला ते तो सांगतो, त्याची मांडी मोडली जसे भिमाने सभेत त्याला आव्हान दिले होते तसेंच तो भिम त्याला ठार मारतो. आता तो मातीत पसरला आहे. त्याचे सगळे अंग रक्ताने माखलेले आहे. पांडवांतील धृष्टद्युम्न मेला आहे. त्याप्रमाणे शिखडी, उत्तमौजस, युधमन्यू, प्रभाद्रक, हे सुद्धा कामी आले आहेत. पांचालांचे व छेड्डींचे सगळे मारले गेले आहेत. द्रौपदीची सगळी मुलं मारली गेली आहेत ते अश्वत्थामाने केले. कर्णाचा मुलगा वृषसेन मारला गेला आहे. जे युद्धात सामील झाले होते ते सगळे ठार झाले आहेत. सगळे रथी, महारथी नष्ट झाले आहेत. फार थोडे हयात आहेत. पांडव आणि कौरव युद्धामुळें सगळे जग स्तिमित झाले आहे. आता फक्त त्यांच्या बायका राहील्या आहेत व लहान मुलं आहेत. पांडवांपैकी फक्त सात जण उरले आहेत. सगळे हत्ती दोनही बाजूंचे, घोडे मारले गेले आहेत. पांडवांपैकी पांच पांडव, कृष्ण व सत्यकी जीवंत आहेत. कौरवांपैकी कृप, कृतवर्मन आणि अश्वत्थामा हयात आहेत. तुमचे अक्षौहिणी सैन्य मारले गेले आहे. दुर्योधनाचे पांडवांसाठी असलेले वैर सगळ्या क्षत्रिय कुळाचा नाश करून राहीले आहे. असें म्हणू कीं, काळांने त्याना खाल्ले आहे.

वैशंपायन पुढे सांगतात, संजयाचे ते ऐकून धृतराष्ट्र राजा बेशुद्ध होऊन खाली पडतो. त्याला पडलले पाहून विदूरसुद्धा खाली कोसळतो. सगळ्या कौरव सुना बेभान होतात. दुःखाने त्या विव्हळत होत्या. थोड्या समयानंतर ते अंध राजा शुद्धीवर येतो. त्याला त्याचे सगळे मुलगे मेले ते समजलेले असते. त्याचा श्वास वाढलेला होता. तो इकडे तिकडे त्याचे डोके हलवत असतो. त्यानंतर तो विदूराला हांक मारतो. "अरे क्षत्री, तू कोठे आहेस", म्हणून विचारत असतो, "अरे तूंच आता आमचा आधार आहेस रे. आता मी राजा राहिलो नाही रे. मी माझ्या मुलांशिवाय पोरका झालो आहे". असे बरळत असतो. ते बोलल्या नंतर तो पुन्हा बोहोष होतो. त्याचे आप्त त्याच्या चेहर्यावर पाणी शिंपतात. त्याला वारा घालतात. शुद्धीवर आल्यानंतर तो राजा कांहीं न बोलता गप्प बसून असतो. त्याचा श्वास जोराने होत होता. त्यांच्या घरातील बायकांची तिच गत होती. बराच वेळानंतर राजा धृतराष्ट्र विदूराला बोलतो, "अरे क्षत्री माझे मन फारच अस्वस्थ झाले आहे". त्याचे सगळे अंग थरथरत होते. तो सगळ्या बायकांना त्यांच्या दालनात जाण्याची आज्ञा करतो. सगळ्या मित्राना रजा देतो. संजय दुःखपूर्ण नजरेने त्याच्या राजाकडे पहात असतो. राजा सारखा रडत होता. त्याचे अश्रू थांबत नव्हते. विदूर त्याला शांत करण्याचा प्रयत्न करत होता.

सल्य पर्व भाग पहिला संपला.

# सल्य पर्व
## भाग दुसरा

वैशंपायन पुढे सांगतात, बायकांना त्याच्या राणीवसात धाडल्यानंतर धृतराष्ट्र म्हणजे अंबिकेचा पुत्र, अत्यंत दुःखात, जसे दुःख त्याला त्या आधी कधी झाले नव्हते, त्या शोकाकूल अवस्थेत बोलू लागतो. त्याचा उच्श्वास वाफेसारखा दिसत होता. तू सांगतोस कीं, पांडव सगळे जीवंत आहेत. त्यांना कोणताही त्रास झालेला नाही. खरोखर माझे हृदय दगडाचे असावे कारण ते अजून तुटलेले नाही. कारण त्या युद्धात माझी सगळी मुलं मारली गेली आहेत. त्याची वयं पहाता व त्यांचा उत्साह पहाता हे त्यांचे मरण्याचे वय नव्हते. परंतु, चुकीच्या निर्णयामुळे ते मारले गेले. माझ्या अंधत्वामुळें मी त्यांना कधी पाहू शकलो नाही. तरी मी ऐकत होतो कीं, ते फार सुंदर होते. तरी मी त्यांच्यावर खूप प्रेम केले होते. ते मोठे होत आहेत ह्या वार्तेने मला फार आनंद होत असे. त्यांच्या करामतीं बद्दल मला समजत असे. त्याचे मला कौतुक होते. मला समजते कीं, ते सगळे भिमाने मारून टाकले आहेत. त्या वार्तेने मी हवालदील झालो आहे. त्या दुःखात तो त्याच्या मेलेल्या मुलाला, दुर्योधनाला हांका मारत असतो वेड्यासारखा. "अरे दुर्योधना ये माझ्या जवळ ये". माझ्या मनाची शांती कायमची संपली आहे. माझी काय अवस्था झाली आहे ती पहा. तू तुझ्या सगळ्या दोस्त राजांबरोबर रणांगणाच्या मातीत झोपला आहेस. तेथे हिंस्र श्वापद तुझ्या देहाचे काय करत असतील ते माहीत नाही. तू तुझ्या मित्रांचा रक्षणकर्ता आता त्यांचे संरक्षण कोण करणार? मला आंधळ्याला सोडून तू कसा गेलास, तू अजिंक्य असलेला पांडवांकडून कसा मारला गेलास. माझ्याशी आदरपूर्वक आता कोण बोलणार? मला बाबा, बाबा म्हणून कोण हांकां मारणार? अरे बाळा, तू पुन्हा मला तशा हांका केव्हां मारणार"? हि पृथ्वी जितकी तुझी तितकीच पार्थांची सुद्धा आहे. तरी तू समजत होतास कीं, भागादत्त, कृप, सल्य, अवंतीचे दोन राजपुत्र, जयद्रथ, भुरिश्रव, साल, सोमदत्त, वल्हीक, अश्वत्थामा, भोज, मगध, वृहद्बल, कशीस, कर्ण, शकूनी, शक, म्लेच्छ, कंबोज, यवन, त्रिगर्त, आजोबा, द्रोण, श्रृतायूष, अयुतयुश, जलासंध, श्रृष्यशूंग, राक्षस अलायू, अलमवशू, महारथी सुवाहू आणि इतर असे सगळे पांडवांचे पारिपत्य

करण्यासाठी तयार आहेत. त्यांच्या मदतीने तू युद्ध सुरू केलेस, तू पार्थांचा नाश करण्याचा प्रयत्न केलास. परंतु, जे घडले ते तुझ्या मनाप्रमाणे घडले नाही. त्या उलट पार्थांचे पांचाल, श्रींजय, छेड्डी, कुंत्तीभोज , राक्षस घटोत्कच, सत्यकी आणि पांडव आणि त्यांचे मित्र स्वतः तुझ्या दोस्तांशी लढले व त्यात तुझे सगळे दोस्त व भावंड मारली गेली. भाग्य तुझ्या बाजूचे नव्हते. भिष्म शिखंडीच्या हातून मारले गेले जसे कोल्ह्याकडून सिंह मारला जावा तसें ते होते. तसेंच कांहींसे घडले जेव्हां द्रोण धृष्टद्युम्नाकडून मारले गेले. त्याला दुर्भाग्य नाही म्हणावयाचे तर काय? इतर महारथी जसे भुरिश्रव, सोमदत्त, वल्हीक, भागादत्त मरतात ह्याचा अर्थ काय समजावयाचा? जयद्रथ, सुदाक्षिण, जलासंध, श्रृतायूष, अयुतायूश मेले त्याचा बोध होत नाही. कारण असें योद्धे त्या प्रकारे मरत नाहीत ज्या प्रकारे ते मेले आहेत. त्यांच्या कर्तृत्वाच्या हिशोबाने पहाता ते त्या प्रकारे मरणे केवळ अशक्य आहे. परंतु, नशीब फिरल्यावर कांहींही होऊ शकते. ते अनेक संसप्तक ज्याना मारणे केवळ अशक्य समजले जात होते ते कसे मेले ते पाहिलेस कीं एक गोष्ट स्पष्ट होते कीं, ते युद्ध साधारण नव्हते. त्या मागे कोणीतरी मोठी शक्ती कार्यरत होती. म्हणून त्याला नशीबाचा डाव असेंच मानले पाहिजे. सगळ्या देशातील क्षत्रिय आले व मारले गेले ह्याचा अर्थ काय, दैवगती नाही म्हणावयाची तर दुसरे काय? माझे नशीब फुटले आहे. माझे मित्र, आप्त सगळे ह्या युद्धात मारले गेले आहेत. माझे सगळे नातेवाईक आता मेलेले आहेत. संजया, मी आता म्हातारा झालो आहे. मला वनवासात जाण्याशिवाय दुसरा पर्याय दिसत नाही. नाहीतर माझ्या शत्रूंच्या राज्यात मला रहावे लागणार आहे. अरे संजया, माझे दुर्योधन, सल्य, दुःशासन, विविंगसती, विकर्ण मारले गेले असल्याने मी असा बेसहारा त्या भिमाच्या डरकाळ्या कशा सहन करत बसू. त्यांने माझे सगळे पुत्र ठार मारले आहेत, त्याची मला भिती वाटते. तो पुनः पुन्हा आम्हाला टोचून बोलून जीवे मारणार आहे. ते क्रुर बोलणे मी कसे सहन करू"?

वैशंपायन पुढे सांगतात, दुःखाने जळत असलेला तो राजा त्याच्या मृत नातेवाईकांची, मित्राची सारखी आठवण काढत होता. तो सारखा रडत होता. त्याचे अश्रू थांबत

नव्हते. त्याच्या मुलांचा पराजय त्याच्या वर्मी लागला होता. तो त्याच्या सारथ्याला संजयाला बोलतो, "संजया मला पुन्हा त्या लढाईचा वृत्तांत सांग.
धृतराष्ट्र त्याला विचारतो, भिष्म, द्रोण व कर्ण मारले गेल्यानंतर माझ्या मुलांना कोणाला सरसेनापती केले"? ते पांडव माझ्या सरसेनापतीचा वध करत आले आहेत. त्या सगळ्यांना अर्जुनाने मारले आहे जरी तसे सकृत्दर्शनी वाटत नसले. फार पूर्वीच मला विदूराने सांगितले होते परंतु, मी त्याचे न ऐकता माझ्या लाडक्या मुलांचे ऐकत होतो. दुर्योधनाच्या महत्वाकांक्षेचे मला कौतुक होते. विदूराने मला सांगितले होते कीं, कांही मूर्खाना त्यांच्या डोळ्यासमोरचे संकट दिसत नाही. माझे तसेंच झाले होते. माझ्या मुलाची कुवत मी समजून त्याला वेळीच आवरले असते तर हे झाले नसते. त्याचे मी ऐकले नाही उलट त्याला दोष देत गेलो. आता मला सांग गवळगणा, कर्णानंतर कोण सरसेनापती झाला माझ्या सैन्याचा, ते मला सांग. तो कोणता योद्धा होता जो अर्जुन व कृष्णांच्या रथामागे गेला. सल्याच्या डाव्या बाजूचे चाक कोण सांभाळत होता. कोण उजव्या बाजूचे संरक्षण करत होते. कोण मागे होते. कोण पुढे होते ते सगळे मला सांग. तुम्ही सगळे त्यांचे सरक्षण करत असतांना पांडव त्याला कसे मारू शकले ते सांग. मला सांग अरे संजया, माझा मुलगा दुर्योधन कसा मारला गेला. पांडवांचे महारथी पांचालांतील धृष्टद्युम्न, द्रौपदीचा पांच मुलं, शिखंडी कसे मारले गेले व कोणी मारले. जे जीवंत राहीले ते पांडवांचे पांच व कृष्ण आणि सत्यकी व कौरवांचे कृप, कृतवर्मन आणि अश्वत्थामा कसे राहिले. मला ते सगळे ऐकावयाचे आहे. ते युद्ध कसे रंग बदलत गेले तेसुद्धा सांग, तुझे सांगणे मला फार आवडते.
सल्य पर्व भाग दोन संपला.

# सल्य पर्व
## भाग तिसरा

संजय पुढे सांगतो, ऐका महाराज, ते सगळे मी आता सांगतो. त्या महासंहाराची कथा नीटपणे लक्ष देऊन ऐका. कर्णाचा वध झाला व आपले सैन्य उध्वस्त झाले होते, त्यांचा संहार होत होता, पांडव विजयाच्या घोषणा करत होते मोठ्या मोठ्याने. त्यावेळी दुर्योधनाच्या पोटात भितीचा गोळा उठला होता. त्याची अशी परिस्थिती होती जशी भर समुद्रात बुडणार्या जहाजाच्या कप्तानाची होते. त्या संध्याकाळी ते निराशेच्या मनस्थितीत त्यांच्या तंबूकडे जात होते. त्याचे वस्त्रं, चिलखतं अस्ताव्यस्त होती. कोणाचे कोठेही लक्ष नव्हते. आपले सैनिक रणांगणातून पळून जात होते. त्यांच्या मागे विभत्सू अथवा वृकोदर लागला आहे असे त्यांना वाटत होते. पळत असतांना त्यांचे जास्त नुकसान होत होते. त्याचे सैन्य अशाप्रकारे पळत आहे ते हताशपणे दुर्योधन पहात होता. तो त्याच्या सरथ्याला बोलतो, "जर मी माझे धनुष्य घेऊन माझ्या फौजांच्या मागे राहीलो तर पार्थ माझे कांहीं वाकडे करू शकणार नाही. आपला रथ वेगांने पुढे ने. धनंजय आणि इतर पांडव माझे कांहीं वाकडे करू शकणार नाहीत. आज धनंजय, कृष्ण व भिम ह्यांचा वध मी स्वताच करणार आहे. तसे करून मी कर्णाच्या ऋणातून मुक्त होईन. ते ऐकल्यावर दुर्योधनाचा सारथी त्याच्या घोड्यांना पुढे जाण्याचे आदेश देतो. त्यावेळी कौरवांचे सैन्य त्यांचे घोडे, हत्ती, रथ गेलेले असे रणांगणातून चालत बाहेर पडत होते त्यांना वेढून त्यांच्यावर भिम, धृष्टद्युम्न हल्ला करतात. त्यांना मारून टाकतात. भिम त्याच्या रथातून उतरतो व गदा घेऊन त्या चालणार्या योद्ध्यांवर मारा करतो. ते पाहून पळणारे योद्धे उलट वार करतात व तेसुद्धा भिमाकडून मारले जातात. भिम एकटा पंचविस हजार सैनिक मारून टाकतो. त्याला मदत करण्यासाठी सत्यकी, नकूल व सहदेव सामील होतात. ते शकूनीच्या फौजांवर हल्ला करतात. शकूनीच्या सैनिकांचा नाश केल्यावर ते शकूनीवर हल्ला करतात. अर्जुन कौरवांच्या फौजांत शिरतो व त्यांचे शिरकांड करतो.

अर्जुनाचा रथ येत आहे ते पाहून ते आपले सैनिक पळू लागतात. त्यांना भिम व अर्जुन वेढा घालून अडवतात व त्यांचा संहार करतात. मोठे तुंबल युद्ध त्यावेळी होते. पांचालांचा धृष्टद्युम्न शत्रूंचा संहार करत होता. त्याचा रथ येतांना पहाताच कौरवांचे सैनिक रणांगणातून पळून जात होते. माद्रीची दोनही मुलं गांधारांच्या मागे लागली होती. चेकीतन आणि द्रौपदीची मुलं कौरवांच्या सैन्याचा नाश केल्यानंतर त्यांचे शंखू वाजवतात. त्या युद्धात धूळ इतकी उडत होती कीं, कांहीं दिसत नव्हते. त्यावेळी सव्यसाची तेथे अवतरला. तुमचे सैन्य अशारितीने पळाल्यामुळें दुर्योधन तेथे आला पांडवांशी लढण्यासाठी. पांडवांचे सैन्य त्याच्यावर चालून गेले. दुर्योधन मात्र त्यांच्याशी चांगला मुकाबला करतो. सगळे पांडव त्यास अडकवू शकत नाहीत. परंतु, तो पहात असतो कीं, त्याचे सैन्य उध्वस्त झाले आहे. अतिशय वाईट परिस्थितीत ते पळून जात होते. त्याच्या मनात विचार येतात कीं, अशा युद्धात काय अर्थ आहे. पांडवांचे सैन्यसुद्धा फार कमी झालेले होते. तो त्याच्या योद्ध्याना सांगतो कीं, अर्जुन व कृष्ण दोघेही फारच जखमी झाले आहेत. अशा परिस्थितीत आपल्याला यश मिळवणे सोपे होईल. त्यासाठी युद्धात मरणे जास्त श्रेयस्कर होईल. क्षत्रियांसाठी तो खरा मार्ग आहे स्वर्गात जाण्याचा. त्या करता रागावलेल्या भिमाला तोंड देण्याची तयारी ठेवा. तो त्याच्या पळणार्या सैनिकांना सांगतो कीं, युद्धातून पळून जाणे क्षत्रियांसाठी सर्वात जास्त पापकारक असते. ते तो सांगत असतांना तो पहात असतो कीं, त्याचे सैनिक पळणे थांबवत नाहीत. त्यानंतर पुन्हा मोठे युद्ध सुरू होते. दुर्योधन युधिष्ठीरावर चालून जातो.

सल्य पर्व भाग तिसरा संपला.

# सल्य पर्व

## भाग चौथा

संजय पुढे सांगतो, सारथी नसलेले रथ, माहूत नसलेले हत्ती आणि पाय दलातील मेलेले सैनिक अशामुळे के रणांगण रुद्राचे क्षेत्र वाटत होते. तुमच्या वीरांना समजत नव्हते ह्यापुढे काय करावे. कौरवांच्या सैनिकांचे होणारे हाल पाहून कृप जे मोठे ज्ञानी आहेत व सूज्ञसुद्धा ते दुर्योधनाला बोलतात, "अरे दुर्योधना, मी जे सांगतो तसे जर तू केलेस तर सगळ्यांचे भले होईल. एका क्षत्रियाला त्याचे कर्तव्य करणे क्रमप्राप्त असते. त्याला लढतांना तो कोणाशी लढतो ते महत्वाचे नसते. तशा लढाईत मोठे श्रेय असते. जर तो मेला तर त्याला स्वर्ग मिळतो. परंतु, ते कर्तव्य मोठे त्रासदायकसुद्धा आहे. ते पहाता मी तुला कांही हिताच्या गोष्टी सांगणार आहे. भिष्म, द्रोण व कर्णांच्या वधानंतर तसेंच जयद्रथाच्या व तुझ्या भावंडांच्या व तुझ्या मुलाच्या मृत्यूनंतर तू कशासाठी लढणार आहेस त्याचा विचार तू केला पाहिजेस. ज्यांच्यासाठी तू लढत होतास ते सगळे मेले आहेत मग हे युद्ध कां करण्याचा तुझा हट्ट चालू आहे? त्या सगळ्या मित्र व आप्तांच्या शिवाय आपले जीवन निरर्थक झाले आहे. त्यात अनेक मित्र राजे तुझ्यामुळे विनाकारण मेले आहेत. क्षणोक्षणी तो कपीमुद्रा असलेला रथ जास्त भयंकर होत आहे. अर्जुनाला मारणे केवळ अशक्य आहे हे तुझ्या कसे लक्षात येत नाही"? तेंच कृष्णाबाबत आहे. कारण ते दोघे साक्षात देव आहेत. अर्जुन व भिमांनी तुझ्या अक्षौहिणी सैन्याचा नाश केला आहे ते दिसत आहे. आज युद्धाचा सतरावा दिवस आहे. आपले सैन्य सुद्धा कमी झाले आहे. त्यांना नेता उरलेला नाही. त्या विरुद्ध पांडवांचे सगळे आहेत व त्यांच्या सैन्याला चांगले नेता आहेत. नेता असलेले सैन्य नेता नसलेल्या सैन्याचा नाश सहजपणे करते हे तुला माहीत आहे. पांडवांशी पूर्वी तू अनेक चुकीच्या गोष्टी केल्या आहेस. त्याची कटू फळ आपण भोगत आहोत. तुझ्या एकट्याच्या हट्टासाठी हे सगळे मेले आहेत, त्यात तुझे भाऊसुद्धा आहेत. हे कितपत योग्य आहे ते समजत नाही. राजकारणाच्या नितीनुसार जो कमजोर आहे तो शांततेची बोलणी करत असतो. ज्याच्या कडे ताकद आहे तो युद्धाच्या गोष्टी करतो. ते पहाता आता वेळ आली आहे

कीं,  आपण पांडवांशी शांततेच्या गोष्टी करण्यास सुरूवात केली पाहिजे.  असे बृहस्पतीने सांगितले आहे.  जो त्याविरुद्ध वागतो त्याला कधी यश येत नाही.  युधिष्ठीर चांगला आहे.  समजूतदार आहे.  त्यांच्या बरोबर कृष्ण आहे त्यामुळें शांततेच्या गोष्टी करणे सोपे आहे.  त्याना सांभाळलेस तर अर्जुन व भिम आवरणे अशक्य नाही.  कारण ते त्यांच्या मोठ्या भावाच्या आज्ञेत आहेत.  हे लक्षात घेता ही योग्य वेळ आहे शांतता स्थापन करण्यासाठी".  कृप वृद्ध ब्राह्मण ते सगळे रडत रडत बोलत होते.  ते जोराने श्वास घेत होते.  त्यानंतर तो त्यांचा गुरू अतिदुःखाने बेभान झाले व कोसळले.
सल्य पर्व भाग चौथा संपला.

# सल्य पर्व

## भाग पांचवा

संजय पुढे सांगतो, कृपांच्या त्या सविस्तर मार्गदर्शनानंतर दुर्योधन दीर्घ श्वास घेत विचार करू लागतो. तो बराच काळ गप्प असतो. त्यानंतर तो कौरव कृपांना बोलतो, "जे कोणी हितचिंतक सांगेल तेंच आपण मला सांगत अहात. आपण माझ्यासाठी ह्या युद्धात सर्वकांहीं प्रामाणिकपणे केले आहे त्याचीसुद्धा मला जाणीव आहे. तरी मला तुमचा सल्ला माझ्या विशिष्ट प्रवृत्तीमुळें रुचत नाही. अहो ब्राह्मणा, तुमचे विचार चांगले आहेत ह्याबद्दल मला शंका नाही तरी ते मला मान्य नाहीत. कारण, माझा प्रश्न असा आहे कीं, आजवर आम्ही त्याना फसवलेले आहे अशा स्थितीत ते पंडुचे मुलगे आता माझ्या आश्वासनावर कसे विश्वास ठेवतील"? "ज्याची विश्वासार्हता संपुष्टात आली आहे त्याने दुसर्याला सांगावे कीं, ते माझ्यावर विश्वास ठेवतील हे कसे शक्य आहे. मी कृष्णालासुद्धा दगा दिला आहे जो त्यांचा मार्गदर्शक आहे, अशा प्रसंगी कांहीं अपेक्षा करणे कीं, ते माझ्या शब्दावर भरवसा करतील तर ते मला पटत नाही. त्याशिवाय द्रौपदी आम्ही कोणालाही कधीच माफ करणार नाही कारण दुखवलेली स्त्री कधीच माफ करत नाही. त्यांचे राज्य आम्ही कशाप्रकारे त्याच्या कडून काढून घेतले ते आपण जाणता तेव्हां त्यांच्या कडून आपला शांतता प्रस्ताव मान्य होईल असे मला वाटत नाही. मी असे ऐकले आहे कीं, त्या दोन कृष्णाचे हृदय एकच आहे. मला सांगा, कृष्ण माझ्या शांतता प्रस्तावाला मान्यता देईल"? "आमच्या लोकांनी त्यांच्या अभिमन्यूला कसे दगा करून मारले ते त्यांना ठाऊक असतांना ते आम्हाला माफ करतील हे असंभव आहे. कोठल्या तोंडाने मी त्यांच्याकडे क्षमेची भिक मांगू? भिम क्षमाशून्य आहे आमच्या कौरवांच्या बाबत. हे तुम्ही जाणता मग असा प्रस्ताव आपण कसा आणता? तो भयंकर प्रतिज्ञा घेऊन बसला आहे, त्यापासून त्याला परावृत्त करणे कोणालाही जमणार नाही. धृष्टद्युम्न व शिखंडी माझ्याशी वैरासारखे लढत होते ते एकदम मित्र कसें होतील? पांडवांशी आम्ही खरोखरच फार वाईट प्रकारे वागलो आहोत. ते त्यांनी विसरावे असे समजणे कितपत योग्य होईल हा प्रश्नच आहे. द्रौपदीने आम्हा कौरवांच्या नाशासाठी

प्रदीर्घ तपस्या केली आहे ती कशी मी विसरेन. जोवर आमचा नाश होत नाही, तोवर द्रौपदी बिछान्या शिवाय केवळ जमिनीवर झोपण्याचे व्रत घेऊन बसली आहे. ते कसे पांडव विसरतील"? कृष्णाची बहिण सुभद्रा द्रौपदीचा मैत्रीण आहे त्या मला कधीच माफ करणार नाहीत. अशा परिस्थितीत आपण ज्या शांतता कराराचा उल्लेख करत अहात तो शक्य होणार नाही. म्हणून आता शेवटपर्यंत लढत रहाणे हा एकच मार्ग मला दिसत आहे. पांडव आणि कौरवांतील हा द्वेषाग्नी विझणारा नाही. आमच्या मृत्यूनेच तो विझेल हे स्पष्ट दिसत आहे. त्यांच्या ताब्यात जाणे मला शक्य नाही. हे तुम्ही समजू शकता. त्यापेक्षा वीरमरण मी पसंत करणार आहे. एकेकाळी सम्राट म्हणून राहिलेला मी, युधिष्ठीराचा सेवक म्हणून राहू शकणार नाही. त्यापेक्षा मृत्यू लढत मिळाला तर स्वर्गप्राप्ती करून व निघून जाईन ते माझ्या सारख्या मानी क्षत्रियांस शोभेल. मी आयुष्यात जे भोगावयाचे ते सगळे भोगून झाले आहे. मी ब्राह्मणांना यज्ञात दानं केली आहेत. असंख्यांचे दुःख एक राजा म्हणून मी निवारले आहे. माझ्यावर प्रेम करणारे सुद्धा पुष्कळ आहेत. आणखीन काय पाहिजे एका राजाला"? माझ्या जीवनात मी **कर्तव्य, हित व सुख ही सगळी प्रापंचिकांची ब्रीदं सांभाळली आहेत**. माझ्या पितरांचे श्राद्ध केले आहे. म्हणून आता मी चांगले युद्ध करत मरणेंच योग्य समजतो. आपण जाणता कीं, एक सच्चा क्षत्रिय युद्धातून माघार घेत नाही तो मरण स्वीकारतो तेव्हां ते मी करणार आहे. पांडवांनी मला मारावे हांच माझा उद्देश आहे. त्यांच्यापुढे हात जोडून बसणे मला शोभणार नाही. तसे लढत मेलो तर स्वर्गातील अप्सरा माझे कौतुक करतील, मला माझ्या आजोबांसारखे मानाने स्वर्गात जावयाचे आहे. माझ्या शब्दाखातर जयद्रथ, कर्ण, दुःशासन लढले व स्वर्गात गेले व मी जर माफी मागत बसलो तर ते मला काय म्हणतील? त्या प्रमाणे अनेक दोस्त राजे सुद्धा गेले लढत लढत ते काय समजतील मला? म्हणून त्यांच्या प्रमाणे मरणेच मला श्रेयस्कर वाटते. ह्यापुढे मी व माझे सवंगडी जिंकण्यासाठी नाही तर वीरमरणासाठी लढणार आहोत". ते दुर्योधनांचे ऐकल्यावर तेथे असलले समस्त राजे त्याच्या विचारांचे कौतुक करतात. ते सगळे, "अति उत्तम, अति उत्तम", असे त्याची प्रशंसा करतात. त्या दुर्योधनाच्या भाषणानंतर त्या राजांचा लढण्याचा उद्देश कायम होतो. आता लढत लढत मरावयाचे असा ते निर्धार करतात.

आता त्या लढण्यात वेगळा जोश होता, कारण ते जिंकण्यासाठी नाही तर मरण्यासाठी लढणार होते. त्यानंतर ते राजे सरस्वती नदीच्या लाल पाण्यात स्नान करतात आणि युद्धासाठी तयार होतात.

सल्य पर्व भाग पांच संपले.

# सल्य पर्व

## भाग सहावा

संजय पुढे सांगतो, त्या हिमालयातील पठाराच्या प्रसन्न वातावरण असलेल्या प्रदेशात कौरवांचे उरलेले महायोद्धे ज्यात सल्य, चित्रसेन, शकूनी, अश्वत्थामा, कृप, कृतवर्मन, सुशेना, अरिष्ठसेना, धृत्यसेना, जयत्सेना असे सगळे त्या रात्री विश्रांती घेत असतात. कोणालाही शांतता नव्हती. त्यात दुर्योधनाचे जास्त वैफल्यग्रस्त मन त्याला सतावत होते. तो युद्ध जिंकण्याचा शेवटचा प्रयत्न होणार होता. कर्णाच्या मृत्यूनंतर ती रात्र होती. ते युद्ध जिंकण्याचा निर्धार केलेले ते राजे दुर्योधनाला सल्यापुढे वचन देतात, कीं, त्यांच्यापैकी कोणाला तरी त्याने सरसेनापती करावे म्हणजे त्याच्या नेतृत्वाखाली ते लढतील व पांडवांचा पराभव करतील. त्या नेमणूकीमुळें काम करणे सोपे होणार आहे असे त्यांचे मत असते. त्यासाठी दुर्योधन स्पष्टपणे सांगील कोण सरसेनापती होणार व त्याच्या नेतृत्वाखाली ते लढणार. दुर्योधन त्याच्या रथातच बसून अश्वत्थामाला बोलतो, "अहो आमच्या गुरूच्या मुला, तू आमचा सर्वश्रेष्ठ आधार आहेस अशा प्रसंगी. तू तुझ्या सूज्ञतेनुसार आम्हा सगळ्यांना सांग ह्यापुढे कोण सरसेनापती व्हावा म्हणजे जीत आपलीच असेल". ते ऐकल्यावर अश्वत्थामा सांगतो, "सल्याला सरसेनापती करावे. तो सगळ्यांत उत्तम आहे त्या कामासाठी. त्याच्या विश्वासार्हतेला तोड नाही. स्वताच्या सख्ख्या बहिणीच्या विरुद्ध तो आपल्यासाठी लढत आहे. ते ज्येष्ठ आहेत आपल्या सगळ्यांमध्ये त्याची सेना सगळ्यात जास्त मोठी आहे. तो दुसरा कार्तिकेय आहे आपल्यासाठी. त्या राजाला आपला नेता केले तर आपण निश्चितपणे यश मिळवू शकू".

ते झाल्यावर सगळे राजे सल्याभोवती जमा होतात. त्यानंतर दुर्योधन त्याच्या रथातून उतरतो, सल्याचे हात हातात घेतो, त्याचे अभिनंदन करत बोलतो, "अहो महाराज, आपण मित्रांचे खरे संरक्षक अहात. तुमच्या नेतृत्वाखाली आम्ही यश संपादन करण्याचे प्रयत्न करणार आहोत. तुझ्या शौर्याबद्दल कांहीं शंका नाही. तुला आमचा सरसेनापती म्हणून पाहून ते खजिल होतील कारण तू त्यांचा मामा आहेस. त्यांना त्यांच्या मामा

विरुद्ध लढावे लागणार आहे. पांचालसुद्धा नाराज होतील. त्यांचा लढण्याचा उत्साह कमी होईल".

सल्य त्यावर बोलतो, "मी अरे कुरुच्या राजा तुला आश्वासन देतो कीं, तुझ्या ज्या अपेक्षा माझ्याकडून आहेत त्या मी पूर्ण करणार आहे. माझे आयुष्य, माझे राज्य, माझे शौर्य सगळे तुला अर्पण आहे".

दुर्योधन त्यावर उत्तर देतो, "अरे मामा, मी माझ्या सैन्याची धूरा तुझ्या हातात ठेवत आहे. तू आमच्या सेनेचे संरक्षण कर व यश संपादन करून घे".

सल्य पर्व भाग सहावा संपला.

# सल्य पर्व

## भाग सातवा

संजय पुढे सांगतो, सल्याची नेमणूक झाल्यानंतर तो सगळ्यांना उद्देशून परंतु, दुर्योधनाचे नांव घेऊन बोलतो, "राजे बलाढ्य दुर्योधनसह माझे थोडे ऐका, तुम्ही त्या दोघांना सर्वश्रेष्ठ योद्धे समजता परंतु, ते योग्य नाही. ते दोघेसुद्धा एकत्रपणे माझ्या बरोबरीचे नाहीत. बाकीच्या पांडवांची काय कथा? जेव्हां मी संतापतो, मी सगळ्या जगाशी एकटा लढू शकतो. मी सगळ्या पांडवांचा आणि सोमकांचा नाश एकटा करू शकतो. म्हणून मी तुझ्या सैन्याचा नेता होण्यास योग्य आहे". असे तो दुर्योधनाला सगळ्यांच्या समक्ष सांगतो.

दुर्योधन त्यानंतर पवित्र पाण्याचे स्नान सल्याला घडवतो. त्याची विधी केली जाते व अधिकृतपणे सल्य कौरवांचा सरसेनापती होतो. त्यामुळें सगळे सैन्य सल्याच्या नावांचा घोष करते. कौरवांच्या सैन्यातील सल्याचे मद्रदेशी जास्त खूष होतात. सल्य त्यांना आदेश देतो कीं, ते पांडवांचे सैन्य नष्ट करण्यासाठी तयार होतील. तो त्याच्या सैन्याला सांगतो कीं, त्याचे सैन्य पांडवांचा पराभव करून धृष्टराष्ट्राचे राज्य पुन्हा प्रस्थापित करतील. जे त्या कामात मरतील ते स्वर्गात जातील. त्यासाठी खास यज्ञ केले जातात ब्राह्मणांकरवी. त्यानंतर तो घोषणा करतो कीं, चला आपण सगळ्या पांडवांचा नाश करण्यास प्रारंभ करू. आकाशातील सिद्धांना, चरणांना व अप्सरांना दिसू दे सल्याची करामत. त्यांच्या कृपेने माझी शस्त्र अधिक तेजस्वी होवोत. सल्य पुढे आव्हान देतो कीं, तो पांडवाचे सगळे रस्ते बंद करणार आहे. जे भिष्माना व द्रोणांना आणि कर्णाला जमले नाही ते मी करणार आहे. सल्याच्या नेमणूकीने कौरवांच्या सैन्यात नवा हुरूप आला होता.

ते जोरा जोरानी ओरडून तो व्यक्त करत होते. तो गोंधळ पांडवांच्या लक्षात आला, युधिष्ठीर त्याच्या सगळ्या क्षत्रियांच्या समक्ष कृष्णाला बोलतो, "सल्याची नेमणूक सरसेनपती म्हणून झाली आहे असे दिसते. तो मोठा योद्धा आहे. आता आपण काय करावे ते सांग. तू आमचा आधार आहेस". वासुदेव त्यावर उत्तर देतो, "मी

सल्याला (अर्तयानीला) चांगला ओळखतो, तो भिष्म, द्रोण ह्यांच्या योग्यतेचा आहे. त्याच्या योग्यतेचा धनुर्धारी आपल्याकडे नाही. तो बेडरपणे लढणारा आहे. तो जर लढू लागला तर कोणाल सुद्धा ऐकणार नाही. तो सगळ्या सैन्याशी लढू शकतो. म्हणून त्याचा वध करणे आता आपले काम आहे. ते झाले कीं, तुझी सत्ता सगळ्या पृथ्वीवर येईल. तो तुमचा मामा आहे म्हणून त्याला दया देणे मूर्खपणाचे ठरेल. आता तो तुमचा मामा नाही तर एक खतरनाक शत्रू आहे हे लक्षात घेऊन त्याचा काटा काढण्याचे काम करावयाला पाहिजे. त्याची तपस्या मोठी आहे म्हणून त्याच्या बाणांत जास्त ताकद असते. हे लक्षात घेऊन आपल्याला आपल्या योजना आखाव्या लागतील". कृष्ण एवढे सांगून त्याच्या तंबूत जातो. ती रात्र ते सगळे शांतपणे निजतात. त्यांची जनावरं सुद्धा शांतपणे निजलेली असतात. कर्णाच्या मृत्यूमुळें त्यांना ती शांत झोप लागत असते. सल्य त्यांना मोठे आव्हान वाटत नव्हते.
सल्य पर्व भाग सातवा संपला.

# सल्य पर्व

## भाग आठवा

संजय पुढे सागतो, रात्र संपते व पहाटे दुर्योधन त्याच्या सैनिकांना सांगतो, कीं ते त्यांचे शस्त्र व चिलखत घालतील. त्याप्रमाणे ते सगळे सैनिक त्यांची शस्त्र वगैरे घेऊन सज्ज होतात. कांहीं रथाची तयारी करतात तर कांहीं घोडे तयार करतात. हत्तीसुद्धा सज्ज होतात. पायदलाचे सुद्धा सज्ज होतात. रणवाद्ये वाजू लागतात. मद्रदेशाचा राजा सरसेनापती म्हणून कृप, कृतवर्मन, अश्वत्थामा, सुवल पुत्र शकूनी जे अजून जीवंत आहेत ते सज्ज होतात शेवटच्या लढाईसाठी. ते सगळे शपथ घेतात कीं, जो एकटा लढेल किंवा जो साथ सोडेल दुसर्याची त्याला पाप लागेल. आपण सतत एकत्र राहून लढावयाचे आहे. जे रथी ती शपथ घेतात ते सल्याला त्यांचा नायक करतात. जसे कौरव तयार होतात जसेंच पांडवसुद्धा त्यांच्या परीने तयारी करत असतात. ते त्यांची व्युहरचना करतात अशी कीं त्यात कौरवांचे उरलेले योद्धे जे हाताच्या बोटावर मोजण्याइतके उरलेले होते ते मारून टाकता येतील.

धृतराष्ट्र बोलतात, मी द्रोणांचा वध झाला ते ऐकले आहे, भिष्म व कर्णाचासुद्धा वध झाला आहे. आता मला सांग सल्याचे काय होते. मला समजले कीं, सल्याला युधिष्ठीराने मारले, ते कसे झाले ते मला सांग. दुर्योधनाला भिमाने मारले ते कसे झाले ते मला ऐकावयाचे आहे.

संजय पुढे सागतो, ऐका राजे ते सगळे मी आता सांगतो, त्या युद्धात माणसांचे व हत्तींचे जे नुकसान होत होते त्याला परिसीमा उरली नव्हती. कर्ण, द्रोण व भिष्म गेल्यानंतर पांडवांचे जिंकण्याचे जास्त निश्चित झाले होते ते सगळे जाणत होते. आता सल्याचा वध करावयाचा होता. कारण सल्याने शपथ घेतली होती कीं, तो सगळ्या पांडवांना ठार मारणार आहे. त्या कल्पनेने खूष झालेला दुर्योधन अजून स्वप्न पहात होता कीं, कोणीतरी त्याच्यासाठी पांडवांचा नाश करील. कर्णाच्या वधानंतर पांडवांचा जोर भलताच वाढला होता. त्याच्या सिहगर्जना ऐकल्याने कौरवांचे धाबे दणाणत होते. त्यांची बेचैनी वाढत होती. सल्य त्याचे धनुष्य दाखवत पांडवांच्या फौजा जेथे होत्या तेथे

जाऊ लागतो.  त्याचे रुप पाहून तुझ्या मुलाला धीर येत होता.  त्याच्या साथीला त्याचे मद्र योद्धे होते.  त्याच्या दिमतीस कर्णाची सेनासुद्धा होती.  त्याच्या एका बाजूस कृतवर्मन होता त्याचे सैन्य घेऊन.  त्याच्या दुसर्या बाजूस शकूनी होता.  त्याचे गांधार सैन्य तेथे सज्ज होते.  त्या पलिकडे त्रिगर्त होते.  त्यावेळी मोठ्या जोमांने धृष्टद्युम्न व शिखंडी त्यांच्यावर हल्ला करतात.  त्याना महारथी सत्यकी संरक्षण देत होता.  त्या मागून राजा युधिष्ठीर त्याची फौज घेऊन येत होता.  तो सल्यावर चाल करतो.  सल्याला ठार मारण्याच्या उद्देशाने तो जात असतो.  बाकीचे पांडव त्यास आधार देत असतात.  अर्जुन कृतवर्मनावर जातो.  त्याच वेळी संसप्तकांना सुद्धा आव्हान देतो.  भिम व सोमक कृपावर चाल करतात.  नकूल व सहदेव शकूनीवर हल्ला करतात.  तुझे सामान्य सैनिक त्याच प्रमाणे पांडवांच्या फौजांवर चालून जात असतात.
धृतराष्ट्र विचारतात,  "अरे संजया,  ह्या दिवशी त्या दोन सैन्यांचे संख्याबळ काय होते ते मला सांग".  संजय सांगतो,  अकरा हजार रथ,  दहा हजार सातशे हत्ती होते,  दोन हजार घोडे होते.  तीन लक्ष पायदल होते तुझ्या सैन्याचे.
सहा हजार रथ,  सहा हजार हत्ती,  दहा हजार घोडे व एक लक्ष पायदल असें पांडवांचे होते.  दोनही बाजूच्या फौजा एकमेकांना हरवण्यासाठी लढू लागल्या होत्या.  ते सगळे रथी महारथी प्राणपणाने लढण्यासाठी रणांगणांत एकमेकांवर तुटून पडले होते.  मोठे भीषण युद्ध सुरू झाले.  त्या शेवटच्या दिवशी.  मोठ्या प्रमाणात नरसंहार होऊ लागला होता.
सल्य पर्व भाग आठवा संपला.

# सल्य पर्व

## भाग नववा

संजय पुढे सांगतो, त्यानंतर पांडव आणि कौरवांतील युद्ध पुन्हा सुरू होते. त्यात पांडवांच्या बाजूने श्रींजय कौरवांशी दोन हात करतात. ते युद्ध देव आणि दानवांचे युद्ध असावे असें वाटत होते. माणसे, घोडे, हत्ती, अनेक रथ असे हजारोनी एकमेकांत गुंतले गेले होते. धडक मारणार्या हत्तींचे ओरडणे, घोड्यांचे खिंकाळणे, रथांचा गडगडाट ह्यां आवाजांनी आसमंत दणाणून गेला होता. शूरयोद्धे त्वेषाने लढत होते. मोठ्या संख्येने योद्धे व प्राणी मारले जात होते. बाण, भाले आणि शलाकांनी तो परिसर भरलेला होता. योद्धे तलवारीने गदेने एकमेकांवर हल्ला करत होते. कित्येक एका फटक्यात गारद होऊन यमाच्या घरी जात होते. रथी रथीवर चालून जात होते तर हत्ती हत्तीवर जात होते. युद्धशास्त्राप्रमाणे ते होत होते. जसे युद्ध रंगात येत होते तसें रणवाद्ये सुद्धा जोरा जोरांनी वाजू लागतात. त्यांच्या तालावरून समजत होते युद्धाचा वेग. शंख अधून मधून ऐकू येत होते. ते त्या द्वंद्वांच्या यशाचे दर्शक असतात. संपूर्ण पृथ्वी हादरत होती त्या हत्तींच्या धावण्यामुळे. कोण कोणाला मारत आहे ते समजत नव्हते. जमिनीवर माणसाचे तुटलेले हात, पाय सगळीकडे पडलेले दिसत होते. वातावरण क्रूद्ध झालेले वाटत होते. हत्ती रथ उचलून फेकत होते त्याबरोबर त्यातील योद्धा व इतर लोक सुद्धा फेकले जात होते. हत्तांच्या मारामारीत माणसे चिरडली जात होती. अनेक मुंडकी मातीत पडत होती. त्यांचे डोळे उघडे होते ते दृष्य भयंकर वाटत होते. कित्येक शरीर फाटून गेलेली पडलेली होती ते पाहून फार दुःख होत होते. डोकं नसलली असंख्य धडं पडलेली होती. ते विदारक दृष्य पहावत नव्हते. अनेक बाणांने जखमी झालेले हत्ती माहूताचे ऐकत नव्हते, ते सैरावैरा धावत होते त्यांच्या पायाखाली माणसे चिरडली जात होती. ते निष्पाप प्राणी माणसाच्या हित द्वेषाचे बळी ठरत होते. त्यांना माहीतसुद्धा नव्हते कीं, ते का मारले जात आहेत. त्याचे पाप कोणाला लागणार होते? मरणारे ते प्रचंड आकाराचे हत्ती त्यांच्या अंगा खाली कित्येक सैनिक दाबून मारत होते. त्यात कोणत्या बाजूचे मरत होते ते समजत नव्हते. रक्ताचे पाट वहात होते. ते रक्ताचे

पाट बाजूने वहाणार्या नदीकडे सावकाशपणे सरकत होते. त्यांच्या बरोबर त्यात मिसळलेले माणसाचे अवयव सुद्धा सावकाशपणे सरकत होते. मोडलेल्या रथावरील छत्र्या त्यात तरंगत होत्या. कित्येक झेंडे त्यात पसरलेले होते ज्या योद्ध्यांचे जे मेले होते. कुरु श्रींजयांबरोबर लढत होते त्या युद्धात. ती मृतांची नदी त्या योद्ध्यांना घेऊन जवळच्या मोठ्या नदीत जात होती. मेलेल्यांचे आप्त त्याबद्दल हळहळ व्यक्त करत होते. भिती व त्वेष ह्यांनी ते नातेवाईक त्रस्त झालेले दिसत होते. ते एकमेकांना हाका मारून सांगत होते त्यांचा कोणता आप्त कामी आला आहे. त्यात अधून मधून त्यांचे लढणे थांबत होते. त्या युद्धाच्या जोरात भिम व अर्जुन त्यांच्या शौर्याने सगळ्यांना थक्क करतात. कौरवांचे बहुतेक आधीपासून युद्धासाठी तयार दिसत नव्हते. केवळ आज्ञा म्हणून ते लढत होते त्या लढण्यात जोर नव्हता. त्यामुळे ते चटकन हार मानत व दूर होत होते. त्यामुळे पांडवांचे मोठ्या उत्साहाने लढत असलेले दिसत होते. भिम अधून मधून शंख वाजवून त्याच्या योद्ध्याना उत्तेजन देत होता. अधून मधून गर्जना करत होता. क्षणोक्षणी पांडवांच्या फौजांचा जोर वाढत होता व कौरवांच्या फौजा मागे हटत होत्या. जसे पांडवांचा जोर वाढत होता ते सल्यावर जोरांने चालून जात होते. माद्रीची दोन मुलं जे सल्याचे सख्खे भाचे होते स्वतः मामाविरुद्ध लढण्यास सज्ज होतात. ते पहाताच तुमच्या विविध फौजा रणक्षेत्र सोडून जात असल्याचे दिसत होते. त्यांचे ओरडणे ऐकू येत होते. पांडवांचे यशाच्या अपेक्षेने आणखीन मोठ्याने ओरडत होते. त्यांच्या उत्साहाला मर्यादा उरली नव्हती. आपले मेलेले आप्त रणांगणात तसेंच ठेवून ते कौरवांचे पळत होते. त्या त्यांच्या पळण्यामुळें युद्धाचे स्वरुप बदललेले दिसत होते. दुर्योधन त्याच्या सैनिकांना "थांबा, थांबा", असे ओरडून आवाहन करत होता परंतु, कोणी ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. रणांगण रिकामे होण्याच्या परिस्थितीत दिसत होते. असंख्य योद्धे तुमचे त्यांचे घोडे, रथ आणि हत्ती मागे वळवत होते. पांडवांच्या हल्ल्याकडे ते लक्ष देत नव्हते.

सल्य पर्व भाग नववा संपला.

# सल्य पर्व

## भाग दहावा

संजय पुढे सांगतो, आपले सैन्य उध्वस्त झाले आहे ते पाहून सल्य त्याच्या सारथ्याला बोलतो, "आपला रथ त्वरित युधिष्ठाराच्या रथीकडे घेऊन निघ. तेथे मी तुला दाखवतो माझी कमाल. ते पार्थ माझ्यासमोर उभे राहू शकत नाहीत असे माझे कर्तब आहे". ते ऐकल्यावर त्याचा सारथी त्यांचा रथ तेथे नेतो. सल्याने युधिष्ठीरावर हल्ला केला अचानकपणे. परंतु, युधिष्ठीर तो परतवतो. त्यावेळी पांडवांचा मोठा फौजफाटा त्यांच्या राजाला संरक्षण देण्यासाठी हजर होतो. सल्याला लढताना पाहून कौरवांचे सैन्य जीवावर उदार होऊन लढण्यासाठी पुढे होते. ते त्यांची व्युहरचना करतात. तेथे भीषण युद्ध होते. रक्ताचे पाट पहातात. त्यात माणसांबरोबर घोड्यांचे रक्तसुद्धा मिसळलेले असते. ते दोन योद्धे सल्य व युधिष्ठीर एकमेकांवर बाणांचा वर्षाव करत असतात. त्यांचे दोघांचे युद्ध कौशल्य समसमान होते. त्यावेळी नकूल व सहदेव चित्रसेनावर तुटून पडतात. चित्रसेन नकूलाचे धनुष्य मोडून टाकतो. कर्णाचा मुलगा, चित्रसेन नकूलाच्या पोटात बाण मारतो. त्यानंतर तो त्याचा घोडा मारतो. त्यानंतर तो त्यांचा झेंडा पाडतो. नकूलाचा घोडा व धनुष्य गेलेले होते. तो त्याची तलवार काढतो, रथातून उडी मारून खाली उतरतो. तो चित्रसेनाकडे धावत जात असतांना कर्णाचा मुलगा त्याच्यावर बाणांचा भारी मारा करत असतो. नकूल ते सगळे बाण त्याच्या ढालीने अडवत असतो. नकूल तरी त्याच्या पर्यंत पोहोचतो व त्याचे डोके उडवतो. डोके नसलेले चित्रसेनाचे धड धाडकन खाली कोसळते. त्याचा मुकूट कोठेतरी फेकला जातो. त्याचा देखणा चेहरा निस्तेज डोळे उघडे असा खाली जमिनीवर पडलेला होता. कर्णाचा मुलगा मेला ते सगळ्यांना समजते. कौरवांच्या सैन्यात मोठा गदारोळ होतो. पांडवांच्या बाजूचे सिंहगर्जना करत त्या वधाचे कौतुक करतात. ते पाहून कर्णाचे दोन मुलगे, शुशेन व सत्यसेन जे दोघे रणवीर म्हणून ख्यातनाम आहेत, त्यांच्या भावाचा वध झाला ते पहातात. ते नकूलावर बाणांचा मारा करू लागतात. ते नकूलावर चालून जातात. त्यांच्या बाणाचा मारा झेलत तो पांडव दुसर्या रथात चढतो व नवीन धनुष्य

घेऊन त्यांना प्रत्युत्तर देण्यास सुरूवात करतो. परंतु, ते दोघे बंधू त्याचा रथ तोडून टाकतात. ते पाहून नकुलाला त्यांचे हसू येते व तो सत्यसेनाचे घोडे मारून टाकतो. नंतर तो त्याचे धनुष्य मोडून टाकतो. सत्यसेन दुसर्या रथात चढतो व ते दोघे बंधू माद्रीच्या मुलांवर चालून जातात. त्यावेळी नकुल शुशेनाचे ते धनुष्य मोडून टाकतो. त्याचवेळी सत्यसेनाचे चिलखत फाडतो त्याचे धनुष्य पुन्हा तोडतो. ते पाहून सगळे योद्धे त्याचे कौतुक करतात मोठ्याने ओरडून. ते दोघे कर्णाचे नकूलाचा पाठलाग करू लागतात. नकुल त्यांच्यावर बाणांचा मारा करत असतो मागे पाहून व त्याचा रथ पुढे धावत असतो. त्यानंतर ते दोघे नकूलाचा सारथी मारतात. त्यानंतर सत्यसेन नकूलाच्या रथाचा दांडा तोडतो. अतिरथ नकूल त्याचा रथ मोडला तरी त्यात उभे राहून एक शलाक सत्यसेनावर फेकतो. तो शलाक सत्यसेनाच्या छातीत रुततो. त्याच्या हृदयाच्या चिंधड्या होतात. सत्यसेन मरतो. रथातून खाली कोसळतो. त्याने बेभान झालेला शुशेना नकूलाला बेसहारा करतो त्याचा रथ मोडून. ते द्रौपदीचा मुलगा शुतसोम पहातो. तो काकाच्या मदतीला जातो. त्याला त्या ठिकाणाहून घेऊन जातो. त्या रथात ते दोघे फार सुंदर दिसत होते. ते शुशेनाच्या विरुद्ध लढू लागतात. त्यावेळी नकूल सगळे आकाश बाणांने भरून टाकतो. त्यानंतर एक अर्धचंद्राकृती बाण नेम धरून शुशेनावर नकूल मारतो. तो बाण शुशेनाचे डोके तोडतो ते पडते. सगळे ते पहातात व नकूलाचे कौतुक करतात. ते दोन वध पाहिल्यावर कौरवांचे सैनिक रमभूमीतून पळून जाऊ लागतात. ते पाहून सल्य तेथे जातो. त्याचे सैन्य त्याच्या भोवती फेर धरून त्याला संरक्षण देत असते. सल्य त्यांच्यामध्ये ताकदीने उभा असतो. त्याचे सैनिक त्याच्या नांवाने घोष करत असतात. त्यावेळी सत्यकी आणि भिमसेन आणि माद्रीचे दोन युधिष्ठीराबरोबर तेथे जातात. त्यांचे सैनिक त्यांच्या नांवाने घोष करू लागतात. ते सल्याला घेरतात. त्यांच्यात युद्ध प्रारंभ होते. पुन्हा नरसंहार सुरू होतो. अर्जुन संसप्तकांचा संहार करत होता. धृष्टद्युम्नाच्या नेतृत्वा खाली मोठ्या हुशारीने पांडवांचे तुमच्या सैन्यावर चालून जात होते. पांडव सेनेच्या मारामुळे आधीच खजिल झेलेले तुमचे सैन्य सैरावैरा पळत होते. त्यामुळे त्यांचा संहार करणे पांडवांच्या योद्ध्याना सोपे होत होते. त्या युद्धाने कौरवांच्या मनात धडकी भरली होती व ते युद्धापासून दूर जात

होते.

सल्य पर्व भाग दहावा संपला.

# सल्य पर्व

## भाग अकरावा

संजय पुढे सांगतो, त्या युद्धात पांडवांचे व कौरवांचे असे दोनही बाजूचे सैनिक एकमेकांची हत्त्या मोठ्या उत्साहाने करत होते. तेव्हां कांहीं योद्धे रणमैदान सोडून जात होते. घोडे जोरा जोराने खिंकाळत होते, जखमी योद्धे त्यांच्या जखमामुळे विव्हळत होते, तो नरसंहार फार वाढला होता. त्यावेळी रथांचा चुराडा होत होता. हत्ती सैरावैरा त्यांच्या जखमांमुळे वेदना सहन न झाल्याने धावत होते. त्यांच्या किंकाळ्या ऐकवत नव्हत्या. त्या भयंकर समराला कांहीं योद्धे मजा समजत होते व मोठ्या चवीने लढत होते. जणू त्यांना दुसर्यांना मारण्यात आनंद मिळत होता. त्या युद्धाने यमाच्या राज्याची लोकसंख्या वाढवली होती. त्या लढाईत जी त्या दिवशीच्या सकाळी होत होती युधिष्ठीराच्या संरक्षणाखाली पांडवांच्या फौजा कौरवांच्या सैन्याचे पारिपत्य करत होत्या. त्यात जिंकणे अथवा मरणे असा त्यांचा उद्देश दिसत होता. कुरु सैन्य पांडवांच्या हल्ल्याला त्यांच्या परीने उत्तर देत होते. सल्याला समजते कीं, त्याचे सैन्य कमकुवत ठरत आहे, तो त्यांचा जोर वाढवण्यासाठी स्वतः पांडवांवर चालून जातो. पांडवांचा जोर कायम होता कारण त्यांना आता समजले होते कीं, जीत आपलीच आहे. त्यामुळें ते जास्त जोराने कौरवांच्या तुकड्यांवर बाणांचा मारा करत होते. त्यांचे नेतृत्व युधिष्ठीर करत होते. आकाशातून अशनि पडू लागले होते ते एक अशुभ लक्षण होते कौरवांसाठी. ग्रह शुक्र आणि मंगळ बुधाशी युती करतांना दिसत होते पांडवांच्या मागे, त्यांच्या शस्त्रांतून अग्नी बाहेर येत असल्यासारखे दिसत होते. कावळे व धुबडं तुमच्या सैनिकांच्या रथावर व झेंड्यावर बसलेली दिसत होती. कौरव त्यांची शिकस्त करत होते पांडवांना हरवण्यासाठी. सल्य युधिष्ठीरावर बाणांचा मारा करू लागतो. तो भिमाला जखमी करतो. त्याशिवाय द्रौपदीची पांच मुलं, धृष्टद्युम्न, नकूल व सहदेव, सत्यकी व शिखंडी ह्यानासुद्धा तो सोन्याचे धारदार बाण मारतो. तो प्रभाद्रकावर बाणांचा वर्षाव करतो. सल्याच्या त्या बाणांच्या मारा मुळें अनेक हत्ती, घोडे व माणसे मृत्यूमुखी पडतात. त्यांच्या किंचाळण्याने सगळे आकाश दणाणून निघते. सल्याचा एक बाण

युधिष्ठीराला मारतो. तो त्याला लागतो व नंतर मातीत पडतो. ते भिमाला आवडत नाही. तो सल्यावर अनेक बाण मारतो. सहदेवसुद्धा मारतो. त्याच प्रमाणे इतर पांडवसुद्धा सल्यावर बाणांचा मारा करतात. सल्य त्यांना प्रत्युत्तर देत असतो त्याच्या बाणांनी. सल्याला पांडवांनी घेरले आहे ते पाहून कृतवर्मन, कृप, शकूनी, उलूक, अश्वत्थामा त्याच्या मदतीसाठी तेथे जातात. त्यांच्यात लढाई सुरू होते. कृप धृष्टद्युम्नाला मारतात, शकूनी द्रौपदीच्या मुलांवर हल्ला करतात. अश्वत्थामा नकूल व सहदेवाकडे जातो. त्यांची ती द्वंद्व सुरू होतात. दुर्योधन माधव आणि जिश्नुवर चाल करतो. त्यांच्यात घनघोर युद्ध होते. भोज राजा भिमाचे घोडे मारतो. तो त्याच्या रथातून उतरत गदा घेऊन सल्यावर फेकतो. त्यावेळी सल्य सहदेवाचे घोडे मारतो. सहदेव सल्याच्या मुलाचा वध करतो सगळ्यांच्या समक्ष. कृप धृष्टद्युम्नाशी लढत होते. अश्वत्थामा जसे गंमत करावा असें द्रौपदीच्या मुलाशी खेळत असतो. त्याला त्या तरूण मुलांना ठार मारण्याची इच्छा दिसत नाही. तो त्यांच्याकडे गमतीने पहात स्मित करत असतो. भिम त्याची गदा घेऊन कृतवर्मनावर धाऊन जातो. ते पाहून कृतवर्मन तेथून पळून जातो. सल्य सोमकांवर चालून जातो. भिम संतापून त्याची गदा सल्यावर पुन्हा एकदा फेकतो. तो साक्षात यमासारखा वाटत होता. ज्या गदेने त्यांनी गंधमादन पर्वतावर कुबेराच्या राक्षसांना मारले होते त्या गदेने तो सल्यावर नेम धरतो त्याच वेळी सल्य त्याच्या छातीत एक जोरदार बाण मारतो. परंतु, त्याचा त्रास त्याला होत नाही. तो बाण त्याला कांहींच करत नाही तो बाण भिम काढतो व सल्यावर फेकतो. त्याचे घोडे मारतो. त्याच्या सारथ्याला मारतो. ते पाहून सल्य संतापून भिमाकडे पहात रहातो. भिमाचे ते कर्तब पाहून तो आश्चर्य चकीत झालेला असतो.

सल्य पर्व भाग अकरावा संपला.

# सल्य पर्व

## भाग बारावा

संजय पुढे सांगतो, त्याचा सारथी मेला आहे ते पाहून सल्य त्याची लोखंडी गदा घेऊन खांबासारखा उभा होतो भिमाशी लढण्यासाठी. भिम ते पाहून संतापलेला त्याच्यावर धावून जातो. त्याच वेळी हजारो शंखनाद होतात. त्यामुळे वीरांची लढण्याची उमेद वाढते. सल्य व भिम ह्यांचे द्वंद्व सुरू होते. ते पाहून इतर योद्धे छान छान म्हणून त्यांना उत्तेजन देत असतात. भिमाशी दोन हात त्याने केले होते. दोघे रिंगणात फिरत होते व उंच उड्या मारून आपले आव्हान दाखवत होते. सल्याच्या गदेवर सोन्याचे आवरण होते. त्यामुळें ते सुर्याच्या प्रकाशात चमकत होते. त्यांच्या गदा आपटत तेव्हां त्यांतून ठिणग्या उडत होत्या. त्यांच्या गदांच्या प्रहाराने ते जखमी झाले होते. त्यांच्याच रक्ताने भरलेले होते. अधून मधून ते त्यांची शंख वाजवत होते. त्यावेळी ते थांबत असतं, त्यानंतर पुन्हा त्यांचे गदायुद्ध सुरू होत असें. ते दोघे एकमेकांना त्यांचे गदायुद्धातील ज्ञान दाखवत होते. कधी त्या गदांच्या प्रहारामुळें ते तोल जाऊन पडत असतं. दोघे त्यांच्या पायावर गदा मारत होते ज्यामुळे त्यांचा तोल जात होता व ते पडत होते. त्या आघातामुळें त्यांना फार वेदना होत असत, त्याने ते ओरडत होते. त्यांचे गदायुद्धाचे ज्ञान समसमान होते परंतु, कोण थकतो त्यावर कोण जिंकतो ते ठरणार होते. ते होत असतांना दुर्योधन पांडवांच्या सैन्यावर चालून जातो. त्याला पांडवांचे योद्धे चांगला विरोध करतात. दुर्योधन पांडवांच्या चेकितनाला घेरतो. त्याला जखमी करतो. तो कांहीं कमी नव्हता. तो त्याच्यावर बाणांचा वर्षाव करतो. जिंकण्याची शक्यता जास्त असल्यामुळे पांडवांना हुरूप आलेला असतो.

कृप प्रमुख करून कृतवर्मन व शकूनी युधिष्ठीराला घेरण्याचा डाव आखतात. त्याच वेळी दुर्योधन धृष्टद्युम्नाच्या बरोबर लढत असतो. तीन हजार रथांची एक पलटण अश्वत्थामाच्या नेतृत्वाखाली अर्जुनाशी लढण्यासाठी दुर्योधन पाठवतो. त्या रथाच्या फौजा पांडवांच्या रिंगणात घुसतात. तेथे मोठी लढाई होते. मोठा नरसंहार होतो. त्या रणधुमाळीमुळें आसमंतात धुळ उडालेली असते त्यामुळे कांहीं दिसत नव्हते. थोड्या

वेळांनी तू खाली बसते व सगळे दिसू लागते. कोणीही मागे हटावयाला तयार नव्हते कारण त्या सगळ्यांना स्वर्गात जाण्याची उत्सुकता होती. जिंका अगर हरा, तो आता कौरवांसाठी विषय नव्हता. युद्धात मरणे हे एकमेव ध्येय त्यांच्यापुढे होते. सल्य युधिष्ठीराला जखमी करतो. युधिष्ठीर सल्याला जखमी करतो. असें ते एकमेकांना जखमी करत असतात त्यांच्या बाणांनी. धर्माचा मुलगा त्यानंतर चंद्रसेनाला जखमी करतो व सल्याचे दोन संरक्षक मारतो. सल्याला सुद्धा बाणांनी जखमी करत असतो. सल्य छेड्डीचे पांच योद्धे मारतो. सल्य अशारितीने मारत असतांना त्याच्यावरसुद्धा पांडवांचे वीर हल्ला करत होते. युधिष्ठीर सल्याचा झेंडा पाडतो. त्याचा झेंडा पाडला गेला आहे व शत्रू समोर उभा आहे ते पाहून सल्याला फार राग येतो. तो सगळ्या पांडव योद्ध्यावर बाणांचा वर्षाव करू लागतो. त्यात सत्यकी, भिमसेन प्रमुख होते. त्याशिवाय तो युधिष्ठीरावर सारखे बाण मारत असतोच. सल्याच्या बाणांमुळें धर्माचा मुलगा व्यथित होतो तसे असुर जंभा इंद्रापुढे झाला होता.
सल्य पर्व भाग बारावा संपला.

# सल्य पर्व

## भाग तेरावा

संजय पुढे सांगतो, युधिष्ठीराला सल्याने अडवले तेव्हां सत्यकी, भिमसेन, नकूल व सहदेव त्याला संरक्षण देण्यासाठी पुढे होतात. ते पाहून कौरवांच्या बाजूकडील लोक मोठ्याने आरडाओरड करू लागतात. आकाशातील सिद्ध त्याचे कौतुक करतात. सत्यकी व भिम सल्याला बाणाने भोसकून काढतात. त्यानंतर तो दोघे मोठी गर्जना करतात. सल्य एक मोठा बाण जोराने सत्यकीवर फेकतो. त्यानंतर तो नकूल व सहदेवावरसुद्धा बाण मारतो. त्यानंतर नकूल त्याच्या मामावर बाणांचा मारा करू लागतो. सल्यसुद्धा त्या पांडवांच्या वीरांवर बाण मारत असतो. तो धर्माच्या मुलाचे धनुष्य तोडतो. युधिष्ठीर सल्याचे रथ, घोडे, सारथी आणि झेंडा मारतो. ते झाले तरी सल्य युधिष्ठीरावर बाण मारत असतो. त्यानंतर सल्य सत्यकीचे धनुष्य तोडून टाकतो, सत्यकी त्यावर सल्यावर एक भाला फेकतो. भिमसेनसुद्धा सल्यावर एक जोरदार बाण मारतो. युधिष्ठीर शतघ्नीने सल्यावर मारा करू लागतो. मद्रचा राजा मात्र ते सगळे उलटवतो. नकूलाने मारलेले बाण व सहदेवाने फेकलेली गदा तो तोडून टाकतो. त्यानंतर तो गर्जना करतो. सत्यकी ते सहन करू शकत नाही. त्याला तो अपमान वाटतो. तो एका बाणांने सल्याला भोसकतो. त्यानंतर त्याच्या सारथ्याला तीन बाण मारतो. त्यानंतर तो सिनीचा नातू हत्तीला मारतात ते बाण सल्यावर फेकतो. त्याने चिडलेला सल्य त्याची उग्र प्रतिक्रिया करतो. सगळे सल्याला घाबरून जातात. दुर्योधन ते पाहून फार खूष होतो. तो समजतो कीं आता पांडव मेले. परंतु, तसे नव्हते. भिम, नकूल, सहदेव, सत्यकी सल्याला वेढा देतात. युधिष्ठीर सल्याचे सहाय्यक मारून टाकतो. सल्य त्यांच्यावर बाणांचा वर्षाव करत असतो. ते सगळे उद्विग्न करणारे घडत असतांना धर्माचा मुलगा स्वताशी बोलतो, "ते माधवाचे बोलणे कसे अशाने खरे होणार"? हा सल्य रागाच्या भरात माझे सगळे सैन्य नष्ट करून टाकील अशी भिती वाटते. आपले सगळे रथ, घोडे, हत्ती तो मारू शकतो त्याच्या शौर्याच्या जोराने. पांडवांचे सैनिक आत्ताच त्याच्या हल्ल्यामुळें हादरले आहेत. एवढे बोलून

त्यानंतर तो पांडव राजा मोठ्याने गर्जना करू लागतो. पांडवांचे सैन्य सल्याला घेराव घालते. त्यात भिमसेन पुढे होते. ते सल्याला नवीन आव्हान देतात.
सल्य पर्व भाग तेरावा संपला.

# सल्य पर्व
## भाग चौदावा

संजय पुढे सांगतो, अश्वत्थामा आणि त्रिगर्ताचे अर्जुनाला बाण मारत असताना अर्जुन सुद्धा त्यांना बाण मारत होता. ते सगळे साळूंकी सारखे दिसत होते त्या बाणांमुळे. अर्जुनाचा सगळा रथ त्यांच्या बाणांनी भरला होता. अर्जुनाची ती अवस्था पाहून कौरवांना फार आनंद होत होता. तसे कधी झाले नव्हते. त्यानंतर अर्जुनाचे बाण कौरवांचा नाश करू लागतात. सर्वत्र मोडलेले रथ दिसत होते. त्या एका हल्ल्यात असंख्य सैनिक कौरवांचे मारले गेले होते. तरीसुद्धा अश्वत्थामा त्याला आवरण्याचा प्रयत्न करत असतो. एकमेकांना मारून टाकण्याच्या इराद्याने ते लढत असतात. अखेरीस द्रोणांच्या मुलाचे घोडे अर्जुन मारून टाकतो. अश्वत्थामा बेसहारा होतो. अश्वत्थामा काटेरी गदा घेऊन अर्जुनावर चालून जातो. अर्जुन ती गदा हवेतच तोडून टाकतो. अश्वत्थामा त्याच्या बाणांनी जखमी झाला होता परंतु, हार मानावयाला तयार नव्हता. अश्वत्थामा पांचालांना त्रास देण्यास सुरूवात करतो. त्यावेळी पांचालांचा योद्धा सुरथ अश्वत्थामावर चालून जातो. अश्वत्थामा एक जोरदार बाण मारतो जो सुरथाच्या छातीतून आरपार जाऊन खाली पडतो. सुरथ मरतो. सुरथ मेल्यावर त्याच्या रथात अश्वत्थामा चढतो. त्यावेळी त्याला संसप्तकांची मदत येते व त्यांच्या बरोबर तो अर्जुनाशी लढू लागतो. त्या लढाईत यमाच्या दारची संख्या वाढते. अर्जुन एकटा त्या सगळ्यांना मारत असतो.

सल्य पर्व भाग चौदावा संपला.

# सल्य पर्व

## भाग पंधरावा

संजय पुढे सांगतो, दुर्योधन आणि धृष्टद्युम्न भीषण युद्ध करतात. त्यात बाण, शलाक, मंतरलेले बाण असें सगळे वापरले गेले होते. पावसासारखे बाण फेकले जात होते. दुर्योधन अडचणीत आहे ते पाहिल्यावर त्याचे भाऊ त्याला मदत करण्यासाठी जातात. ते पांचालांवर चालून जातात. शिखंडी त्याच्या चपळाईने त्यांना रोखतो. त्याला प्रभाद्रक मदत करतात. त्या युद्धात कृप आणि कृतवर्मन जीवाची पर्वा न करता लढत असतात. सल्याच्या बाणांनी पांडव सेना बेजार झाली होती. नकूल व सहदेव त्यांच्या मामाशी लढत असतात. मामा व भाचे एकमेकांवर बाण फेकत असतात. त्याना युधिष्ठीर, भिम, सत्यकी मदत करत होते. त्यांना आलेले पाहून सल्य त्यांना बाणाने जखमी करण्यास सुरूवात केली. तेसुद्धा सल्याच्या छातीत बाण मारतात. त्यांचे युद्ध सुरू होते. सल्य सत्यकीचे घोडे मारतो व त्याला बेसहारा करतो. सल्याचे शौर्य पहाण्यासारखे होते. सल्य दुसरा रथ घेऊन पांडवांच्या मदतीसाठी जातो. सल्य त्याच्या मागे लागतो. सत्यकी त्याला दहा बाण मारतो. सल्यसुद्धा त्याला मारतो. नकूल व सहदेव सत्यकीच्या मदतीसाठी तेथे जातात. त्यांच्यात सिंहगर्जना होतात. त्यांचे बाणयुद्ध जोरात सुरू होते. त्यांच्या बाणांनी सगळे आकाश भरलेले होते. सल्य आता एकटा सगळ्या पांडवांशी लढत होता. त्याचे युद्ध कौशल्य पाहून शक्राची आठवण आकाशातील प्रेक्षकांना झाली.

सल्य पर्व भाग पंधरावा संपला.

# सल्य पर्व

## भाग सोळावा

संजय पुढे सांगतो, तुमचे सैन्य सल्याच्या नेतृत्वाखाली पांडवांवर जोराचा हल्ला करते. त्या हल्ल्याने पांडवांचे घाबरून पळू लागतात कृष्ण व अर्जुनांच्या समक्ष. भिम त्यांना थांबवण्याचा प्रयास करतो. त्यामुळें चिडलेला पार्थ कृपांवर आणि कृतवर्मनावर चालून जातो. त्यांच्या पलटणीना मारण्यास सुरूवात करतो. सहदेव शकूनीला अडवतो. नकूल सल्यावर चालून जातो. द्रौपदीचे पांच कौरवांवर तुटून पडतात. शिखंडी द्रोणांच्या मुलाला अडवतो. माघार व घेता ते लढत होते. कौरवांच्या त्या जबरदस्त हल्लाचे सगळे कौतुक करतात. तो एकटा पांडवांशी लढत होता. सल्य युधिष्ठीरावर बाणांचा मारा करत होता. त्यानंतर तो भिमावर जातो. त्याला बाणांने बेजार करतो. त्याच्या हल्ल्याने पांडवांचे सैन्य पळत असतांना त्यांना थांबवण्याचा प्रयत्न युधिष्ठीर करतो पण व्यर्थ. त्यामुळे राजा युधिष्ठीर भयंकर संतापतो. तो सल्याला विरोध करू लागतो. त्याच्या सगळ्या भावांना एकत्र येण्यास सांगतो. त्याबरोबर कृष्णाला सुद्धा बोलावतो. तो त्यांना सांगतो, "भिष्म, द्रोण, कर्ण आणि इतर योद्धे कौरवांसाठी लढले ते सगळे यमाकडे गेले आहेत. आता सल्य आला आहे त्यांच्या जागी त्यालासुद्धा आपल्याला तेथेच पाठवावयाचे आहे. त्यानंतर तो सांगतो कीं, मद्रवती (नकूल व सहदेव) त्याच्या रथाच्या चाकांचा संरक्षक असतील, ते इंद्राने पसंत केलेले योद्धे आहेत. त्यांच्या सारखे तपस्वी व व्रतस्थ कोणी नाही हे सगळे जाणतात. त्यांना क्षत्रियांची कर्तव्ये चांगलीच माहित आहेत. आमच्या द्वंद्वांत एकतर मी मरेन अथवा सल्य. जो जिंकल त्याची पृथ्वी होईल. सत्यकी माझी उजवी बाजू साभाळेल. धृष्टद्युम्न डावा सांभाळेल. भिम माझ्या पुढून असेल. अर्जुन मागून मला संरक्षण देईल. त्या व्यवस्थेनमुळे मी सल्याला हरवू शकेन असे मला खात्रीने वाटते. ते ऐकल्यावर सोमक, पांडव आणि पांचाल फौजा खूष झाल्या. ते सैनिक शंखू वाजवून त्यांचा आनंद व्यक्त करतात. त्या रणांगणाला नवे तेज प्राप्त होते. तुमचे पुत्र आणि सल्य पांडवांच्या त्या जोरदार हल्ल्याला सामोरी जातात. ते युधिष्ठीराच्या फौजांवर बाणांचा मारा करू लागतात. द्रोणांनी जे शिकवले होते त्याचा उपयोग करू

लागतात. सल्य व युधिष्ठीर एकमेकांना जबरी जखमा करतात. जसे दोन वाघ लढावेत वाघीणीसाठी तसे ते लढत होते. सगळे योद्धे त्या लढण्यात आनंद मानत होते. त्यांना स्वर्गात जाण्याची उत्सुकता दिसत होती. दुर्योधन भिमावर बाण मारतो. त्यांमुळे भिमाचा तिरकमटा मोडतो. तो एक शलाक त्याच्या दिशेने फेकतो. त्याच्यामुळे तुमचा मुलगा रथात खाली पडतो. भिम त्यानंतर दुर्योधनाच्या सारथ्याचे मुंडके उडवतो. त्याचे घोडे मारतो. त्याचा रथ बाजूला जाऊन पडतो. भिम दुर्योधनाला त्याचे तंगडे पकडून बाहेर खेचतो त्या रथामधून. दुर्योधन जोराजोरांने मदतीसाठी ओरडत असतो. परंतु, कोणी त्याला मदत करण्यासाठी जात नाही. कांहीं वेळानी अश्वत्थामा तेथे जातो. कृपसुद्धा जातात. कौरवांचे सैनिक बेचैन झाले होते. काय होणार असें ते पहात होते. पार्थ त्या कौरवाची कत्तल करू लागतो. दुर्योधन फार घाबरलेला होता. युधिष्ठीराला उत्तेजन मिळाले होते. त्या शांत स्वभावाच्या इसमात वीरश्री संचारली होती. तो सल्यावर हल्ला करतो. तो कौरवांच्या फौजांची कत्तल करू लागतो. जे सहसा तो करत नसे. रथ, घोडे खाली पडतात व एकच गोंधळ उडतो. त्याच्यात रुद्र संचारला होता. सगळे तो नष्ट करत होता. रणांगण रिकामे झाले होते त्यामुळे. अशा वेळी जेव्हां सगळे युधिष्ठीराला घाबरत होते सल्य त्याच्याकडे जातो त्याला आव्हान देतो. दोनही बाजूचे शंख वाजू लागतात. दोघे रक्ताने माखलेले होते. ते पहाता समजत नव्हते त्यांतील कोण जिंकणार. जर सल्य जिंकला तर दुर्योधन जिंकला असे होणार होते. त्यांचे बाणयुद्ध जोरात चालू होते. सल्याचे मदतनीस, सारथी घोडे असे सगळे मारले जात होते. पांडवाने सल्याचे धनुष्य तोडले. ते पाहून दुर्योधनाचे सैन्य फाकू लागले. त्यावेळी अश्वत्थामा सल्याच्या मदतीसाठी पुढे होतो. तो सल्याला त्याच्या रथात घेतो आणि ते दोघे तेथून पळून जातात. ते पाहून युधिष्ठीर शंखू वाजवतो. त्याची जीत तो जाहिर करतो. सल्य दुसर्या रथात चढतो जो जास्त चांगला व सस्त्रसामुग्रीने सज्ज होता.

सल्य पर्व भाग सोळावा संपला.

# सल्य पर्व

## भाग सतरावा

संजय पुढे सांगतो. मोठा मजबूत तिरकमटा घेऊन सल्य युधिष्ठीरावर नेम धरतो त्यावेळी तो मोठ्याने गर्जना सुद्धा करतो, त्या बाणांने तो धर्माच्या मुलास मारणार असतो, त्याने सल्य युधिष्ठीराला भोसकतो. त्यानंतर क्षत्रियांचे शिरकांड पुन्हा सुरू होते. सल्य सत्यकीला दहा बाण, भिमाला तीन, सहदेवाला व युधिष्ठीराला पुष्कळ बाण मारतो. जसे शिकारी सावजांना मारतो तसे ते मारले जात होते. सल्याच्या नरसंहाराला अखेरीस अटकाव भिमाने, सोमकांनी व पांचालानी केला. त्याच्या बरोबर नकुल व सहदेव सुद्धा होते. ते त्याला सरळ सरळ युद्धाचे आव्हान देतात. युधिष्ठीर सल्याच्या छातीत बाण मारतो. सल्य त्या बाणामुळें बधीर झाला होता तेव्हां दुर्योधनाचे योद्धे त्याला चहोबाजूने घेरतात व संरक्षण देतात. भिम, नकूल व सहदेवाच्या संरक्षणात युधिष्ठीर सल्यावर आणखीन बाण मारतो. सल्यसुद्धा बाण मारतो अशारितीने त्यांचे द्वंद्व चालू होते. त्यांचे बाण मोठाने आवाज करत होते. युधिष्ठीराच्या बाणांने सल्य थोडावेळ बधीर होतो. त्यातून तो लवकरच सावध होतो. धर्मपुत्र पुन्हा सल्याला भोसकतो. त्याने न डगमगता तो माद्रीचा भाऊ युधिष्ठीराला बाणाने बेजार करतो. त्यानंतर सल्य भिमाचे सोनेरी कवच फाडून काढतो. त्यानंतर तो युधिष्ठीराचे घोडे मारतो. त्यानंतर सल्य पांडवाचे सैन्य मारू लागतो. ते झाल्यावर भिम सल्याचे धनुष्य तोडतो. त्याला बाणांने जखमी करतो. त्यानंतर तो सल्याचे घोडे मारतो. त्यानंतर भिम व नकूल आणि सहदेव त्याला बाणांने घेरतात असे कीं, तो बेसहारा होईल. सल्य तरी हार मानत नाही. तो समशेर घेऊन युधिष्ठीराकडे धावत जातो. ते पाहून शिखंडी, धृष्टद्युम्न, सत्यकी आणि द्रौपदीची मुलं त्याच्यावर झडप घालतात. भिम त्याच्या धारदार बाणांने त्याची समशेर तोडतो. ते केल्यावर त्या सगळ्यांना फार आनंद होतो. ते सगळे मोठ्या मोठ्याने गर्जना करू लागतात व शंखू वाजवू लागतात. भिमाला हसू आवरत नव्हते. तो सल्याला चिडवू लागतो. त्यावेळी कौरवांचे लोक खच्ची झालेले दिसत होते. ते झाले तरी सल्य त्याची फौज घेऊन युधिष्ठीराकडे जाऊ लागतो. त्यावेळी युधिष्ठीर

रथाशिवाय होता. सल्याला येतांना पाहून तो त्याच्यावर धावून जातो. कृष्णाची त्याला आठवण होते व तो सल्याचा वध करण्याचे ठरवतो. राजा राजाला मारणार ह्या नियमानुसार ते योग्य होते. युधिष्ठीर एक शलाक घेतो जो सोन्याचा होता. डोळे गरगरा भिरवत तो सल्याकडे क्रोधपूर्ण दृष्टीने पहातो. पहाणार्यांना वाटते कीं, त्याच्या नजरेने सल्य भस्मसात होईल पण तसे होत नाही. त्यानंतर युधिष्ठीर तो शलाक सल्यावर नेम धरून मारतो. हातातून निघाल्यानंतर तो आकाशात उंच जातो व पुन्हा सल्याकडे येऊ लागतो. सल्य तो प्रकार गमतीने पहात असतो. तो शलाक ज्याचे नांव होते कालरात्र, यमासाठी त्वश्त्रीने स्वतः घडवला होता. त्याचे लक्ष्य कधीच चुकत नव्हते. ब्राह्मणाच्या शापासारखा तो अचूक होता. तो पांडव त्याची नियमितपणे पुजा करत असें सुगंधी द्रव्यांचा उपयोग त्यासाठी केला जाई व योग्य मंत्राने तो जागृत केला जात असें. त्यासाठी अथर्वाचे मंत्र वापरले जात होते. तो शलाक संवर्तासारखा तेजस्वी चमकत असें. तो खास इशानसाठी घडवलेला होता. तो सगळे कांहीं नष्ट करू शकत होता. जे ब्रह्माच्या कामात व्यत्यय आणतात त्यांचा नाश करण्यासाठी तो घडवलेला होता. असा तो विलक्षण शलाक आकाशात उंच जाऊन नंतर खाली येत होता सल्याच्या दिशेने. जसे रुद्राने तो फेकला होता युधिष्ठीराच्या हातून असे वाटत होते आकाशातील प्रेक्षकांना. सल्य तो पहातो व मोठ्याने गर्जना करतो. तो सलाक त्याला पकडावयाचा होता. तसे करून तो सल्य त्याला पुन्हा युधिष्ठीराकडे फेकणार होता परंतु, तसे विधीमध्ये नव्हते. तो मंतरलेला शलाक शल्याच्या छातीत घुसतो व आरपार जाऊन मातीत विसावतो. रक्ताने माखलेला सल्य दोनही हात पसरलेला जमिनीवर आडवा पडतो. त्याच्या अंगातील सगळ्या छिद्रांतून जसे डोळे, तोंड, नाक, कान रक्त निघून येते. मोठ्या पर्वतासारखा तो मातीत दिसत होता. सल्याचा मृत देह तेजस्वी दिसत होता. त्याचे मुख युधिष्ठीराकडे होते. सल्य मेला होता. ते झाल्यावर युधिष्ठीर कौरवांच्या सैन्याचा फडशा पाडण्यासाठी सरसावतो. त्याच्या हल्ल्याने कौरवांचे सैन्य इतस्ततः पळू लागते. त्याच्या बाणांने कित्येकांची डोकी तुटून पडत होती. ते होत असतांना सल्याचा धाकटा भाऊ युधिष्ठीरावर चालून जातो. युधिष्ठीर त्याचेसुद्धा डोके छाटतो. ते मुकूटासह मातीत पडते. ते पाहून त्यांचे लष्कर पांडवांवर चालून जाते.

कांहीं पळून जातात. ते पळून जात असतांना सत्यकी त्या पळणार्या क्षत्रियांवर बाण मारत होता. त्याला थांबवण्यासाठी कृतवर्मन सत्यकीला आव्हान देतो. ते दोघे एकाच घरचे समोरासमोर लढण्यासाठी उभे होते. कृतवर्मन सत्यकीचे धनुष्य तोडतो. त्यावर सत्यकी नवीन धनुष्य घेतो. सत्यकी कृतवर्मनाच्या छातीत बाण मारतो. त्याचे घोडे मारतो. त्यावेळी कृप तेथे येतात. कृतवर्मनाला घेऊन युद्धभूमीतून निघून जातात. सल्याचा वध आणि कृतवर्मनाचे निघून जाणे ह्यामुळें कौरवांची फळी बिघडते. दुर्योधनाचे लष्कर युद्धातून बाहेर जाऊ लागते. जे जीवंत होते ते घरी जाण्याच्या गोष्टी करू लागतात. कारण आता युद्ध उरलेले नव्हते. कारण त्यांचा चौथा सरसेनापती मारला गेला होता. तेव्हां दुर्योधन एकटाच लढत होता पांडवांशी. दुर्योधन पांडवांच्या मुख्य योद्ध्यांवर बाणांचा वर्षाव करू लागतो. ते होत असतांना कृतवर्मन पुन्हा दुसर्या रथात बसून रणांगणात येतो. युधिष्ठीर त्याचे चारही घोडे मारतो. त्याचा झेंडा पाडतो. त्याच्या बरोबर असलेले कृपसुद्धा त्यात मार खातात. त्यांना मदत करण्यासाठी अश्वत्थामा येतो. तो कृतवर्मनाला पुन्हा युद्धभूमीतून बाहेर नेतो. संजय धृतराष्ट्राला सांगत असतो, "अहो राजन, अशारितीने त्या युद्धेचे निखारे अजून तेवत होते. आपल्या चुकीच्या महत्वाकांक्षेचे निखारे अजून धगधगत होते".

सगळे योद्धे धर्माच्या मुलाचे कौतुक करत होते. जसे वृत्राच्या वधानंतर देव इंद्राचे करत होते. रण वाद्ये वाजू लागतात. त्या आवाजाने सगळे आसमंत दणाणून निघाले होते.

सल्य पर्व भाग सतरावा संपला.

# सल्य पर्व
## भाग अठरावा

संजय पुढे सांगतो, सल्याच्या वधानंतर त्याचे सतरा हजार योद्धे युधिष्ठीरावर चालून जातात. त्यावेळी दुर्योधन त्याच्या हत्तीवरून त्यांना युधिष्ठीरावर हल्ला करू नका असें सांगत होता. परंतु, ते त्याचे ऐकत नसतात. पार्थाला ते समजते. तो तेथे जातो त्याचे गांडीव सरसावून. युधिष्ठीराला वाचवण्यासाठी अर्जुन, भिम, नकूल, सहदेव, सत्यकी, द्रौपदीचा पांच मुलं, धृष्टद्युम्न, पांचाल व सोमक आणि शिखंडी त्यात असतात. ते युधिष्ठीराला वेढा घालतात त्याला संरक्षण देण्यासाठी. त्यामुळें कौरवांच्या फौजात चलबिचल सुरू झाली. ते सल्याचे योद्धे मोठ्या मोठ्याने ओरडत येत होते. ते पांडवांच्या प्रमुख योद्ध्याची नांव घेत त्यांना आव्हानं देत होते. जे सगळे आधीच युधिष्ठीरा भोवती सज्ज होते. ते सल्याचे सैनिक मारले जात होते. जरी दुर्योधन त्याना जाऊ नका असें सांगत होता तरी ते गेले होते. तो संहार पाहून शकूनी मोठ्या शिताफीने दुर्योधनाला सांगू लागतो, "आपण असे बघ्यासारखे कां उभे आहोत. तेथे आपल्यासाठी ते सल्याचे मारले जात आहेत. ते आपल्याला शोभत नाही".

दुर्योधन त्याला उत्तर देतो, "मी नको सांगितले तरी ते गेले आहेत". शकूनी बोलतो, "शूर योद्धे असे कधी करतात, त्यांचा राजा मारला गेला आहे हे समजून घे. तू त्यांचा राजा नाहीस कीं ते तुझी आज्ञा ऐकतील. त्यांना संरक्षण देणे आपले कर्तव्य आहे. आपण आपले सैनिक त्यांच्या संरक्षणासाठी पाठवले पाहिजेत". ते कौरवांना योग्य वाटते व ते त्यांच्या संरक्षणासाठी निघतात. सल्याचे व कौरवांचे असे मिळून मध्यमा नावाची व्युह रचना करतात. त्यात योद्धे हातानी लढतात. त्यातसुद्धा सल्याचे योद्धे मारले जात होते. ते पाहून पांडवांचा जल्लोष सुरू झाला. त्यांचा विजय त्यांना विशेष आनंद देत होता. शंखनाद ते करू लागतात. दुर्योधन ते पहात असतो. सल्याचे मारले जात असतांना कौरवांचे तेथून पळत होते.

सल्य पर्व भाग अठरावा संपला.

# सल्य पर्व
## भाग एकोणीसावा

संजय पुढे सांगतो, सल्याच्या वधानंतर कौरवांचे सगळे खजिल झालेले युद्धापासून दूर जातात. कोणालाही लढण्याची इच्छा रहात नाही. दुपारच्या प्रहरी ते रणांगण सोडून जाण्याच्या विचारात होते. कोणी त्यांच्या घोड्यावरून तर कोणी हत्तीवरून व कोणी चालतच युद्धभूमी सोडून जात होते. त्या सगळ्यांना बाणामुळे झालेल्या जखमा होत्या. पांचालांचे व सोमकांचे आणि पांडवांचे त्या जाणार्या कौरवांच्या योद्ध्यांवर लक्ष देऊन असतात. पांडवांचा उत्साह वाढलेला दिसत होता. कां नाहीं ते उत्साहात येणार? पांडवांकडील बोलत असतात कीं, आता युधिष्ठीरेची सत्ता पक्की झाली आहे. दुर्योधनाचे भवितव्य अंधूक झाले आहे. त्याचे राजा म्हणून रहाणे आता दुरापास्त आहे. आता त्याचे काय होणार ते समजत नाही. कैदी म्हणून रहाण्या ऐवजी वीरमरण त्यानी घ्यावे असा एकंदर बोलण्याचा सूर होता. धृतराष्ट्र त्याच्या मुलाच्या नादाने सगळे घालवून बसला आहे. त्याला विदूराचे बोलणे आठवत असेल पण त्याचा काय उपयोग? आता दुर्योधनाला पांडवांच्या कैदखान्यात रहावे लागेल अथवा जर युधिष्ठीराने परवानगी दिली तर तो वनवासात जाईल. तसे झाले म्हणजे त्याला समजेल पांडवांनी काय भोगले गेल्या तेरा वर्षात. भिम कसा कौरवांच्या सैन्याचा नाश करत होता त्याचे कौतुक होत असते. त्यांने दुःशासनाला कसे मारले त्याबद्दल बोलत होते. शकूनाच्या वधानंतर माद्रीच्या मुलांचे कौतुक होत होते. जेथे अर्जुन आहे, सत्यकी आहे तेथे विजय असणार हे आता एक समीकरण झाले होते. त्याबरोबर द्रौपदीची पांच, धृष्टद्युम्न, शिखंडी, त्यांच्या सह साक्षात जनार्दन असे सगळे त्या युद्धाचे मानबिंदू झाले होते. जेथे चांगुलपणा आहे तेथे यश जाते असे कांहीजण पांडवांचे कौतुक करतांना बोलत होते. भिष्म, द्रोण व कर्ण कसे मारले गेले त्यावर मोठी चर्चा रंगात आली होती. श्रींजय त्यांच्या कर्तबगारीने सगळ्यांना परिचीत झाले होते. सगळे पांडवांचे योद्धे जखमांनी भरलेले असून त्यांचा उत्साह विलक्षण दिसत होता. कांहीं जखमा तपासत होते. कांहीं त्यावर उपचार करून घेत होते वैद्यांकडून जे सैन्यासाठी योजलेले होते. तेवढ्यात

सच्यकीला व माद्रीच्या मुलांना शकूनी वेगांने निघून जात असलेला दिसतो. ते त्याचा पाठलाग करू लागतात. दुर्योधन त्याच्या सारथ्याला बोलतो, "तेथे पार्थ माझ्या वाटेतच उभा आहे त्याचे गांडीव त्याच्या हातात आहे. माझा रथ सगळ्यांच्या मागे असू दे. सगळ्यांच्या शेवटी राहीलो म्हणजे तो धनंजय माझ्या वाटेला जाणार नाही. अशारितीने लपत छपत तो जात होता. जर मी पांडवांशी लढण्यास सुरूवात केली तर माझे प्रामाणिक सैन्य त्यात सामील होईल. ते विविध देशांतून आलेले सैनिक युद्धात मरण्यासाठी तयार होते त्यांना आज्ञा होण्याची गरज होती. भिमाचे, धृष्टद्युम्नाचे त्यांना थांबवत होते. त्या योद्ध्याना जिंकण्यापेक्षा स्वर्गात जाणे जास्त महत्वाचे होते. बहुतेक त्या उद्देशानेच लढत होते. कौरवांचे पायदलाचे भिमावर चालून जातात कारण त्यांना मरावयाचे होते. भिम मात्र एकाद्या पर्वतासारखा खंबीरपणे उभा होता. परंतु, भिमाचा धीर जास्त काळ राहीला नाही व तो त्यांच्यावर चालून जातो. त्याच्या गदेने तो त्यांना मारू लागतो. रक्ताने भरलेल्या शरीराने ते कौरवांचे मृत सैनिक त्या रणभूमीत आडवे पडलेले होते. त्यांच्या अंगावरील दागिन्यानी त्यांचा देश ओळखता येत होता. युधिष्ठीराची फौज मात्र दुर्योधनाच्या मागे लागली होती. परंतु, त्याला अडवणे त्यांना जमत नव्हते. दुर्योधन त्याच्या योद्ध्यांना बोलतो, "पांडव आपला पिच्छा सोडणार नाहीत त्यासाठी पळून न जाता आपण त्यांच्याशी लढणे जास्त श्रेयस्कर आहे असे मला वाटते. कदाचित आपण त्यांना हरवू शकलो तर त्यात फायदाच होईल. तसेंच पळून जाण्यासाठी तुम्ही आलेले नाही. ते समजून युद्धासाठी पुन्हा तयार व्हा". ते त्या सैनिकांना पटते व ते पांडवांच्या सैन्यावर जोराचा हल्ला करतात. पार्थ त्यांच्या हल्ल्याला तोंड देण्यासाठी पुढे होतो. अचानक झालेल्या त्या कौरवांच्या वागण्यामुळे सुरूवातीला बावचळलेले पांडव त्वेषाने त्याचा प्रतिकार करतात. भीषण युद्धा सुरू होते. माद्रीचे शकूनीवर तुटून पडतात.

# सल्य पर्व

## भाग विसावा

संजय पुढे सांगतो, दुर्योधनाच्या आवाहनानंतर म्लेच्छ राजा शाल्व त्याच्या पर्वतासारख्या अजस्त्र हत्तीवरून पांडवांच्या पलटणात घुसतो. त्याचा हत्ती युद्धासाठी तयार केलेला होता. तो पांडवांचे रथ उचलून फेकत होता त्यामुळे सगळीकडे धावाधाव सुरू झाली होती पांडवांच्या सैन्यामध्ये. शल्व त्याच्या हत्तीवर बसून पांडवांच्या योद्ध्यांवर शरसंधान करत होता. त्याने पांडवांचे सैनिक यमाकडे पाठवावयाला सुरूवात केली. ते पाहून कौरवांच्या लोकांत एक नवीन उत्साह संचारला होता. पांडवांचे, सोमकांचे व पांचालांचे असे समजतात कीं जणूकाय अनेक हत्ती आक्रमण करून आले आहेत. नाईलाज झाल्यासारखे ते त्या जागेतून दूर पळू लागले. ते पाहून शल्वाला जास्त हुरूप आला. तो शंख वाजवू लागला. कौरवांना ते पाहून आनंद झाला होता. धृष्टद्युम्नाला त्या हत्तीचा फार राग आला. तो वेगांनी त्या हत्तीकडे पाठून जातो. शल्वाला ते समजते तो त्याच्या हत्तीला द्रुपदाच्या मुलावर घालतो. धृष्टद्युम्न त्याच्या कानात बाण मारतो. त्यामुळे तो हत्ती तेथून पळून जाऊ लागतो. शल्व त्याला आवरण्याचा प्रयत्न करत असतो. परंतु, जखमामुळे बैतागलेला तो हत्ती त्याला ऐकत नाही. शल्व त्या हत्तीला पांचालाचा रथ उचलावयाला लावतो. ते पाहून धृष्टद्युम्न त्यातून उडी मारून खाली उतरतो. हत्ती त्याचा रथ घोड्या व सारथ्यासह उचलतो व फेकून देतो. खाली उतरलेला धृष्टद्युम्न हातात गदा घेऊन त्या हत्तीच्या खाली जातो व त्याच्यावर जोरांनी मारू लागतो. ते होत असतांना शिखंडी व भिम तेथे पोहोचतात. त्या मागोमग सत्यकी तेथे जातो. ते त्या हत्तीवर व शल्यावर बाणांचा मारा करू लगतात. शल्व सुद्धा त्यांच्यावर शरसंधान करू लागतो. ते पाहून कौरवांचे कौतुक करत असतांना श्रींजयांचे व पांचालांचे, मत्स्यांचे असे पांडवांकडील मोठ्याने आक्रोश करू लागतात. त्या हत्तीला ते चहोबाजूने घेरून असतात. धृष्टद्युम्न त्याच्या गदेने त्या पर्वतासारख्या हत्तीवर जोराजोराने वार करत असतो. अखेरीस त्यामुळे तो हत्ती रक्त ओकू लागतो. त्यानंतर तो प्रचंड आकाराचा हत्ती जमिनीवर कोसळतो त्याच्या शल्वाला

घेऊन. सगळे ओरडत असतात. ते होत असतांना खाली पडलेल्या शल्वाचे डोके सत्यकी त्याच्या बाणांनी कापून टाकतो शल्वसुद्धा मरतो. ते दुर्योधनाच्या समक्ष होत असते.

सल्य पर्व भाग विसावा संपला.

# सल्व पर्व

## भाग एकविसावा

संजय पुढे सांगतो, शल्वाचा वध झाल्यानंतर तुमचे सैन्य फुटले. कृतवर्मनाला ते समजले व तो ठरवतो कीं, त्याच्या फौजांना मागे बोलवायचे. त्यानंतर पांडव आणि कृतवर्मनाचे ह्यांच्यात युद्ध होते. जीवावर उदार होऊन ते लढत होते. मित्र मित्राशी लढत होते स्वर्गात जाण्यासाठी. पांचालांच्या गर्जनानी कौरव घाबरले. सत्यकी तेथे जातो. तो क्षेमकिर्तीवर हल्ला करतो व त्याला मारून टाकतो. ते पाहून कृतवर्मन संतापतो व सत्यकीवर चालून जातो. त्याच्यावर बाणांचा मारा करू लागतो. सत्यकी व कृतवर्मन ह्यांचे द्वंद्व सगळे पहात राहीले. कृतवर्मन सत्यकीचे चारही घोडे मारतो. त्यानंतर तो सत्यकीचे धनुष्य तोडतो. सत्यकी संतापतो व त्याच्यावर धावून जातो. त्याच्या नवीन धनुष्याने तो कृतवर्मनाचे घोडे व सारथी मारतो. त्याचा झेंडासुद्धा पाडतो. कृतवर्मन तलवार घेतो परंतु, सत्यकी ती तोडून टाकतो. कृतवर्मन त्यामुळें खजिल होतो. कौरव नाराज होतात. कृप सत्यकीला मारून टाकण्याचे ठरवतात. ते हृदीकाच्या मुलाला त्यांच्या रथात घेतात. सत्यकीच्या आक्रमक वागण्यामुळें कौरवांचे सैन्य मागे जाऊ लागले. दुर्योधन ते पाहून पांडवांच्या सैन्यावर एकटा चालून जातो. शिखंडी, धृष्टद्युम्न, द्रौपदीची मुलं, पांचाल व कैकेया, सोमक त्याला विरोध करू लागतात. त्याचा जोर कमालीचा होता. त्यावेळी कृतवर्मन पुन्हा रणभूमीत येतो.

सल्य पर्व भाग एकविसावा संपला.

# सल्य पर्व
## भाग बाविसावा

संजय पुढे सांगतो, तुमचा मुलगा रुद्रासारखा तेथे लढत होता. त्याच्या बाणांने सगळे आसमंत भरले होते. त्याच्या बाणामुळें त्याचे शत्रू रक्ताने भरलेले होते. कित्येक मेले. त्याठिकाणी असलेले सगळे पांडवांचे सैनिक दुर्योधनाच्या बाणांनी जखमी झाले होते. पांडवांचे घोडे, हत्ती कित्येक मारले गेले त्याच्या शरसंधानामुळें. कौरवांच्या सगळ्या योद्ध्यांत दुर्योधन उठून दिसत होता. त्याचे शरसंधान वाढत गेले इतके तो युधिष्ठीरावर बाण मारू लागतो. त्यानंतर भिमावर बाण मारतो, त्यानंतर सहदेवावर मारतो, त्यानंतर नकूल व ते झाल्यावर सहदेव नवीन धनुष्य घेऊन दुर्योधनावर बाणांचा वर्षाव करू लागतो. त्यानंतर तो मोठी गर्जना करतो. पांडवांचे त्याच्यावर चहोबाजूने बाण मारतात. तरी तो घाबरत नाही. सगळे सैनिक दोनही बाजूचे तो नजारा पहात होते. त्यांच्या राजाचे कर्तृत्व पाहून प्रभावित झालेले तुमचे योद्धे नव्या उमेदीने पांडवांशी लढण्यासाठी तयार होतात. ते मोठ्या गर्जना करत येतात पांडवांवर हल्ला करण्यासाठी. अश्वत्थामा भिमावर जातो. दोघे खुनशीपणासाठी ख्यातनाम आहेत. त्याप्रमाणे त्यांचे द्वंद्व होत होते. शकूनी युधिष्ठीरावर गेला. तो त्याचे चारही घोडे मारतो. युधिष्ठीर सुद्धा त्याच्यावर अनेक बाण मारतो. त्यांचे द्वंद्व पहाण्यासारखे होते. सिद्ध व चरण ते पाहून आनंद व्यक्त करत होते. उलूक नकूलावर चाल करतो. नकूल त्याला अडवतो. त्या सुमारास कृतवर्मन सत्यकीवर चालून गेला होता. दुर्योधन धृष्टद्युम्नाचे धनुष्य तोडतो. त्यानंतर नवीन धनुष्य घेऊन तो पुन्हा शरसंधान करू लागतो. त्याचे युद्ध भीषण होते. कृप द्रौपदीच्या मुलांवर बाण मारत असतो त्यामुळे ते जखमी झाले होते. तेसुद्धा कृपावर तसेंच बाण मारत असतात. अशारितीने दोनही बाजूचे एकमेकांना बाणांने जखमी करत होते. कधी घोडे मारत होते तर कधी हत्तीवर बाण मारून त्यांना जखमी करत होते. त्या धुमश्चक्रीत वारा वहातांना इतकी धूळ उडत असं कीं, सूर्य दिसत नव्हता. ते धुळीचे वातावरण स्वच्छ झाले तसे सगळे दिसू लागले. एकाच वेळी तेथे असंख्य द्वंद्वं होत होती. सल्य पर्व भाग बाविसावा संपला.

## सल्य पर्व
## भाग तेविसावा

संजय पुढे सांगतो, त्या युद्धात अखेरीस पांडव तुझ्या सैन्याची फळी मोडून टाकतात. तरी तुमचे पांडवांशी लढत रहातात. पळून गेलेले तुमचे सैन्य परत लढण्यासाठी येते नव्या उत्साहाने. एका तुफान लढाईला सुरूवात होते. जुन्या जमान्यातील देव आणि असुर लढाईची आठवण स्वर्गातील लोकांना झाली. योद्धे एकमेकांना ओळखत होते व त्यांच्या नांवाने हांक मारत होते. युधिष्ठीर रांगाने कृपांना भोसकतो. त्यानंतर कृतवर्मनाचे घोडे मारतो. अश्वत्थामा कृतवर्मनाला त्याच्या रथातून रणभूमीतून बाहेर नेतो. दुर्योधन सातशे रथाची एक पलटण पाठवतो जेथे युधिष्ठीर लढत होता. ते युधिष्ठीराला वेढतात. त्यांच्या जोरदार मारामुळे सगळे आकाश बाणांने भरून जाते. युधिष्ठीराला संरक्षण देण्यासाठी पांडवांच्या फौजा तेथे जातात. मोठे युद्ध सुरु होते. त्या लढाईत रक्त पाण्यासारखे वाहत होते. कौरवांचे सातशे सैनिक मारून पांडव आणि पांचाल फौजा त्यांची सरशी सिद्ध करतात. त्या भीषण युद्धामुळें असंख्य स्त्रिया विधवा होत होत्या आणि अगणित बालकं पोरकी होत होती. तरी कोणाला त्याची पर्वा नव्हती. ते मित्र, शत्रू असा भेदभाव न करता लढत होते. आकाशातून अशनि पडावेत असें आवाज होत होते. क्षत्रिय एकमेकांशी बोलत युद्धाबद्दल चर्चा करत होते. सगळे स्वर्गात जाण्यासाठी उत्सुक होते. शकूनी त्या योद्ध्यांना सांगतो, सल्याचे सैनिक मोठ्या उत्साहाने लढण्यासाठी सज्ज होते. पांडवांचे अजिंक्य सैन्य नेमके बाण मारून त्या सल्य सैन्याचा संहार करतात. ते पाहून दुर्योधन पुन्हा एकदा युद्धातून माघार घेतो. शकूनी त्याला बोलतो, "अरे पापी माणसा, आता कां मागे होत आहेस? तू जर मागे जात असशिल तर आम्ही तरी युद्ध कां करावयाचे"? त्यानंतर त्याचे दहाहजार सैन्य तलवारी घेऊन सज्ज होते. त्या गांधार फौजा पांडवांशी लढत होत्या. त्यांच्या हल्ल्यामुळें पांडवांचे सैन्य पांगले. आपल्या फौजा मागे फिरत आहेत हे पाहून युधिष्ठीर सहदेवाला बोलतो, "ते शकूनाचे लोक आपल्यांला मारत आहेत. तू जा द्रौपदीचे पांच घेऊन व त्या शकूनाचा वध कर. तो पर्यंत मी पांचालांच्या मदतीने रथदल कौरवांचे नष्ट

करत आहे. आपले सगळे हत्तीदल, घोडदल व पाईक तू घेऊन जा. त्यांच्या मदतीने शकूनाचा वध कर". ती आज्ञा झाल्याबरोबर सहदेव व द्रौपदीचे पांच मोठी हत्ती व घोड पलटण घेऊन शकूनीवर चालून जातात. ते कौरवांचे सैन्य मागून मारू लागतात. पांडवांची घोडदळ शकूनीच्या फौजांत मागून घुसते. त्याना मदत त्यांचे हत्तीदळ करत असते. शकूनीच्या सैन्यावर ते जोराचा हल्ला करू लागतात. ते एक भीषण युद्ध होते व त्यात मोठा नरसंहार होतो. त्या युद्धात गदा व तलवारींचासुद्धा मोठ्या प्रमाणात वापर होतो. तेथे धनुष्यांचा ध्वनी ऐकू येत नव्हता त्या ऐवजी तलवारींचा खणखणाट ऐकू येत होता. इतर धनुर्धारी योद्धे ती लढाई पहात असतात. रक्ताने माखलेले ते योद्धे मरून कोसळत होते, कांहीं रक्त ओकत होते. सगळीकडे अंधकार पसरला होता तो सरल्यावर तेथे लढणारे योद्धे मी स्पष्टपणे पाहू शकलो. कांहीं मेलेले घोडेस्वार त्यांच्या घोड्यावर लोंबकळत होते व त्या स्थितीत ते घोडे दूर पळून जात होते. मेलेल्या सैनिकांच्या प्रेतांनी ती रणभूमी सजलेली होती. आपल्याला जिंकता येणार नाही हे समजल्यावर शकूनी त्याच्या योद्ध्याना त्या लढाईतून काढून घेतो व ते युद्ध संपते. पांडवांचे सुद्धा थकले होते व तेसुद्धा त्या लढाईतून बाहेर होतात. ते युद्ध थांबल्यामुळे सहदेव त्याची फौज ज्यात हत्तीदल होते ते घेऊन धृष्टद्युम्नाला मदत करण्यासाठी जातो. तेथे युधिष्ठीर होता. शकूनी धृष्टद्युम्नाच्या फौजांवर तुटून पडतो. तेथे हजारो सैनिक मारले जातात. प्रचंड गदारोळ होत होता. घोड्यांचे खिंकाळणे व माणसांचे ओरडणे ह्याने आसमंत भरला होता. अहो तुमच्या चुकीच्या धोरणांमुळे तो संहार होत होता म्हणून त्याचे पातक आपल्या माथ्यावर आहे हे लक्षात घ्या. ते होत असतांना कौरवांचे सैनिक स्वताहून त्या युद्धातून बाहेर पडत होते. त्या मरण्यापेक्षा आपल्या परिवारात जाऊन तेथे त्यांच्यात रहाणे त्यांना जास्त श्रेयस्कर वाटत असावे. जिंकण्याच्या मोठ्या आशेने मात्र पांडवांचे युद्ध मोठ्या उत्साहाने करत होते. मांसाहारी श्वापद रणांगणात त्यांचे भक्ष्य शोधत फिरत होते, त्यांची संख्या वाढत होती. लढणार्या योद्ध्यांना त्याची पर्वा नव्हती. थोडावेळ विश्रांती घेऊन शकूनीचे योद्धे पुन्हा पांडवांवर चालून जातात. त्यांना अजून जिंकण्याची आशा असते. पांडवांचे कांहीं सैनिक तुमचे घोड्यावरील खाली खेचून त्यांना गुद्द्याने मारत होते. लढाईला कांहीं नियम उरले नव्हते. कोणीही कसेही

मारा मारी करत होते.

सल्य पर्व भाग तेविसावा संपला.

# सल्य पर्व
## भाग चोविसावा

संजय पुढे सांगतो, पांडवांनी त्यांच्या शत्रूचा नाश केल्यानंतर रणभूमीत थोडी शांतता झाली तेवढ्यात पुन्हा शकूनी उरलेले सातशे घोडेस्वार घेऊन लढण्यासाठी आला. तो विचारत होता राजा कोठे आहे. त्याला कौरवांचे सांगतात दुर्योधन कोठे आहे. त्याप्रमाणे तो त्याचे लढवय्ये घेऊन त्या तळीकडे जातो व दुर्योधनाला सांगतो कीं, त्याचे ते सैनिक लढण्यासाठी सज्ज आहेत. तो पुढे बोलतो कीं, युधिष्ठीर सहजपणे हरणारा नाही. त्याला त्याच्या भावंडांचे संरक्षण आहे. त्याचे उत्तेजन देणारे भाषण झाल्यानंतर त्याचे योद्धे पांडवांवर चालून जाण्यास तयार होतात. त्यांना येतांना पाहून धनंजय कृष्णाला बोलतो, "आमच्या दोघात मोठे युद्ध होत आहे. परंतु, मी माझ्या शरसंधानाने ते आज संपवू इच्छितो. हे वैर मला आवडत नाही. कौरवांचे अगण्य सैन्य आता थोडे उरले आहे. किती मोठा क्षत्रियांचा संहार गेल्या सतरा दिवसात झाला ते पाहून मन दुःखी होते. दैवाचा हा खेळ समजत नाही. भिष्म गेले तेव्हां जर समझौता झाला असता तर बरे झाले असते कित्येक क्षत्रिय वाचले असते. पण दुर्योधन ऐकतच नाही. त्याच्या हट्टीपणाचा हा किती मोठा परिणाम आपण पहात आहोत. वेड्यासारखे आपण एकमेकांना मित्रांना नातेवाईकांना मारत आहोत. हा कोणता दैवाचा खेळ चालला आहे ते समजत नाही. एका मूर्खामुळे किती माणसे मरत आहेत. त्यानंतर द्रोण गेले त्यानंतर दुर्योधन शहाणा होईल असें वाटले होते पण नाही. त्यानंतर कर्ण मारला गेला निदान त्यानंतर त्याला शहाणपण सुचेल असे वाटले होते पण ते झाले नाहीं. कित्येक कौरव पुत्र मरत आहेत पण दुर्योधनाला त्याची पर्वा नाही. तो सारखा लढण्याच्या आज्ञाच देत आहे. हे कोणते भाग्य समजावयाचे"? अक्षौहिणी सैन्य मारले जात होते पण त्याला त्याची क्षिती नाही. अशा युद्धा पासून कांहीं मिळणार नाही ते त्याला कसे समजत नाही. तो कोणाचेसुद्धा ऐकत नाही. तो विदूराचे त्याच्या पित्याचे त्याच्या आईचे असें कोणाचेही ऐकत नाही त्याला काय म्हणावयाचे ते समजत नाही. असे वाटते त्याचा जन्म क्षत्रिय कुळाचा विध्वंस करण्यासाठी झाला आहे. तो आमचे राज्य देणारा

नाही असें दिसते त्यासाठी त्याचा वध होणे हाच एकमेव मार्ग मला दिसतो. मी माझ्या गांडीवाने त्याचा आज अठराव्या दिवशी वध करणार आहे. तुझी परवानगी दे, अरे कृष्णा". त्यानंतर त्याचे सगळे क्षत्रिय मारून टाकतो व त्यांचे सैन्य नष्ट करतो. त्याशिवाय हे वैर संपणार नाही. त्यानंतरच युधिष्ठीर राज्य करू शकेल.

संजय पुढे सांगतो, सव्यसाची तसे कृष्णाला सांगत होता. त्यानंतर तो सव्यसाची त्याच्या शुभ्र रंगाचे घोडे असलेल्या रथातून कौरवांच्या क्षेत्रात शिरतो, त्याचे शरसंधान सुरू होते. पुन्हा यमाचे द्वार उघडले जाते व अनेक क्षत्रिय त्यातून आत जाऊ लागतात. आधीच थकलेले कौरव सैन्य आणखीन खच्ची झाले होते. कोणीही लढण्यास उत्सुक नव्हते. पण त्याच्या बाणाने मारले जात होते. पार्थाच्या शरसंधानामुळें तुमचे उरलेले सैन्य सुद्धा मारले जात होते. त्याला कोणी विरोध करत नव्हता. तुमचे रथीमहारथी कोठे गायब झाले होते. जसे इंद्र दैत्यांचा नाश करत असे तसे होत होते.

सल्य पर्व भाग चोविसावा संपला.

# सल्य पर्व

## भाग पंचविसावा

संजय पुढे सांगतो, धनंजयाच्या शरसंधानामुळे लढण्याची थोडी उम्मीद असलेले सुद्धा गारद होतात. त्याला विरोध करणारे कोठे दिसत नाहीत. सगळे पळून जात होते. कौरवांच्या क्षेत्रात दहशतीचे वातावरण पसरले होते. कांहीं हात वर करून शरणागती दाखवत होते. कांहीं थोडा विरोध करत पण पुन्हा गप्प होत होते. कोणी पाणी शोधत होते तर कोणी त्या रणांगणातच झोपलेले होते. थोड्या काळानंतर पुन्हा कांही योद्धे लढण्याच्या स्थितीत आले व लढण्यासाठी तयार झाले. पांडवांतील धृष्टद्युम्न, शिखंडी, नकूल, पांचाल योद्धे, सतनिक त्या कौरवांवर तुटून पडले. दुर्योधनाचे चार घोडे मारले जातात. त्यानंतर त्याच्या सारथ्याचे मुंडके उडवले जाते. त्यावेळी कौरवांचे पांच हजार हत्ती पांडवांना घेरतात. ते डोंगरा एवढे मोठे होते. दुर्योधन त्याचे रथ वगैरे गेल्यामुळे एका घोड्यावर बसून शकूनीच्या कडे जातो. सव्यसाचीचे बाण त्या हत्तीना यमाकडे पाठवत होते. तो हत्तींचा संहार पाहून भिमाला उत्साह येतो व तो त्याची गदा घेऊन उरलेल्या हत्तींना मारु लागतो. ते पाहून पांडवांचे सैनिक त्याला मदत करण्यासाठी पुढे होतात. भिम त्याच्या गदेने हत्तींचे डोके फोडत होता. ते पाहून कांहीं सैनिक घाबरून मुतत व हगत होते. ते जखमी हत्ती सैरावैरा धावत होते त्यांच्या पायाखाली अनेक सैनिक उडवले जात होते. त्या हत्तींच्या रक्ताने भिम ओला झाला होता. त्यानंतर नकूल व सहदेव भिमाला मिळतात व ते तिघे मिळून त्या दुर्योधनाच्या हत्तींचा नाश करण्याचे काम करू लागतात. त्यानंतर पांचाल पुत्र धृष्टद्युम्न त्यात सामील होतो. दुर्योधनाचा पराभव करून परत येतांना तो पहातो कीं, दुर्योधनाचे हत्ती पांडवांच्या भोवती गोळा झाले आहेत. ते होत असतांना अश्वत्थामा व कृप दुर्योधनाला शोधत असतात. त्यांना तो कोठे दिसत नाही. ते त्यांच्या क्षत्रियांना विचारत असतात, त्यांना तो कोठे आहे ते माहीत नाही असें ते सैनिक सांगत असतात. मात्र कांहीं सांगतात कीं, तो शकूनीकडे कदाचित गेला असावा. दुसरे कांहीं बोलतात, कशाला त्याची चौकशी करता ज्यांच्यामुळे आम्ही बरबाद झालो आहोत, त्याची एवढी चिंता कशाला.

असे बोलून ते दुर्योधनाला शिव्या घालत असतात. कांहीं बोलतात कीं, त्याना पांडवांचा नाश केला पाहिजे नाहीतर ते त्यांना ठार मारल्याशिवाय रहाणार नाहीत. अशाप्रकारे विविध प्रतिक्रीया त्यांना ऐकाव्या लागत असतात. हत्तीदलाचा संपूर्ण नाश केल्यानंतर पांडवांच्या फौजा कौरवांच्या ठिकाणी जाऊ लागतात. त्यात पांचाल व सोमक आघाडीला होते. कृप व अश्वत्थामा शकूनीच्या शोधात होते. ते जातात व धृष्टद्युम्नाचे सैनिक कौरवांच्या अड्ड्यावर हल्ला करतात. ते येत असलेले पाहून तुमचे सैनिक हताश झालेले दिसतात. तरी नाईलाजाने त्यांना स्वसंरक्षणासाठी शस्त्र उचलावी लागतात. किर्तीनाचे धारदार बाण त्यांना भाजून काढत होते. अखेरीस कौरवांचे हार मानतात. ते दोनही हात वर करून व आपली शस्त्रं खाली टाकून उभे असतात. पांडवांचे सैनिक त्यांची सगळी शस्त्रं काढून घेतात. पांडव कौरवांच्या सैनिकांना कैद करतात. त्यावेळी भिम उरलेले हत्ती ठार मारून तेथे पोहोचतो. त्या प्रचंड आकाराच्या हत्तीने सगळे करूक्षेत्र भरून गेले होते. त्यातून मार्ग काढणे अशक्य होते. त्यावेळी कृप, अश्वत्थामा आणि कृतवर्मन दुर्योधनाला शोधत असतात परंतु, त्याचा थागपत्ता त्यांना लागत नाही. आता ते शकुनीला शोधू लागतात.

सल्य पर्व भाग पंचविसावा संपला.

# सल्य पर्व

## भाग सव्विसावा

संजय पुढे बोलतो, अर्जुनाने दुर्योधनाचे हत्तीदल मारल्यानंतर आणि भिमाने तुमचे सैन्य मारल्यानंतर तुमचे उरलेले मुलगे दुर्योधनाला शोधत असतात. त्यांना तो मिळत नाही. त्यानंतर ते पांडवावर हल्ला करण्याचे ठरवतात. त्यामध्ये धर्माशन, श्रृतंत, जैत्र, भूरीवल, रवी, जयत्सेन, सुजात, दुर्विष्ट असे ते तुमचे मुलगे होते व ते भिमावर चालून जातात. भिमावर त्याच्या वर्मी लागतील असें बाण मारत रहातात. त्यामुळें संतापलेला भिम क्षणात धर्माशनाचे डोके उडवतो. त्यानंतर तो श्रृतंताचे डोके कापून टाकतो. त्यानंतर जयत्सेनाला भोसकतो. तो त्यामुळे रथातून खाली कोसळतो. त्याच वेळी श्रृतर्वन तुमचा मुलगा चिडून भिमाला भोसकतो. भिम जैत्र, भुरीवल व रवी ह्यांना भोसकतो. ते त्यामुळे मरतात. त्यानंतर भिम दुर्विमोचनाला यमाकडे धाडतो. त्यानंतर तो सुजात, दुशप्रदर्श ह्यांना बाणाने ठार मारतो. ते रथातून खाली कोसळतात. त्यानंतर पाळी असते दुर्विष कारण तो भिमावर चालून जातो. आपले बंधू मरत आहेत हे पाहून श्रृतर्वन भिमावर बाणांचा मारा करू लागतो. भिमाचे धनुष्य खाली पडते. तो बेसहारा होतो. भिम दुसरे धनुष्य घेतो. ती लढाई इंद्र आणि असुर जांभाच्या लढाई सारखी होती. भिमाचा राग अनावर झालेला होता परंतु, श्रृतवर्न त्याला भारी जात होता. भिम त्याचे घोडे मारतो. त्याचा सारथी मारतो. त्यानंतर मात्र भिम त्याचे डोके उडवतो. ते पाहिल्यावर तुमचे सैनिक भिमावर जातात. भिम न घाबरता त्यांना सामोरी जातो. त्याला तुमच्या योद्ध्यानी पूर्णपणे घेरले होते. त्यांचे युद्ध होऊ लागते. भिम त्यांचे सातहजार सैनिक मारतो. त्याशिवाय तितकेच हत्ती मारतो. त्याने भिमाला जोर येतो. त्याला तुमचे मुलगे मारल्याचा आनंद झालेला त्याच्या चेहर्यावर दिसत होता. तुमचे कांहीं भिमाशी लढत असतांना बरेच त्यात भाग न घेता नुसते ते युद्ध बघत असतात. तुमचे सैन्य आता माघार घेत असते.

सल्य पर्व भाग सव्विसावा संपला.

# सल्य पर्व

## भाग सत्ताविसावा

संजय पुढे सांगतो, दुर्योधन आणि सुदर्श हे दोनच तुमचे पुत्र त्यावेळी उरलेले होते मरावयाचे. बाकीचे पांडवांनी मारलेले होते त्यातील जास्त भिमाने मारलेले होते. असे कृष्ण अर्जुनाला सांगत असतो. तो पुढे सांगतो कीं, पांडवांचेसुद्धा पुष्कळ योद्धे ठार झाले आहेत ह्या युद्धात. जे उरले आहेत त्यात सत्यकी, नकूल, सहदेव थकलेले आहेत. कौरवांचे कृप कृतवर्मन आणि अश्वत्थामा आहेत. ते आता दुर्योधनाच्या बाजूने नाहीत. ते वेगळे झाले आहेत. पांचाल राजपुत्रा प्रभाद्रकांच्या बरोबर उभा होता. तो फार सुंदर दिसत होता. दुर्योधन त्याच्या पलटणीमध्ये सुरक्षित असा होता. त्याच्या डोक्यावर छत्री होती आणि तो सगळीकडे पहात होता. तो त्याचे उरलेले सैन्य पुन्हा रचण्याचा विचार करत असावा. कृष्ण पुढे त्याला सांगतो, तुझ्या बाणांनी त्या कौरवांच्या उरलेल्या सैन्याचा नाश कर जर ते तुला पाहून पळून गेले तर मात्र ते जमणार नाही. तुझ्या मोठ्या सैन्याचा नाश दुर्योधनाच्या सैन्याने केला आहे म्हणून त्याला वाटते कीं, त्याने पांडवांचा पराजय केला आहे. त्याला वेड लागल्यासारखे त्याचे वागणे आहे. त्यात त्याला मदत करणारे इतर वेडे आहेत कौरवांच्या गोटात. कुरु राजा पुन्हा त्याच्या उरलेल्या फौजा घेऊन पांडवांवर चाल करणार असें दिसते. ते ऐकल्यावर अर्जुन त्याला बोलते, आता पर्यंत बहुतेक कौरव बंधू आम्ही दोघाना, भिम व अर्जुन, ठार मारले आहेत. फक्त दोघे उरले आहेत, त्यांचासुद्धा नाश लवकरच आम्ही करणार आहोत. आता शकूनी उरला आहे त्याच्या पांचशे योद्ध्यांसह आपल्या विरूद्ध उभा आहे. त्याबरोबर फक्त दोनशे रथी त्याच्या कडे आहेत. पायदळ फक्त पांच हजार आहे. त्याशिवाय अश्वत्थामा, कृप, त्रिगर्त, उलूक आणि कृतवर्मन असे प्रमुख योद्धे आहेत. तेवढाच फौजफाटा दुर्योधनाकडे उरला आहे. त्यांचा मृत्यू निश्चित ठरला आहे. एवढे मेले पण दुर्योधन अजून हयात आहे. जोवर तो आहे तोवर हे युद्ध होत रहाणार असें दिसते. म्हणून त्याचा वध होणे शांतता प्रस्थापित करण्यासाठी आवश्यक आहे. आज अठराव्या दिवशी मला वाटते युधिष्ठीराचे शत्रू सगळे नष्ट होतील. जर उरलेले योद्धे

पळून गेले तर ते वाचतील, नाहीतर तेसुद्धा सगळे मारले जाणार आहेत. मला शकूनाचा वध करावयाचा आहे. ते झाले की, गांधार सैन्य निघून जाईल. ते सगळे मेले की, आपले युद्ध संपेल. हस्तिनापुरातील महिला जोरांने आकांत करत असतील कारण त्यांचे पुरूष सगळे पांडवांनी मारले आहेत. परंतु, त्याचे पातक पांडवांना लागणार नाही. ते सर्वस्वी दुर्योधनाचे व त्याच्या पित्याचे असेल. आज दुर्योधनाचे साम्राज्य संपुष्टात येणार आहे. त्याचे वैभव सुद्धा नाहीसे होणार आहे. त्याचे आयुष्यसुद्धा संपणार आहे जर तो ह्या रणभूमीतून पळून गेला तर वाचेल. कदाचित तो वनवासाला जाईल आमच्या सारखा.

असे त्यांचे संभाषण होत असतांना कृष्ण त्यांचा रथ दुर्योधनाच्या ठिकाणी नेऊ लागतो. पांडवांचे तीन शूर योद्धे त्या तळावर हल्ला करण्यासाठी आज्ञा मिळण्याची वाट पहात असतात. ते होते भिमसेन, अर्जुन आणि सहदेव. त्यावेळी तुमचा मुलगा सुदर्शन भिमावर चालून जातो. सुशर्मन व शकूनी अर्जुनावर जातात. दुर्योधन सहदेवावर जातो. दुर्योधन त्याच्या तलवारीने सहदेवाच्या डोक्यावर एक जोराचा फटका मारतो. त्या फटक्याने सहदेव बेहोष होऊन त्याच्या रथात बसतो. थोड्याच वेळात तो सावध होतो. सहदेव दुर्योधनावर बाणांचा मारा करू लागतो. अर्जुन कौरवांचे अनेक घोडेस्वार योद्धे मारून टाकतो. त्यानंतर तो त्रिगर्तांच्या रथदलाकडे त्याचा मोर्चा वळवतो. त्रिगर्तांचे योद्धे एकत्रपणे त्याच्यावर हल्ला करतात. त्यांच्या बाणांनी वासुदेव व पार्थ जखमी होतात. अर्जुन सत्यकर्मानाच्या रथाचा दांडा मोडतो व नंतर त्याचे डोके उडवतो. त्यानंतर तो सत्येशूवर हल्ला करतो. त्याला मारल्यानंतर अर्जुन शुशर्मनावर जातो. तो प्रस्थलाचा राजा होता. त्यानंतर अर्जुन त्याचे सगळे योद्धे मारून टाकतो. तो शुशर्मनाच्या छातीत बाण मारतो. त्यानंतर तो त्याचे पस्तीस पुत्र मारतो. भिम सुदर्शनावर जोराने बाणांचा वर्षाव करतो. त्यानंतर भिम त्या उरलेल्या तुझ्या मुलाचा वध करतो. त्यामुळें आता फक्त दुर्योधन तुमचा मुलगा उरतो. त्याचे सैनिक भिमाला गराडा घालतात परंतु, भिम त्या सगळ्यांना यमाकडे लवकरच धाडतो. दोनही बाजूच्या फौजा प्राणपणाने लढत होत्या, बरेच मरून पडत असतांना जोरांने किंकाळत होते. बहुतेक योद्धे अशारितीने ठार मारले जातात. सल्य पर्व भाग सत्ताविसावा संपला.

# सल्य पर्व
## भाग अठ्ठाविसावा

संजय पुढे सांगतो, त्या भयंकर युद्धात शकूना सहदेवावर चालून जातो. त्यांच्यामध्ये द्वंद्व सुरू होते. मध्येच शकूनी भिमावर सुद्धा बाण मारत असतो. संतापलेले भिम व सहदेव कौरवांच्या उरलल्या पलटणींचा विध्वंस करू लागतात. त्यामुळे मेलेले घोडे, माणसे व हत्ती ह्यांच्या मुडद्याना सगळे रणांगण खचाखच भरलेले होते. त्यातून हालचाल करणे अशक्य होत होते. मेलेल्यांचे शस्त्रं सामुग्री रणांगणांत विखुरलेली दिसत होती. मांसाहारी प्राणी मेलेल्या प्राण्याचे मांस खाण्यात गुंतलेले होते. ते दृष्य पहातांना अंगावर शहारे येत होते.

शकूनी सहदेवावर पुन्हा हल्ला करतो. त्यामुळे तो पुन्हा रथात कोसळतो. त्या सुमारास भिम ते थोडे उरलेले कौरवांचे सैन्य अडवतो. ते पाहून दुर्योधन ओरडून त्याच्या क्षत्रियांस बोलतो, अरे मर्दासारखे लढा नाहीतर तुम्ही स्वर्गात जाणार नाही. लढत लढत मरणे हे क्षत्रियांचे काम आहे. कोकरासारखे मरू नका. पुन्हा पुन्हा तो तसे ओरडून त्याच्या सैनिकांना सांगत होते. पण त्याचे सैन्य त्याचे ऐकण्याच्या मनस्थितीत दिसत नव्हते. शकूनीचे सैन्य पुन्हा पांडवांशी लढण्यासाठी तयार होते. सहदेव त्यास भोसकतो व त्याचे घोडे मारतो. त्यानंतर तो अनेक बाण मारून शकूनीचे धनुष्य तोडतो. तरी शकूनी दुसरे धनुष्य घेऊन नकूलाला जखमी करण्याचा प्रयत्न करतो. उलूक त्याच्या पित्याला मदत करण्यासाठी पुढे होतो व भिमाला बाण मारतो. भिम शकूनी व त्याचा मुलगा उलूक दोघांना अनेक बाण मारतो. ते दोघे सहदेवाला बाण मारत असतात. सहदेव अखेरीस उलूकाचे डोके उडवतो एका धारदार बाणाने, तो मरतो. उलूक त्याच्या रक्ताच्या थारोळ्यात मातीवर पडतो. ते शकूनीच्या समक्ष होते त्यामुळें तो थक्क होतो. तो रडू लागतो. शकूनीला विदूराचे शब्द आठवतात. तरी आता पर्याय नव्हता. तो सहदेवावर बाणांचा मारा करू लागतो. सहदेव त्याचे उरलेले धनुष्य तोडतो. तेव्हां तो गांधारचा राजा तलवार घेऊन खाली उतरतो. तो एक गदा सहदेवावर फेकतो. ती गदा खाली पडते कारण त्याचा नेम चुकतो. त्यानंतर तो एक

शलाक सहदेवावर फेकतो. सहदेव तो शलाक सुद्धा तोडून टाकतो. ते पाहून शकूनी घाबरतो,त्याचे सैनिक पळून जाऊ लागतात. मोठी आरडओरड होते. पांडवसुद्धा मोठ्याने ओरडून त्यांना आव्हान देत असतात. शकूनी पळून जात असतांना सहदेव त्याच्या मागे लागतो. गाधारांचे उरलेले सैनिक त्याला संरक्षण देत असतात. शकूनी पुढे पळत आहे व त्याच्या मागून सहदेव जात आहे, बाणांचा मारा करत असें दृष्य पहाण्यासारखे होते. सहदेव त्याला आव्हान देतो कीं, खर्या क्षत्रियाप्रमाणे तो पळून न जाता त्याच्याशी द्वंद्व करील. पण शकूनीला त्यात तथ्य नव्हते. तो पळतच होता. सहदेव शकूनीला द्युताच्या वेळच्या गोष्टींची आठवण करून देत बाण मारत होते. सहदेव त्याला सांगत असतो कीं, आता फक्त तो व त्याचा भाचा उरले आहेत त्यातील तुला मी आता ठार मारणार आहे. शकूनी त्या बोलण्याकडे दुर्लक्ष करत पळत असतो. पळत असतांना सहदेव शकूनीच्या जवळ पोहोचतो, त्याला जवळून जोरदार बाण मारतो. बाणांमुळें शकूनीचे शरीर भाजल्यासारखे झाले होते. तरी अखेरचा प्रयत्न म्हणून शकूनी त्याचा भाला सहदेवावर फेकतो. सहदेव तो भाला मोडून टाकतो. अखेरीस सहदेव त्या सर्व युद्धास कारणीभूत असलेल्या शकूनीचा वध करतो. ते पाहून पांडवांच्या गटात मोठा जोर संचारतो. ते गर्जना करू लागतात. सहदेव मेलेल्या शकूनीचे डोके कापून काढतो व सगळ्यांना उचलून दाखवतो.

कौरवांचे उरलेले सैनिक ते न बघता पुढे त्याच्या तळाकडे पळत असतात. शकूनी मेला ही गोष्ट सर्वत्र पसरते.

सल्य पर्व भाग अठ्ठाविसावा संपला.

# सल्य पर्व
## भाग एकोणतिसावा

संजय पुढे सांगतो, शकूनीच्या वधानंतर त्याचे साथीदार सूडाच्या भावनेने पांडवांच्या सैन्यावर हल्ला करतात. ते झाल्यामुळे सहदेवाला संरक्षण देण्यासाठी अर्जुन तेथे पोहोचतो. त्या पाठोपाठ भिम जातो. अर्जुनाच्या बाणाने ते गांधार लोक पांगतात. त्यांना सहदेवाला कांहीं इजा करता येत नाही. त्या गांधारांचे घोडे मारले जातात. दुर्योधन तो संहार पहात असतो. त्याच्या अंगाची लाही लाही होत असते पण तो कांहीं करू शकत नव्हता. तो त्याच्या कडे असलेले त्याचे आज्ञाधारक सैनिक एकत्र करतो व त्यांना सांगतो, "तुम्हाला त्या पांडवांचा मुकाबला करावयाचा आहे. त्यांचे दोस्त पांचाल व सोमकांचासुद्धा पराजय करावयाचा आहे. त्यासाठी मरेपर्यंत लढत रहा. मेल्यावर तुम्हाला स्वर्ग मिळणार आहे". ते प्रामाणिक योद्धे सज्ज होतात, परंतु, पांडव त्या युद्धासाठी तयार असतात. भीषण युद्ध सुरू होते. संजय पुढे सांगतो, अहो महाराज, त्या सैन्याला सेनानी नव्हता. त्यांमुळे त्यांत ती शिस्त नव्हती जी एरवी अशा युद्धात असावी लागते. त्यामुळें संघटीत पांडव, पांचाल व सोमकांच्या पुढे ते फार काळ टिकत नाहीत. कौरवांचे अकरा अक्षौहिणा सैन्य पांडवांनी मारले होते त्यापुढे तो योद्ध्यांचा जमाव काय करणार? पांडवांच्या दोस्त राजांना तो दुर्योधन दिसत होता. जखमांनी भरलेले त्याचे शरीर ते पहात होते. परंतु, त्याचा पांडव द्वेष यत्किंचितही कमी झाला नव्हता. त्याच्या नजरेसमोर त्याचे उरलेले योद्धे मरत होते. पांडवांचे बाण त्याला लागत होते. तशा परिस्थितीत तो त्याच्या रथात बसून होता.

धृतराष्ट्र संजयाला विचारतात, "जेव्हां माझे सैन्य ठार झाले होते व आमचे तळ रिकामे झाले होते, त्यावेळी पांडवांचे किती उरलेले होते ते मला सांग. मला सांग संजया त्याचे सगळे सैन्य मारले गेले आहे ते समजत असतांना माझा नालायक मुलगा काय करत होता"?

संजय सांगतो, पांडवांचे उरलेले सैन्य होते, दोन हजार रथ, सातशे हत्ती, पांच हजार घोडे, दहा हजार पायदल, इतके त्यांचे जीवंत होते. ते सगळे सैन्य

धृष्टद्युम्नाच्या नेतृत्वाखाली सज्ज होते. त्या उलट दुर्योधनाच्या बाजूला एकही योद्धा नव्हता. कां रथ नव्हते, घोडे नव्हते, हत्ती नव्हते. तो एकटा उभा होता. तो त्याच्या उरलेल्या घोड्यावरून पूर्वेकडे जात होता एका विशाल तळ्याकडे. त्याला विदूराचे शब्द आठवत होते. त्याच्या हट्टापाई त्याचे प्रिय बंधू, मित्र नाहक मारले गेले होते. त्याला दुःख करण्याची सुद्धा सवड नव्हती. तो त्या विशाल तलावात बुडण्यासाठी जात होता. पांडवांचा कैदी होण्यापेक्षा पाण्यात बुडून मरणे श्रेयस्कर त्याला वाटत होते. एका बाजूला कौरवांचे उरलेले उभे होते त्यांच्याकडे धृष्टद्युम्न रागाने पहात होता. कारण ते अजून हार मान्य करत नव्हते. ते पांडवांना आव्हानं देत होते. अर्जुन त्यांना त्याच्या बाणांनी मारत होता, एक एक करून, त्यांच्यात अश्वत्थामा, कृप, कृतवर्मन व मी असे होते. माझ्याकडे पाहून धृष्टद्युम्न सत्यकीकडे पहात हसत बोलतो, "अरे ह्यांला कैद करण्यात अर्थ नाही. त्याला यमाकडे पाठवून देऊ. परंतु, त्याच वेळी तेथे अचानक व्यास ऋषी अवतरतात. ते आज्ञा करतात कीं, मला पांडव सोडून देतील. सत्यकी व्यासांना हात जोडून नमस्कार करतो. त्यानंतर मी माझ्या शस्त्रानिशी हस्तिनापुराला निघालो. मी रक्ताने भरलेला होतो. त्या जागेपासून दोन कोस दूर आलो तेव्हां मी दुर्योधनाला तेथे पहातो. तो एकटा उभा रडत होता. त्याला अश्रू आवरत नव्हते. त्याचे माझ्याकडे लक्ष जात नाही. तो त्याच्याच तंद्रीत होता. त्याच्या जवळ जाऊन मला पांडवांनी कसे मुक्त केले ते सांगितले. तो मला विचारतो कीं, त्याचे कोणी हयात आहेत कां? मी सांगितले कीं, कोणीही हयात नाही. सगळे मेले आहेत त्याच्यामुळे. कौरवांचे फक्त तीन उरले आहेत तेसुद्धा व्यासांच्या कृपेने असें मी त्याला सांगितले. त्याला मी सांगितले कीं, कौरव बंधूंपैकी केवळ तो एकटा जीवंत आहे. ते ऐकल्यावर दुर्योधन मला पकडून बोलतो, "त्यांचे सगळे जीवंत आहेत, आपले सगळे मेले आहेत, माझ्या अंध पित्याला सांग कीं, मी त्या तलावात जलसमाधी घेणार आहे. माझे सगळे नष्ट झाले आहे अशा परिस्थितीत मी कसे जगू शकेन? मी त्या पाण्यात विसावणार आहे कायमचा. राजाला हे सांग कीं मी जीवंत सुटलो आहे. मला जखमा झाल्या आहेत". असे बोलून तो एकेकाळचा राजा त्या तलावात शिरतो. मी ते पहात असतांना कौरवांचे उरलेले तीन योद्धे त्यांच्या घोड्यावरून तेथे येतांना मी पहातो.

तेसुद्धा फार जखमी झालेले होते. मला पाहिल्यानंतर ते माझ्याकडे वेगांनी येतात. मला बोलतात, "संजया तू नशीबवान आहेस त्यांच्या तावडीतून सुटलास". मी त्यांना माझे व दुर्योधनाचे संभाषण सांगितले. त्याना सांगितले कीं त्यांचा राजा पाण्यात गेला आहे. अश्वत्थामा ते ऐकून त्या विशाल तलावाकडे पहातो. म्हणतो, "आम्ही अजून पांडवांशी लढू शकतो, आमच्या मंत्रविद्येने अजून त्यांना हरवू शकतो. आमच्या तिघांचे सैन्य त्यांना भारी पडू शकते". त्यावेळी सूर्य अस्ताला गेला होता. त्यांचे सगळे मारले गेले आहेत हे समजल्यावर ते रडू लागतात. त्यानंतर जे वृद्ध लोक कौरवांच्या बायकांची देखभाल करण्यासाठी होते ते त्या कौरवांच्या बायकांना घेऊन हस्तिनापुराकडे निघतात. त्या बायकांत आकांत होत होता. त्यांच्या रडण्याने सगळा आसमंत भरला होता. कौरवांचे नोकर शांतपणे त्यांना घेऊन जाण्याची व्यवस्था करत असतात. त्या शाही नाजूक महिलांना कोणी पाहू शकत नसे त्या आता उघड्यावर जात होत्या. त्यांचे आप्त त्यांना मदत करत होते. तो तांडा शहराकडे निघाला होता. युयुत्सू एकमेव कौरव धृतराष्ट्राच्या वैश्य पत्नाची मुलगा युधिष्ठीराला निरोप घेण्यासाठी भेटतो. तो युधिष्ठीराला सांगतो कीं, त्याला त्याच्या कुटूंबासाठी त्यांच्या बरोबर गेले पाहिजे. युधिष्ठीर मोठ्या प्रेमाने त्याला निरोप देतो. सगळे पांडव त्याला मिठी मारून त्याला शुभेच्छा देतात. त्याच्या घोड्यावरून तो त्या महिलांच्या तांड्याकडे जातो. तो विदूराला भेटतो तेव्हां ते त्याला विचारतात, "तू दुर्योधनाला कां आणले नाहीस"? युयुत्सू सांगतो, "शकूनीचा वध झाल्यावर तो पूर्व दिशेकडे कोठेतरी निघून गेला आहे, त्याच्या जाण्यानंतर आम्ही शहराकडे निघालो. त्यानंतर त्यांचे संरक्षकसुद्धा पळून गेले म्हणून मला त्या महिलांच्या बरोबर यावे लागत आहे. त्याला विदूर बोलतात, तू तुझ्या वंशाच्या संरक्षणासाठी ते केलेस हे ऐकून बरे वाटले. आता तूंच एकमेव आधार आहेस तुझ्या अंध पित्यासाठी. मत्सराचे धोरण कसे सर्वांचा नाश करते ते ह्यातून शहाणे शिकतील. आता विश्रांती घे व उद्या तू युधिष्ठीराकडे जाशिल. असें बोलून अश्रूपूर्ण डोळ्यानी विदूर निघून जातात. सगळ्या शहरात आकांत झाला होता कारण प्रत्येक घरातून माणसे मेली होती. दुःखाचे सावट सगळीकडे पसरले होते.

युयुत्सू ती रात्र राजवाड्यात काढतो त्यानंतर तो त्याच्या घरी जातो. त्याच्या नजरे पुढून त्या भयंकर युद्धाच्या आठवणी सरकत होत्या.

सल्य पर्व भाग एकोणतिसावा संपला.

# सल्य पर्व
## भाग तिसावा

धृतराष्ट्र बोलतात, पांडवानी माझे सगळे सैन्य मारल्यानंतर उरलेले कृप आणि कृतवर्मन व अश्वत्थामा काय करतात.

संजय सांगतो, त्या राजघराण्याच्या महिला त्यांच्या घरी गेल्यावर व कौरवांचा तळ रिकामा झाल्यावर ते उरलेले तीन योद्धे विचार करू लागतात. ते पांडवांच्या बाजूच्या जिंकल्याच्या घोषणा ऐकत असतात. ते त्यांच्या राजाला वाचवण्याचा निर्धार करतात व त्या उद्देशाने त्या तलावाकडे निघतात. त्या तिथे युधिष्ठीर दुर्योधनाला शोधत असतो कारण पांडव दुर्योधनाला कैदी करणार असतात. पांडव रागाच्या भरात दुर्योधनाचा वध करण्याचा विचार करत असतात. भिम त्याची गदा हातात घेऊन दुर्योधनाला शोधत असतो. तेसुद्धा त्या तलावाकडे निघतात जसे त्यांना समजते कीं, त्यांचा दुष्मन त्या तलावात शिरला आहे. त्याच्या मायावी सिद्धीने तो त्या कौरवाला शोधू लागतो. इतर सैनिक आराम करण्यासाठी त्यांच्या तळावर जातात. कौरवांचे वाचलेले तिघे दुर्योधनाच्या शोधात त्या तलावाकडे निघतात. तेथे उभे राहून ते त्यांच्या राजाला आवाहन करतात कीं, तो बाहेर येईल व क्षत्रियाचा धर्म आचरत स्वर्गाचा रस्ता धरेल. जो सल्ला तो त्याच्या सैनिकांना सदोदीत देत होता तोंच सल्ला ते त्याला आता देत त्याला बाहेर येण्याचे आवाहन करत असतात. ते पुढे त्याला सांगतात कीं, पांडवांचा भिम त्याला शोधत आहे व केव्हांतरी तो त्या तलावात शिरून त्याला बाहेर काढेल तर त्यामुळें जी बेइज्जती होईल त्यापेक्षा स्वतः बाहेर येऊन शस्त्रं घेऊन लढणे जास्त चांगले असेल. ते पुढे त्याला सांगतात कीं, ते तिघे त्याचे संरक्षण करणार आहेत जर तो लढणार असेल. बाहेर येण्याचे त्याला ते पुन्हा पुनः आवाहन करत असतात. त्याना दुर्योधन सांगतो, "आपण वाचले आहोत दैवामुळें म्हणून थोडी विश्रांती घेऊन मग पुन्हा त्यांच्या विरुद्ध मी लढणार आहे. आणि माझे राज्या मिळवणार आहे. म्हणून मी ताबडतोब लढणार नाही. तुमची माझ्यावरील श्रद्धा पाहून तो कृतकृत्य झाला आहे". "मी एक रात्र ह्या तलावात आराम करणार आहे त्यामुळे माझ्या सगळ्या जखमासुद्धा बर्या होतील व

मी उद्या लढण्यासाठी सज्ज असेन". "आता मी ध्यानात जाणार आहे तरी आपण सुद्धा थोडी विश्रांती घ्यावी". असा सल्ला तो त्या तिघाना देतो व पुन्हा पाण्यात शिरतो. त्यानंतर अश्वत्थामा बोलतो, "अहो राजे, उठा, आपले भले हो, आम्ही तुम्हाला हरू देणार नाही. खल्ल्या अन्नाला जागतो आम्ही ब्राह्मण. मी पांडवांना एकटा पुरा पडेन माझ्या मंत्रशक्तीने. माझी सगळी अध्यात्मिक उर्जा मी तुमच्या मागे लावणार आहे. माझ्या पित्याच्या मृत्यूचा सूड मला उगवावयाचा आहे. आज मी सोमकांचा नाश करणार आहे. मला माझ्या पित्याच्या व्याधाचा वध (धृष्टद्युम्न) करावयाचा आहे. मला पांडवांचासुद्धा वंश नष्ट करावयाचा आहे ज्या लोकांनी कौरवांचा वंश नष्ट केला आहे. आजच मी त्यांचा वंश नष्ट करणार आहे. पांडवांचा आणि पांचालांचा नाश केल्याशिवाय माझ्या आत्म्याला शांती मिळणार नाही. ज्यांनी तुमच्या वंशाचा नाश केला त्यांच्या वंशाचा सुद्धा नाश झाला पाहिजे". तो बोलत असतांना तेथे कांहीं शिकारी तलावातील पाणी पिण्यासाठी येत आहेत असें दिसते. त्यांच्याकडे मारलेल्या प्राण्यांचे मांस असते. ते भिमसेनाचे चाहते होते. त्या तलावाच्या तटावर बसल्या बसल्या ते अश्वत्थामाचे व दुर्योधनाचे संभाषण ऐकतात. त्यांना ते काय होत आहे ते समजते. ते पांडवांच्या बाजूचे असल्यामुळें ठरवतात कीं त्याची खबर भिमसेनाला दिली पाहिजे. कारण ते तलावाकडे जात असतांना त्यांना भिमाचे लोक विचारत असतात कीं, त्यांनी दुर्योधनाला पाहिले आहे का"?

ही चांगली संधी आहे धन कमावण्याची हे त्यांच्या लक्षात येते व ते ठरवतात कीं, दुर्योधनाची जागा भिमाला सांगून कांहीं द्रव्य मिळवावे. त्या सुमारास पांडव दुर्योधनाला शोधून थकले होते व त्याच्या तळावर आराम करण्यासाठी गेले होते. त्यावेळी ते व्याध त्यांना भेटण्याची जातात. पांडवांनी त्यांचे हेर सगळीकडे धाडले होते दुर्योधनाचा थांगपत्ता काढण्यासाठी. परंतु, त्यांना दुर्योधनाचा पत्ता मिळाला नाही. तो निरोप ते राजाला देतात. त्याच्या सवयीनुसार युधिष्ठीर काळजी करू लागतो. त्यामुळे त्याचे बंधूसुद्धा अस्वस्थ झालेले होते अशावेळी ते व्याध त्यांच्या ठिकाणी पोहोचतात. ते दुर्योधनाची लपण्याची जागा त्यांना सांगतात. भिम ते ऐकतो. तो ते पुन्हा नीटपणे समजून घेतो. त्यानंतर तो त्या व्याधांना भरपून धन बक्षिशी म्हणून देतो व त्यांना सतुष्ट

करतो. त्याना समजते कीं, मंत्रसामर्थ्याने दुर्योधनाने त्या तलावाचे पाणी थिजवले होते. त्या खबरेची खात्री झाल्यावर पांडवांचा उत्साह वाढतो. ते सगळे पांडव त्या तलावाकडे निघतात. त्यांच्या बरोबर कृष्ण सुद्धा होता. मोठ्या मोठ्याने गर्जना करत ते त्या ठिकाणी पोहोचतात. त्या तलावाचे नांव द्वैपायन होते. सोमकांचा उत्साह कमालीचा होता. तो गदारोळ दुर्योधनाला त्या पाण्यातसुद्धा ऐकू येतो. तेथे पांडवांचे सगळे हितदर्शी जमलेले होते त्यात पांडवांच्या बरोबर द्रौपदीची मुलं, धृष्टद्युम्न, शिखंडी, उत्तमाजौस, युधमन्यू, सत्यकी असें होते. त्याशिवाय त्यांचे हत्ती घोडेसुद्धा जमा झाले होते. सगळे मोठा आवाज करत होते. दुर्योधनाने त्या तलावाचे पाणी गोठवलेले होते. त्यात दुर्योधन त्याच्या गदेसह बसला होता. त्या परिस्थितीत त्याला बाहेर काढणे शक्य नव्हते. युधिष्ठीराला दुर्योधनाचा वध स्वतः करावयाचा होता. तो त्या पाण्याजवळ जाऊन त्याचे शंख मोठ्याने वाजवतो. त्या पाण्यात त्याच्या बरोबर कृप, कृतवर्मन आणि अश्वत्थामा होते ते एकमेकांना बोलतात कीं, आता ते पांडवांवर हल्ला करून त्यांना हरवू शकतील. दुर्योधन त्यांना तेथून जाण्यास सांगतो. ते लांब निघून जातात. ते एक वडाचा वृक्ष पहातात. त्याच्या सावलीत ते तिघे आराम करण्यासाठी थांबतात. कृप आणि इतर त्यांचे घोडे चरण्यासाठी मोकळे करतात व स्वतः आराम करण्यास आडवे होतात.

पांडवाना समजत नाही त्या थिजलेल्या पाण्यातून दुर्योधनाला कसे बाहेर काढावयाचे. तो बाहेर आल्याशिवाय त्याला मारणे शक्य नव्हते.

सल्य पर्व भाग तिसावा संपला.

## सल्य पर्व

## भाग एकतिसावा

संजय पुढे सांगतो, ते तीन योद्धे गेल्यानंतर पांडव त्या देवैपायन तलावाकडे पोहोचतात ज्यातमध्ये दुर्योधन लपला होता. त्याना समजते कीं, ते पाणी मंत्राने भारलेले आहे. युधिष्ठीर माधवाला विचारतो, "अहो वासुदेव, ह्या पाण्याला दुर्योधनाने मंत्राने भारलेले आहे. त्याखाली तो लपला आहे. त्यामुळें त्याला कोणाची भिती वाटत नाही. तरी त्याला त्यातून बाहेर काढलेच पाहिजे. त्याचा आजच्या युद्धाच्या अठराव्या दिवशी वध झालाच पाहिजे कारण त्याच्या मृत्यूनेच हे युद्ध आटोपते एरवी नाही". कृष्ण बोलतो, "तू तुझ्या मंत्रसामर्थ्याने तो परिणाम काढून टाक. दुर्योधन मंत्रविद्येत पारंगत आहे. त्याचा त्यात पराभव तुला करावा लागेल. ते योग्य होईल. तुझी मंत्रविद्या आता वापर". अशा विद्येने ह्या आधी इंद्राने दैत्य व दानवांना पराभूत केले होते. उपेंद्राने वलीला असेंच पराभूत केले होते. हिरण्यकश्यपू सुद्धा तसांच मंत्रविद्येने मारला गेला होता. वृत्राचा नाश सुद्धा तसाच झाला होता. राक्षस रावण, पुलस्त्य वंशाचा असांच दशरथाच्या रामाने हरवला होता. आता तुला तुझी मंत्र विद्या सिद्ध करावी लागेल व दुर्योधनाला बाहेर काढावे लागेल. प्राचीन काळी दैत्य तारक आणि विप्रचित्ती असेंच मारावे लागले होते. त्याचप्रमाणे वातपी, ईलवा, त्रिशिरा, असुर सुंद, उपसुंद, हे सगळे मंत्रशक्तीनेच पराभूत केले गेले होते. इंद्र अशाच सामर्थ्यामुळे त्याचे स्थान टिकवून आहे. शस्त्र, अस्त्र, यंत्र, आयुध ह्या स्थुल विद्या आहेत त्यापुढे मंत्रविद्या जी सुक्ष्म विद्या आहे ती क्षत्रियांना शिकावी लागते तिचे ज्ञान तुझ्याकडे आहे. ते आता वापर". असें कृष्ण त्याला सांगतो.

संजय पुढे सांगतो, ते वासुदेवाचे ऐकल्यावर युधिष्ठीर बोलतो, त्या दुर्योधनाला जो त्याच्या वंशाचा नाश करून त्या तलावात जाऊन लपला होता. "अरे दुर्योधना, असा तू त्या तलावात कां लपून बसला आहेस? सगळे मारल्यानंतर तू स्वतः जगू इच्छित आहेस कां? त्यापेक्षा खर्या क्षत्रियासारखा (मर्दासारखा) आमच्याशी लढून दाखव. तुझा स्वाभिमान कोठे गेला? तू तुझ्या मंत्रविद्येने हे पाणी गोठवले आहेस, त्याखाली

लपला आहेस, सगळे तुला मर्द समजत आहेत अशावेळी असे नामर्दासारखे तू कां वागत आहेस? तुझे सभासद तुला मर्द समजतात ते खोटे आहेत असें तुला सिद्ध करावयाचे आहे वाटते. तू कुरु घराण्याचा राजा आहेस त्याची लाज तुला नाहीं कां? तुझ्या राजवंशातील जन्माचा विचार कर व लढण्यासाठी बाहेर ये मर्दासारखा. युद्ध सोडून तू पळून गेला आहेस त्यामुळे सगळे तुझी छिःतूः करत आहेत. एका सम्राटाला शोभेल असे हे वागणे नाही. इतरांना स्वर्गाचे प्रलोभन दाखवून लढावयाला लावणारा स्वतः मात्र जीव वाचवण्यासाठी असा लपत आहे ह्याचा अर्थ काय जग करेल त्याचा विचार कर. स्वताचे बंधू, मित्र, इतर आप्त तू तुझ्या हट्टासाठी मारलेस व आता कां लपत आहेस? नेहमी शौर्याच्या गोष्टी करणारा, आम्हाला तीळाच्या दाण्यासारखे म्हणणारा आता असा कां लपला आहेस, स्वताला शूरयोद्धा म्हणवणारा असा कां लपला आहे. ह्याचे कारण मला सांगशिल कां? कर्ण, शकूनी ह्या तुला मदत करणार्या मित्रांना तू मारले आहेस. मग आता तू कां मरण्यास भित आहेस? तुझे सगळे स्वर्गात गेले आहेत त्यांना भेटण्याची तुला कां इच्छा होत नाही? तुझे धाडस, हिम्मत, वीरश्री आता कोठे गेली? क्षत्रियासारखा वाग आता नाहीतर सगळे जग तुझी कायम निंदा नालास्ती करत राहील. आम्हाला पराभूत करून तुझे राज्य परत मिळवण्याचा प्रयत्न तू कां करत नाहीस. एका राजाला शोभेल असे तू आता कां वागत नाहीस"?

संजय पुढे सांगतो, अशारितीने युधिष्ठीर दुर्योधनाला आवाहन करत असतो. तेव्हां दुर्योधन त्याला पाण्यातूनच उत्तर देतो, "ह्यात शंका नको केव्हां भय माणसाच्या मनात घर करेल. माझ्या बाबत म्हणावयाचे तर, मी युद्धापासून भयापोटी पळून जात नाही. माझे शस्त्रं, माझा रथ व माझे सारथी असे सगळे मारले गेले होते, मी एकटा पडलो होतो, म्हणून मी थोडी विश्रांती घेण्यासाठी येथे शांतपणे निद्रा घेण्यासाठी आलो आहे. मी युद्धाला अजिबात घाबरत नाही. उगाच कांहींतरी गैरसमज करून घेऊ नका. भिती अथवा दुःख त्यामुळे मी येथे पहूडलो आहे. मला थकवा आला आहे व म्हणून तो काढण्यासाठी सुरक्षित जागा म्हणून मी येथे झोपलो आहे. अरे कुंतीपुत्रा तू सुद्धा थोडी विश्रांती घे व नंतर आपण पुन्हा लढण्यास सज्ज होऊ. ह्या पाण्याच्या औषधी गुणांमुळें माझ्या जखमा लवकर भरून येतील हे दुसरे कारण आहे. माझा थकवा गेला कीं मी

बाहेर येऊन तुम्हा सगळ्या पांडवांचा नाश करणार आहे ते लक्षात ठेव. मला भित्रा समजण्याचे कांहीं कारण नाही".

युधिष्ठीर त्यावर बोलतो, "आम्ही पुरेशी विश्रांती घेतली आहे. तुला शोधण्यात आमचा थकवा निघून गेला आहे. तू बाहेर ये व आमच्याशी लढून आम्हाला नष्ट करून दाखव".

दुर्योधन त्यावर बोलतो, "ज्या कुरु वंशासाठी मी राज्य करत होतो ते सगळे मेले आहेत. माझे बंधू, मित्र, सगळे आप्त मेले आहेत अशा राज्यात मी कसे राज्य करणार, कोणासाठी मी जिंकू ते राज्य? त्यात आनंद उरलेला नाही. उच्च कुलिन क्षत्रिय नाहीत अशा राज्यावर तू राज्य कर ह्यापुढे. मला तुम्हाला अजून हरवण्याची इच्छा आहे पण विचार येतात की, जेथे द्रोण नाहीत, जेथे कर्ण नाही अशा राज्यात काय अर्थ उरलेला नाही मग तेथे राज्य करण्याच कांहीं अर्थ मला दिसत नाही. त्यापेक्षा तू ते राज्य घे, मी तुला ते दान करत आहे आणि खुषाल राज्य कर त्या भिकार राज्यावर. सगळी पृथ्वी मी तुला देत आहे. त्यासाठी आता तुला माझ्याशी लढण्याची गरज नाही".

संजय पुढे बोलतो, दुर्योधनाचे ते भावूक उद्‍गार ऐकून युधिष्ठीर त्याला बोलतो, "असे रडगाणे करू नकोस. क्षत्रियाला ते शोभत नाही. असे बोलणारा शकूनीला व कर्णाला आवडणार नाही. तू मला राज्य दान करण्याची आवश्यकता नाही कारण ते आता तुझे राहिलेले नाही. प्रश्न राज्य घेण्याचा नाही. प्रश्न आहे तो तुला तुझ्या कर्माची शिक्षा करण्याचा आहे. कारण हे पृथ्वीचे राज्य आता आमचेच आहे त्यामुळे ते देण्याच्या गोष्टी तू करू नकोस, तो अधिकार तुला राहिलेला नाही. आता तू अरे दुर्योधना, तू आमचा कैदी आहेस परंतु, आम्ही तुला जरी सहजपणे कैद करू शकत असलो तरी तुला एक संधी तुझे क्षात्रतेज दाखवण्याची मी देऊ इच्छित आहे. त्यासाठी बाहेर ये व द्वंद्वाला तयार हो. आतापर्यंत तू भरपूर विश्रांती घेतली आहेस. तसेंच तुझ्या सगळ्या जखमा भरून आल्या आहेत. म्हणून आता पाण्याखाली रहाण्याची आवश्यकता उरलेली मला दिसत नाही".

"जेव्हां आम्ही तुला विनंत्या करत होतो तेव्हां तुला ते दान करण्याची बुद्धी कां नाही झाली? आमचे राज्य तेव्हांच आम्हाला तू कां नाही दिलेस? कृष्णाने किती विनवले,

विदूर. नारद, भिष्म असें सगळे एवढेच नाही तर तुझे पिता व मातासुद्धा तुला ते करण्यासाठी सांगत होते तेव्हां तुला दान करण्याचे कां नाही सुचले? आता सगळे संपल्यावर जर तुला ते शहाणपण सुचत असेल तर त्याला कांही अर्थ उरत नाही. हरणार्या राजाला दान करण्याचा अधिकार नसतो हे तुला माहीत नाही कां"? त्यावेळी तू आम्हाला सुईच्या टोका एवढी जमीन देण्यास तयार नव्हता जी वस्तुतः आमचीच होती. मग आता दान करण्यात काय अर्थ आहे जे तुझे राहीलेले नाही. आता तुला सांगतो तुझे गुन्हे ज्यासाठी तुला आम्ही पांडव देहांताची सजा देणार आहोत. परंतु ते सुद्धा तुला सुटण्याची संधी देऊन. जर तू द्वंद्वांत जिंकलास तर तू जसे म्हणतोस तसा वल्कल नेसून वनात जाऊ शकशील. जर मारला गेलास तर स्वर्गात तुझ्या आप्त, मित्राकडे जाशील. तुझ्या गुन्ह्यात द्रौपदीचा अपमान, लहानपणी भिमावर केलेला वीषप्रयोग, सगळ्या पांडवांना लक्षागृहात जाळण्याचा प्रयत्न, आमचा वेळोवेळी विनाकारण अपमान करणे, कृष्णाचा उपमर्द करणे, असें बरेच आहेत. अरे दुर्योधना, आता बर्या बोलाने बाहेर ये व शिक्षा करून घेण्यास तयार हो".

त्यानंतर इतर पांडव त्याला आव्हान देऊ लागतात.

सल्य पर्व भाग एकतिसावा संपला.

# सल्य पर्व
# भाग बत्तिसावा

धृतराष्ट्र बोलतात, पांडवांनी अशारितीने दम भरल्यानंतर माझा गर्विष्ट मुलगा कसा वागत होता, कारण त्याला अपमान सहन करण्याची सवय नाही. सगळी पृथ्वी ज्यात म्लेच्छ व भटके लोक आहेत त्याचा फार मान ठेवत असतं. त्याचा जो अपमान त्याच्या शत्रूनी केला, त्याला कैदी ठरवले ते तो कसे सहन करतो. अजून तो पाण्याखाली होता म्हणजे स्वतंत्र होता. मला ते सगळे ऐकावयाचे आहे.
संजय बोलतो, दुर्योधन ते पांडवांचे अपमान करणारे बोलणे ऐकून फार खजिल झाला. त्यापुढे दुर्योधन बोलतो, "अरे पार्थांनो, आपण सगळे मित्र, साधनसामुग्री ह्यांनी आता युक्त अहात. माझ्याकडे ते कांहीं उरलेले नाही. अशा परिस्थितीत मी कसा बाहेर येणार. माझ्याशी एकावेळी एकच तुमच्यापैकी लढणार असेल तर मी बाहेर येण्यास तयार आहे त्यासाठी तू तसे वचन दे. मी तुमच्या पैकी कोणालाही घाबरत नाही. पण तुम्ही दगाफटका कराल तर मी काय करणार, माझ्या बाजूने कोणीही नाही. मी आता थकलेला, जखमी आहे. त्यासाठी ताबडतोब मी बाहेर येणार नाही. तू इमानदार व वचनाचा खरा आहेस म्हणून मी तुला हे सांगत आहे. एक एक करून जर तुझे माझ्याशी द्वंद्वं करणार असतील तर मी त्यासाठी तयार आहे. परंतु, माझ्याशी धोका होणार नाही ह्याची खात्री कोण देणार. माझा तुमच्यावर अजिबात विश्वास नाही जेथे वृकोदर आहे. तुम्हाला एक एक करून हरवून मी माझे राज्य परत मिळवू शकेन जर तुमच्यात तेवढा प्रामाणिकपणा असेल. पण ते शक्य होईल प्राप्त परिस्थितीत असे वाटत नाही. ते करून मी माझ्या असंख्य क्षत्रिय मित्रांचे ऋण फेडू शकेन ज्यानी ह्या युद्धात त्यांचे प्राण दिले. त्या द्वंद्वांत मी मला मुक्त करू शकेन तुम्हा सगळ्यांना ठार मारून".
युधिष्ठीर त्याला उत्तर देतो, "तू लढण्यास तयार आहेस हे समजले. तुला माझ्या शुभेच्छा आहेत. तू आमच्याशी एक एक करून लढण्यास तयार आहेस हे चांगले वाटले. तू आमच्या पैकी एकाशी लढत असतांना बाकिचे आम्ही ते द्वंद्व पहात राहू,

कोणताही दगा फटका होणार नाही ह्याची हमी मी देतो. आणखीन कोणत्या अटी तुझ्या आहेत त्या सांग. जिंकलास तर हे राज्य तुझे व मेलास तर स्वर्ग तुझा असेल".

दुर्योधन नंतर बोलतो, "जर तुम्हाला माझी अट मान्य असेल तर आणखीन माझी अट अशी कीं, मी गदेने लढणार आहे. ते माझे शस्त्र आहे. म्हणून तुमच्या पैकी जो येईल त्याला माझ्याशी गदेने द्वंद्व करावे लागेल. ते द्वंद्व मातीत होईल. गदा तुटली तर बदलता येणार नाही, म्हणजे तो प्रतिस्पर्धी हरला असें समजावयाचे. मी तुझ्या भावांना हरवल्यानंतर पांचाल, क्षींजय अशा सगळ्याना हरवणार आहे. मी साक्षात शक्रलासुद्धा गदायुद्धात भीक घालणार नाही. कारण ते माझे शस्त्र आहे".

युधिष्ठीर बोलतो, "चल बाहेर ये तुझ्या सगळ्या अटी मान्य आहेत आम्हा सगळ्यांना". आज तुझा वध होणार आहे तुझ्या अटीनुसार अगदी, इंद्रसुद्धा तिला त्यापासून वाचवू शकणार नाही. युधिष्ठीराचे ते आव्हानात्मक बोलणे तुमच्या मुलाला पचले नाही. तो जोराजोराने श्वास घेऊ लागला. जसे घोड्याला चाबूक मारलेला आवडत नाही तसे तुमच्या मुलाचे झाले होते. तो पाणी घुसळल्यासारखे त्यातून बाहेर येतो. त्याच्या हातात त्याची गदा होती. तिच्यावर सोन्याचा मुलामा होता. दुर्योधन त्याची गदा त्याच्या खांद्यावर ठेवून उभा होता. साक्षात रुद्र असावा असा तो दिसत होता. विलक्षण तेजाने तो चमकत होता. त्याला पाण्यातून वर येतांना पाहून सगळे पांचाल व पांडव आनंदाने नाचू लागले. परंतु, दुर्योधन मात्र ते पाहून त्याचा अपमान होत आहे असें समजत होता. त्याचे डोळे गरगरा फिरवत तो चहूबाजू पहात होता. त्यानंतर पांचही पंडुपुत्राना पाहून त्याने त्याचे डोळे किलकिले केले व त्यांच्याकडे पहात राहिला. तो त्याचे ओठ चावत नंतर बोलला, "अहो पंडुपुत्र तुम्हाला ह्या वागण्याची किंमत मोजावी लागणार आहे. मी तुम्हाला यमाकडे पाठवणार आहे".

संजय पुढे सांगतो, पाण्यातून तो सरळ बाहेर येतो व तेथेच उभा रहातो त्याच्या हातात गदा असते जिच्यावर सोन्याचा मुलामा होता. ती त्याच्या खांद्यावर त्याने टेकवलेली होती. तो सगळा रक्ताने माखलेला होता. त्याच्या जखमा दिसत होत्या. त्याच्यात पांडवांना रागावलेला सूर्य दिसत होता. यमाची गदा जिला किंकर म्हणतात तशी त्याची गदा होती. तो घोघर्या आवाजात बोलत होता. तो पार्थाना द्वंद्वासाठी आव्हान देतो.

"एकेकटे या,  मरणासाठी तयार व्हा",  तो त्या पांडवांना जणूकाय आज्ञा करतो.  पुढे तो बोलतो आकाशाकडे पहात,  "ते देव माझे युद्ध पहातील.  त्यानंतर तो युधिष्ठीराला बोलतो तू ह्या द्वंद्वांचा पंच हो,  कारण तू त्यासाठी योग्य आहेस.  जणू आज्ञा करावी अशाप्रकारे तो बोलत होता".  युधिष्ठीर त्याला बोलतो,  "अरे दुर्योधना,  जेव्हां अभिमन्यूवर तुम्ही हल्ला करत होता ज्यात द्रोण सामील होते तेव्हां हा एकेकटेचा नियम कां नव्हता?  क्षत्रिय कर्तव्यात असा नियम नाही.  येथील त्या सगळ्यांशी तो लढला तरच तो खरा क्षत्रिय.  ते सगळे ज्यांनी अभिमन्यूवर हल्ला कला ते सगळे मोठे लढवय्ये होते,  क्षात्रधर्म जाणत होते त्याचे काय"?  नितीशस्त्र सांगते कीं,  जेव्हां एकादा अडचणीत असतो तो चांगुलपणा विसरतो त्याच्या भल्यासाठी".  "अरे दुर्योधना, आता लढण्यात तयार हो.  पाहिजेतर अंगावर चिलखत घाल,  जे आम्ही तुला देणार आहोत.  जे कांहीं पाहिजेते घे आणि युद्धाला सज्ज हो".  "जर तू आम्हा पांडवांना हरवू शकला नाहीस तर आम्ही तुला ठार मारणार आहोत.  तसा मेलास तर स्वर्गात जाशील.  अभय सोडून दुसरे कांही तुला हवे असेल तर ते मांग तुझी शेवटची इच्छा म्हणून मी ती मान्य करणार आहे".  त्यानंतर पांडवांचे त्याला संरक्षक कवच नेसण्यासाठी देतात ते सोन्याचे होते.  त्यानंतर शिरस्त्राण देतात.  त्या पेहेरावात तुमचा मुलगा फार सुंदर दिसत होता.  तसा तो पांडवां बरोबर रणांगणी जातो.  त्याची गदा त्याच्याबरोबर असते.  तेथे गेल्यावर तो मग्रूर तुझा मुलगा त्या शालिन पांडवांना बोलतो, "तुमच्च्यापैकी कोण प्रथम माझ्याशी द्वंद्व करणार आहे ते ठरवा.  जो कोणी येईल त्याला मी खात्रीने ठार मारणार आहे".  त्यानंतर तो एकेका पांडवांची नांव घेत बोलतो, "आज मी आपल्यातील वैराचा अंत करणार आहे.  ह्या गदेने मी तुम्हाला यमाकडे पोहोचवणार आहे.  माझ्या बरोबरीचा तुमच्यात कोणीही नाही हे मी जाणतो. अशारितीने बोलणे चांगले समजले जात नाही पण ते सत्य आहे हे मी दाखवून देईन. चला आता वेळ दवडू नका,  युद्धाला तयार व्हा".

सल्य पर्व भाग बत्तिसावा संपला.

# सल्य पर्व

## भाग तेहतिसावा

संजय पुढे सांगत असतो, दुर्योधन जोराजोराने उद्धटपणा करत असतांना वासुदेव युधिष्ठीराला रागाने बोलतो, "तू काय मूर्खासारखे आश्वासन त्याला देत आहेस? त्याला काय तू पांडवांना ठार मारण्याची परवानगी आहे आहेस कां? तो एक कैदी आहे त्याप्रमाणे तू त्याच्याशी वागले पाहिजेस. त्या दुर्योधनाने गेली तेरा वर्षे लोखंडाच्या पुतळ्यावर गदा युद्धाचे प्रयोग केले आहेत. त्याच्या प्रहाराने भिमसुद्धा गारद होऊ शकतो. अशाने आपला उद्देश कसा साध्य होईल? अशा माणसाला दया देणे हे पापकर्म आहे हे तुला समजत नाही कां? दया सत्पात्र असावी लागते नाही तर तो अन्याय ठरतो हे नितीशास्त्राचे नियम तुला माहित नाहीत कां? भिमाकडे शक्ती आहे पण दुर्योधनाकडे कसब आहे गदायुद्धाचे. जेव्हां शक्ती व कसब ह्यांची चुरस होते तेव्हां नेहमी कसब जिंकत असते हे तुला माहीत नाही कां"? तुझ्या मूर्खपणामुळे तुझा शत्रू मातत चालला आहे. तू स्वताला व तुझ्या सगळ्यांना मोठ्या संकटात टाकत आहेस. अरे सहजपणे कोणी सत्ता सोडत नसते, जर तू असा मूर्खपणा करत राहीलास तर जे युद्धात कमावले ते सगळे हातून निसटू शकते. आपल्या आप्तांचे व मित्रांचे मृत्यू व्यर्थ होतील. ह्या जगात कोणी असा नाही जो दुर्योधनाला गदायुद्धात हरवू शकेल भिमसुद्धा नाही. त्याची पूर्ण कल्पना त्या गांधारीपुत्राला आहे म्हणूनच तो तुला अटीत अडकवत आहे. कधीतरी तू शहाण्यासारखा वागणार आहेस कां? धर्मयुद्धात तुमच्यापैकी कोणीही त्याला गदायुद्धात चीत करू शकणार नाही. आपल्या शत्रूचे सगळे गुण बरोबर न तपासता त्याच्याशी बोलणी करणे हा एक मूर्खपणा जो तू करत आहेस. तुला वाटते गदायुद्धात भिम सर्वश्रेष्ठ आहे, ते फक्त धर्मयुद्धात, अधर्मयुद्धात नाही, कारण हा तुझा शत्रू फक्त अधर्मयुद्ध करत असतो, त्याचा तुला विसर पडला आहे कां? तुझ्या मूर्खपणामुळे तुझ्या भावांचे सगळे कर्तृत्व व्यर्थ जाईल. जे आजपर्यंत सतत होत आले आहे. भावांनी मिळवावयाचे व तू मूर्खपणाने घालवावयाचे हे सत्र कोठवर तू चालवणार आहेस? एकाला मारून तुम्ही मिळवलेले त्याला देणार हा प्रस्ताव तू कसा मांडलास? तो अधिकार तुला कोणी दिला?

तू नेहमी तुझ्या भावांना गृहीत धरतोस ते कोणत्या नितीशास्त्रानुसार योग्य आहे? तुझ्या मूर्खपणामुळे आधीच त्यांनी खूप कष्ट भोगले आहेत आणखीन किती ते तुझ्यामुळे भोगणार आहेत"?

भिमसेन बोलतो, "अरे मधूच्या व्याधा, कृष्णा, असा चिंतीत होऊ नकोस. तुझी आमच्यावरील माया व कदर मी समजतो परंतु, अरे वासुदेवा, मी तुला आश्वासन देतो कीं, ह्याच्या सगळ्या कसबीना मी पुरून उरेन ह्याची खात्री बाळग. मी त्याच्याशी प्रथम द्वंद्व करणार आहे. त्याचे असे आहे की, अरे कृष्णा, आमच्या राजाने एकदा शब्द दिला आहे तेव्हां तो फिरवता येणार नाही तेव्हां त्यानुसारच सगळे व्हावे लागेल. ह्यापुढे मात्र युधिष्ठीर निर्णय सर्वानुमते घेईल. आज आमच्या शत्रूत्वाचा अंत होणार आहे हे निश्चित. त्यामुळे युधिष्ठीराचे राज्य अबाधीत असेल. माझी गदा दुर्योधनाच्या गदेपेक्षा दीडपट जास्त भारी आहे. म्हणून असा चिंता करू नकोस. त्याशिवाय तुझी कृपा आहेच माझ्यावर ज्यामुळे मी तिनही जगांचा व त्याच्या कसबीचा मुकाबला करू शकेन".

संजय पुढे सांगतो, भिमाचे ते आश्वासन ऐकल्यावर जनार्दन संतुष्ट झाले त्यांच्या चेहर्यावर समाधान दिसू लागले. तो कृष्ण बोलतो, "तुझ्यामुळे हे संकट टळो म्हणजे मिळवले". "तू धृतराष्ट्राचे इतर पुत्र मारले आहेस व ह्याचा वधसुद्धा तुझ्या हातीच आहे हे विधीलिखीत मला माहित आहे. तुझ्या हातून अनेक राजे मारले गेले आहेत. दुर्योधनाला मारल्यानंतर सगळी पृथ्वी तुमच्या अधिकारात येईल. जसे विष्णूने सांचीला स्वर्गाचे राज्य प्रदान केले. तुझ्या हातून त्याचा मृत्यू आहे हे मला माहीत आहे. परंतु, जे मी तुझ्या भावाला सांगितले ते आवश्यक होते. त्यांनी त्याच्या मर्यादा समजून कामं केली पाहिजेत. कारण जे आहे ते तुमचे सगळ्यांचे आहे त्यासाठी त्याबद्दलचे निर्णय सगळ्यांच्या मतैक्यानेच घेतले गेल पाहिजेत. जर एकत्र रहाणार असाल ती ते जरूरीचे आहे". पुढे जनार्दन बोलतात, "त्याची हाड तोडण्यावर भर दे व सुरूवातीपासून त्यावर लक्ष दे, खेळत बसू नकोस. मग तू त्याचा नाश करू शकशिल. तुला तुझ्या प्रतिस्पर्ध्याला ठार मारावयाला आवडते ते एका दृष्टीने चांगले आहे. तुझ्यात तुझ्या इतर भावांचा सहिष्णूपणा नाही ह्याचा येथे उपयोग होईल".

सत्यकी व इतर भिमाची वहाव्वा करतात. पांचाल व पांडव त्यात सामील होतात. भिम त्या सगळ्याना आश्वासन देतो कीं, आज तो त्याचे सगळे शत्रूत्व ओकणार आहे दुर्योधनावर. जसे अर्जुनाने खांडव वनात केले तसे मी आज दुर्योधनाचे करणार आहे. तो राजाला आश्वासन देतो कीं, त्यानी निश्चिंत असावे कारण आज तो त्याच्यात असलेला सगळा कौरवांवरील राग बाहेर काढणार आहे. जेव्हां धृतराष्ट्राला समजेल कीं मी त्याच्या लाडक्या मुलाचा वध केला आहे, त्याला त्या सगळ्या घटना आठवतील ज्यात त्यांनी आम्हा पांडवांना त्रास दिला आहे. त्या सगळ्याची मोठी किंमत त्याची मुलं व इतर परिवार भोगणार आहेत. असें बोलून भिम द्वंद्वासाठी सज्ज झाला जसा इंद्र वृत्राशी लढण्यासाठी झाला होता. तुमचा पुत्र ते सगळे ऐकून विटला होता तो भिमावर चालून जातो. जसा चिडलेला हत्ती. मोठ्या उत्सुकतेने सगळे ते द्वंद्व पहाणार होते. भिम त्याला आव्हान देतो, "तू आता आठव त्या सगळ्या घटना तुझ्या पित्याने व तू मिळून आमच्यावर केल्या होत्या. त्याची अंतीम निष्पत्ती आज तुला अनुभवावी लागणार आहे. वरनावतात तू आमच्यावर काय केलेस ते आठव, सभेत द्रौपदीची विटंबना तू व तुझ्या भांवांनी कशी केली, तुझ्या मामाची द्युताची बनवाबनवी आठव, ते लक्षागृह ज्यात तू आम्हाला ठार मारण्याचा प्रयत्न केलास, ते विषाचे प्रयोग जे तू माझ्यावर केलेस, असे कितीतरी तुला आठवावे लागतील ह्या द्वंद्वांच्या दरम्यान. ते आपले आजोबा भिष्म तुझ्या हट्टापाई आज रणांगणात बाणाच्या शय्येवर समाधीत आहेत. ते आमचे गुरू द्रोण तुझ्याकडून अपमान करून घेत लढले व मेले तुझ्या हट्टापाई, कर्ण व सल्य तुझ्यासाठी मेले ते सगळे आठव. आता त्यांच्याकडे मी तुला पाठवणार आहे. तुझे सगळे भाऊ चांगले योद्धे परंतु, मारले गेले आहेत. त्यांच्या बायकां आज तुझ्यामुळे रडत बसल्या आहेत. त्याशिवाय तुझे अनेक मित्र, नातेवाईक तुझ्या आग्रहामुळें मारले गेले आहेत. असंख्य क्षत्रिय ज्यांचा ह्यात कांहीं संबंध नाही त्यांना स्वर्गाचे आमीष दाखवून तू मारले आहेस ती सगळी पापं आता आठव.

तू मात्र सगळी पापं करून अजून जीवंत आहेस. आज तू माझ्या गदेचा बळी ठरणार आहेस. आजच्या द्वंद्वांत मी तुझे गर्व हरण करणार आहे".

ते भाषण ऐकून दुर्योधन त्याला बोलतो, "तुझी फालतू बडबड मला ऐकावयाची नाही. लढायला प्रारंभ कर. आज मी तुझी घमेड उतरवणार आहे. माझ्याकडे पहा, माझी अजिंक्य गदा पहा. जर तू खरे धर्मयुद्ध करणार असशिल तर तुला जिकण्याची अजिबात संधी नाही. तुझ्या गदेने माझ्यावर एक तरी मारा केलास तर मी म्हणेन कीं, तुला गदायुद्ध समजते. आज मी तुम्हा सगळ्यांना पुन्हा वनवासात पाठवणार आहे. मला जर तू मारू शकलास तर तो तुझा मोठा विजय असेल. फक्त लुच्चेगिरीनेच तू मला हरवू शकशिल. त्यासाठी तुला सल्ला देण्यासाठी तुमचा मावस भाऊ आहेच असें कुत्सितपणे बोलत दुर्योधन कृष्णाकडे छद्मी हास्य करत पहातो. तुझी सगळी विद्या व कसब पणाला लावून युद्ध कर".

द्वंद्वाच्या सुरूवातीला श्रींजय, पांचाल आणि सोमक मोठ्या उत्साहाने पहात असतात. हत्ती चित्कारू लागतात व घोडे खिंकाळू लागतात. दोघे गदा घेऊन पहिला फटका मारण्यासाठी तयार होतात.

सल्य पर्व भाग तेहतिसावा संपला.

# सल्य पर्व
## भाग चौतिसावा

संजय पुढे सांगतो, सर्व तयारी झाली सगळे पांडव त्यांच्या आसनांवर विराजमान झाले द्वंद्व पहाण्यासाठी व आता द्वंद्व सुरू होणार इतक्यात त्या सगळ्यांना दुरून बलरामाचा रथ येतांना दिसतो. ज्याचे ते दोघे शिष्य होते. बलरामाच्या ध्वजावर ताडेचे झाड चितारले होते. त्याशिवाय त्याचे आयुध नांगरसुद्धा दाखवला होता. त्याला येतांना पाहून ते सगळे आनंदी होतात. बलराम कृष्ण आणि अर्जुनाकडे एक कटाक्ष टाकतो. त्यानंतर द्वंद्वाच्या तयारीत असलेले भिम व दुर्योधन पहातो. तो बोलतो त्याचे आसन ग्रहण केल्यानंतर, "मी बेचाळीस दिवस तिर्थयात्रा करत होतो. पुष्य नक्षत्रात मी निघालो व आता श्रावण आहे तो परत आलो आहे. मला त्या माझ्या शिष्यांचे द्वंद्व पहावयाचे आहे. भिम व दुर्योधन रणक्षेत्री युद्ध सुरू करण्याची प्रतिक्षा करत होते. दोघे त्यांच्या गदा घेऊन सज्ज होते. युधिष्ठीर बलरामाला मिठी मारतो. तो बलराम सगळ्यांची वास्तपुस्त करतो. कृष्ण व अर्जुन त्याचे स्वागत करतात मोठ्या आनंदाने. त्याच प्रमाणे माद्रीची मुलंसुद्धा त्याला प्रणाम करतात. त्यानंतर द्रौपदीची मुलं त्यांच्या पाया पडतात. भिमसेन व दुर्योधन त्याची पुजा करतात. त्यानंतर पांचालांचे, श्रींजयाचे अशांची तो चौकशी करतो. सगळ्यांचे ईष्टचिंतन झाल्यावर तो बोलण्यासाठी बसतात. युधिष्ठीर त्या द्वंद्वांमागील भूमिका बलरामाला सांगतो. निळे कपडे घातलेला गोरापान वर्ण असलेला बलराम ते ऐकत असतो. त्यानंतर ते भयंकर युद्ध प्रारंभ होते. त्या दोन पक्षांच्या वैरभावाचा अंत करण्यासाठी ते योजलेले होते.

सल्य पर्व भाग चौतिसावा संपला.

# सल्य पर्व

## भाग पस्तिसावा

जनमेजय वैशंपायनाना बोलतो, पांडव कौरव युद्धाच्या सुरूवातीला बलराम कृष्णाचा निरोप घेऊन तीर्थयात्रेला गेला होता. त्याच्याबरोबर त्याचे वृश्नी सहकारी होते. जातांना तो कृष्णाला बोलला होता, "मी त्या दोघांपैकी कोणालाही मदत करणार नाही. मी त्या काळात तिर्थयात्रा करणार आहे. मला गृहकलह आवडत नाहीत". असें बोलून तो गेला होता. जनमेजय विचारतो, "मला त्याच्या तिर्थयात्रेची माहिती सांगा अहो ब्राह्मणा. ते त्या क्षेत्री कसे पोहोचले व त्यांनी ते द्वंद्व कसे पाहिले ते मला सांगा".

वैशंपायन सांगतात, पांडवांनी उपप्लव्यात जागा मिळवली, त्यानंतर पांडव कृष्णाला शांतता करण्यासाठी हस्तिनापूरी पाठवतात. कृष्ण सगळ्यांच्या भल्याचा प्रस्ताव मांडतो त्या राजसभेमध्ये. तरी दुर्योधनाच्या हट्टीपणामुळें शांतता प्रस्ताव मान्य होत नाही. उलट त्या प्रयत्नाची खिल्ली उडवली जाते. त्या शिष्टाईत अपयश आल्यानंतर कृष्ण पांडवांना सांगतो कीं, दुर्दैवाने कौरव माझे ऐकावयाला तयार नाहीत. आता युद्धाशिवाय पर्याय दिसत नाही. त्यावेळी पुष्य नक्षत्र होते, त्यावेळी दोनही बाजूची लष्करं तयार होत होती. त्यावेळी दोस्त जमवण्यासाठी दोनही बाजूचे निरनिराळ्या राजांना भेटण्याला जाऊ लागतात. त्यावेळी रोहीणीचा मुलगा बलराम कृष्णाला बोलतो कीं, आपण कुरु पक्षाला मदत करू. परंतु, कृष्ण पांडवांच्या बाजूने सुरूवातीपासून होता. त्या मतभेदामुळें बलराम चिडला व तिर्थयात्रेला गेला. भोज प्रमुख कृतवर्मन बलरामाच्याच मताचा होता व म्हणून तो दुर्योधनाला मिळाला. युयुधन (सत्यकी) वासुदेवाबरोबर पांडवांना मिळाला. बलराम तिर्थयात्रेला गेल्यावर कृष्ण पांडवांकडे निघाला. बलराम यात्रेच्या सामुग्री जमा करू लागला होता. त्यामध्ये पवित्र अग्नी मुख्य होता. त्याप्रमाणे पुरोहित, सोने, चांदी, जनावरं, कपडे, गाड्या, खेचरं, उंट, दुभती जनावरं, त्याशिवाय इतर सामुग्री ते जमा करतात. ते सगळे घेऊन ते सरस्वती नदीच्या दिशेने प्रस्थान करतात. त्यांच्या बरोबर बरेच ब्राह्मण साथीला असतात. त्याशिवाय नोकर चाकर, स्वयंपाकी असा बराच समुह त्याच्या बरोबर निघतो. त्याच वेळी कौरव पांडव

युद्धाच्या गरम गोष्टी रंगत होत्या. बलराम विविध तिर्थक्षेत्री दर्शनं घेतो. त्या तिर्थयात्रेने ब्राह्मणांचे समाधान होते कारण त्यांना मद्य, सरबतं, मांस असे चांगले खाण्यासाठी दिले जात होते. तसे करून क्षत्रिय ब्राह्मणांचे आशिर्वाद घेत होते. त्या तिर्थयात्रेचे सगळे सदस्य खूष होते. जातांना ते इतर प्रवाशांना मदत करत होते. सगळे आनंदमय होते. बलराम विविध चीजा दानात देत होता. तशारितीने फिरत फिरत तो अखेरीस कुरुक्षेत्री आलेला असतो जेथे युद्ध होत होते.

जनमेजय विचारतो, "मला सांगा गुरुवर्य सरस्वती नदीच्या तटावरील तिर्थक्षेत्राचे महत्व काय? तेथे कोणत्या विधी कराव्या लागतात"? मला ते समजून घेण्याची फार उत्कंठा आहे.

वैशंपायन सांगतात, तिर्थांचा विषय फार विशाल आहे. तरी मी त्यांची माहिती सांगणार आहे. बलराम प्रथम प्रभास तिर्थी जातो. त्याची देवता आहे सोम. कारण तेथे सोमाचा विकार बरा झाला होता. त्याची शक्ती त्याला पुन्हा प्राप्त झाली होती. म्हणून त्या क्षेत्राला प्रभास असे नांव आहे. जनमेजय विचारतो, सोमाला कां तो विकार झाला होता"? त्या पाण्यात स्नान केल्याने कां माणसाला शक्ती प्राप्त होते"?

वैशंपायन सांगतात, दक्ष राजाला सत्ताविस मुली होत्या. त्यांचा विविह तो सोमाशी लावतो. त्या बायका त्या त्या नक्षत्राशी जुडलेल्या होत्या. सोम मनुष्याला काळाचे मापन करण्यात मदत करत होता. त्याच्या सगळ्या बायका फार सुंदर होत्या. त्यात रोहीणी जास्त सुंदर होती. सोम तिच्यात जास्त रमला होता. ती सुद्धा त्याच्यात जास्त रमली होती. त्यामुळें इतर बायका तिचा मत्सर करू लागतात. त्या दक्षाकडे तक्रार करतात. त्या पित्याला सांगतात कीं, सोम त्यांच्या बरोबर वागत नाही. तो फक्त रोहीणीसह असतो. दक्ष ते ऐकून तो सोमाला सांगतो, "जा आणि सगळ्या बायकांबरोबर संसार कर. सगळ्यांना सारखे वागव. त्यानंतर त्या दक्षाच्या मुली घरी जातात परंतु, सोमाचे वागणे बदलत नाही. त्या मुली पुन्हा दक्षाला भेटतात. दक्ष सोमाला ताकीद देतो कीं, जर त्याने त्याचे वागणे सुधारले नाही तर तो त्याला शाप देईल. तेवढे होऊनही सोमाची वर्तणूक बदलत नाही. पुन्हा त्या बायका त्यांच्या पित्याला सांगतात कीं, सोम बदललेला नाही. त्याचे आमच्यावर प्रेम नाही.

जबरदस्तीने प्रेम करता येत नाही. ते ऐकल्यावर रागावलेला दक्ष सोमाला क्षयाचा शाप देतो. सोम त्या व्याधीपासून मुक्त होण्याचा प्रयत्न करतो परंतु, ती बरी होत नाही. क्षयाच्या विकाराने तो दिवसें दिवस क्षीण होत असतो. तो विविध यज्ञ करतो परंतु, व्यर्थ. तो बरा होऊ शकत नाही. त्यामुळें जगातील वनस्पती सुद्धा क्षीण होऊ लागल्या. त्या बेचव झाल्या, रसाळ फळं लागेनात. त्याचा परिणाम शाकाहारी प्राण्यांवर व त्यांना खाणार्या मांसाहारी प्राण्यांवर होऊ लागला. सगळे देव सोमाला विचारू लागता कीं, तो असा क्षीण कां होत आहे. त्याला ते बोलतात, आम्हाला सांग काय आहे ते. आम्ही त्यावर इलाज शोधू. ते ऐकल्यावर सोम त्याच्या क्षीण होण्याचे कारण तो शाप आहे ते सांगतो. देव दक्षाकडे जातात. ते त्याला विनवणी करतात कीं, त्याचा शाप काढून टाकावा. सोमाच्या क्षीण होण्याचा परिणाम सगळ्या चराचरांवर होत आहे ते देव दक्षाला सांगतात. दक्ष सांगतो, मी माझा शाप मागे घेऊ शकत नाही. त्या शापाला एकच उपाय आहे व तो असा कीं, सोम सगळ्या त्याच्या बायकांना रोहीणी बरोबरीने वागवेल. त्याचप्रमाणे सरस्वती नदीत स्नान केल्याने त्याचा क्षय विकार नाहीसा होईल. त्यानंतर सोम महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात मोठा होतो व दुसर्या पंधरवड्यात पुन्हा क्षीण होतो. त्याचप्रमाणे महादेवांने त्याला त्याच्या माथ्यावर धारण केले पाहिजे. ते ऐकल्यावर सोम सरस्वती नदीच्या किनारी प्रभास येथे पोहोचला. तेथे स्नान केले आणि त्याचा रोग गेला. ते समजल्यावर सगळे प्राणी प्रभास कडे जाऊ लागले. त्यानंतर सोम दक्षाला भेटतो. दक्ष सोमाला सांगतो, पत्नीचा कधी अपमान करू नकोस. माझ्या आज्ञांचे पालन कर. त्यानंतर सगळीकडे आनंद होतो. मी तुला प्रभासचे महत्व सांगितले. त्या तिर्थक्षेत्रानंतर बलराम चमसोद्भेदा नांवाच्या तिर्थक्षेत्री जातो. तेथे ब्राह्मणांना मौल्यवान चीजांचे दान करावयाचे असते. बलराम तेथे एकरात्र रहातो व अर्घ्य करतो. त्यानंतर तो उदपन तिर्थक्षेत्री जातो. तेथे सरस्वती भूमित लुप्त होते. तेथे असलेल्या हिरव्यागार वनस्पतीमुळें समजते कीं ती नदी जमिनी खालून वहात आहे.

सल्य पर्व भाग पस्तिसावा संपला.

# सल्य पर्व

## भाग छत्तिसावा

वैशंपायन पुढे सांगतात, उदपन तिर्थी महान ऋषी त्रित रहात असें. त्या तिर्थावर बलराम दानं करतो व स्नानाचा आनंद घेतो. पुण्यवान त्रित ऋषी तेथे सोमरसाचा स्वाद घेतात. त्याचे दोन भाऊ त्याला एका खड्ड्यात टाकतात. त्यानंतर ते त्यांच्या घरी जातात. त्रित त्यांना शाप देतो.

जनमेजय विचारतो, अहो ब्राह्मणा, त्रित त्याच्या भावांना कां शाप देतो? त्याचे भाऊ त्याला खड्ड्यात कां टाकतात? उदपनाचे मूळ काय? त्याचे भाऊ त्याला टाकल्यानंतर कसे घरी परत जातात? त्रित सोम कां पितो? त्रित यज्ञ कसा करतो"? मला सगळे सांगा.

वैशंपायन सांगतात, गेल्या युगात ते तीन भाऊ होऊन गेले. त्यांची नावं एकता, द्विता आणि त्रिता. ते सगळे सूर्यासारखे तेजस्वी होते. ते साक्षात देव होते. त्यांचे स्थान प्रजापति सारखे होते. त्याना मुलं होतात. ते ब्रह्माच्या ध्यानात सदैव मग्न असतं. त्यांच्या तपस्येमुळे व व्रतस्थ जीवनामुळे, त्यांचे पिता गौतम ऋषी संतुष्ट असतात. जे स्वतः फार मोठे तपस्वी होते. आपल्या मुलांबरोबर सुखाने आयुष्य कंठल्यानंतर ते निजधामाला जातात. गोतमाचे जे राजे यजमान होते ते त्याच्या मुलांना त्यांचे गुरूस्थानी योजतात. त्या तिघातील त्रित त्याच्या पित्यासारखाच उच्च दर्जाचा तपस्वी होता. त्याला स्वार्थ अजिबात नव्हता. तो त्याच्या दिवंगत पित्याची पितर म्हणून सदैव पुजा करत असें. एकदा असे होते कीं, त्याचे दोन मोठे भाऊ एकता व द्विता एक यज्ञ करण्याचे ठरवतात. ज्यामुळे त्यांना धनप्राप्ती होईल अशी त्यांची अपेक्षा असते. त्रित मात्र त्यात नसतो तो त्याच्या पित्यासारखा तपस्या व व्रतस्थता अशी जीवनात रमला होता. त्यासाठी ते दोघे धनाच्या लोभात अडकलेले त्रिताला घेऊन त्यांच्या यजमानांकडे जातात, तेथे त्यांना खाण्यासाठी ते यजमान कांहीं गाई दान करतात. त्याशिवाय ते सोमरसाचे यथेच्छ प्राशन करतात. त्यानंतर ते तिघे त्यांना मिळालेले पशू घेऊन पूर्व दिशेकडे निघतात. निष्पाप त्रिता त्याच्या भावांबरोबर जात असतो. एकता

व द्विता त्याच्या मागून जात असतात. ते दोघे लोभ दोषाच्या आहारी गेलेले ठरवतात कीं, ते सगळे प्राणी व दानात मिळालेले धन वाटून घेतील व त्रिताचा हिस्सासुद्धा ते गिळंकृत करतील त्यासाठी मात्र त्यांना त्रिताला नष्ट करावे लागेल. त्या पापी विचाराने प्रेरित झालेले ते दोघे त्रिताचा काटा कसा काढावयाचा त्याचा विचार करू लागतात. त्याचवेळी त्यांना लक्षात येते कीं, जो यज्ञ ते करू इच्छितात तो करण्यासाठी त्यांना त्रिता पाहिजे. तो वेदशास्त्र संपन्न आहे. तो इतरत्र दान मिळवू शकतो. म्हणून ते ठरवतात कीं, त्रिताला कोठेतरी अडकवून दानात मिळालेली जनावरं घेऊन ते पोबारा करतील. असे विचार त्यांच्या मनात येत असतांना रात्र होते व त्यांना समोर एक लांडगा येतांना दिसतो. त्या जवळ एक खोल खाई त्यांना दिसते. त्रिता त्याच्या भावांच्या पुष्कळ पुढे होता व तो लांडगा पाहून तो पळू लागतो. त्यावेळी अंधार असल्याने त्याला वाटेत असलेला मोठ्या खाईत जाऊन पडतो. त्या खोल खाईत तो खाली जातो. त्रिता मदतीसाठी हाका मारू लागतो. त्याचे दोन भाऊ त्या ऐकतात पण त्याला मदत करण्यासाठी ते जात नाहीत. ते दोघे त्या पशूंबरोबर पळत दूर जातात. त्रिता तसाच मदतीशिवाय त्या खाईत पडलेला असतो. त्रिताला तो खड्डा नरकासारखा वाटतो. त्याला वाटते कीं तो आता मरणार. तो समजतो कीं, जर त्याला सोम प्यायला मिळाले तरच तो त्या खड्यातून बाहेर येऊ शकेल. तो तेथे असलेल्या पाण्यात यज्ञ करू लागतो जो सर्वस्वी काल्पनिक होता. तेथे असलेले एक वेल सोमाचे आहे असें तो समजतो व त्याचा रस तो काढतो. तो रस त्रिता सोमरस म्हणून पितो. ते सगळे काल्पनिक होते. त्यानंतर तो ऋचा व साम गाऊ लागतो जे यज्ञासाठी जरूरीचे होते. कांहीं पाणी तो तूप म्हणून त्या काल्पनिक यज्ञात देतो. जेथे कांहीं अग्नी वगैरे प्रत्यक्ष नव्हते. तेथे असलेले दगड गोटे तो यज्ञासाठी आहुती म्हणून देतो त्या काल्पनिक अग्नीमध्ये. अहो जनमेजय राजे तो एक काल्पनिक यज्ञ त्याने केला होता परंतु, त्यामागील भावना मात्र प्रामाणिक होती. तो मोठ्याने मंत्र गाऊ लागला तो आवाज स्वर्गापर्यंत गेला. त्यानंतर ब्रह्माला आवाहन करून तो त्याचा काल्पनिक यज्ञ संपन्न करतो. स्वर्गातील ऋषी ते पहातात. त्याच्या त्या मनापासून केलेल्या यज्ञामुळे सगळे देवगण अस्वस्थ होतात. कोणालाही माहित नव्हते त्यांने असा यज्ञ कां केला. ब्रह्मदेवांना तो आवाज ऐकू जातो. सगळे ऋषी

बोलतात एकमेकांना कीं, ते त्रिताच्या यज्ञाकरता तेथे गेल पाहिजेत. तो बोलतात कीं, त्रिता मोठा तपस्वी आहे रागावला तर तो नवीन देव उत्पन्न करू शकतो. त्याला शांत केले पाहिजे. ते सगळे त्रिता ज्या खाईत होता तेथे पोहोचतात. ते जाऊन पहातात कीं, त्रिता तेथे यज्ञाजवळ ध्यानात बसला आहे. त्रिता त्याना पहातो. देव त्याला बोलता कीं, त्यांचा यज्ञातील हिस्सा त्याने द्यावा. त्रिता सांगतो कीं, त्याने देवांना मदतीच्या अपेक्षेने तो यज्ञ एक आवाहन म्हणून केला आहे म्हणजे ते त्याला त्या खोल खाईतून बाहेर काढतील. ते ऐकून त्रिताच्या निष्पापतेने ते संतुष्ट होतात. त्रिता त्यांना एक एक दगड त्यांचा हिस्सा म्हणून देतो. देव त्याने संतुष्ट झाले. ते त्याला विचारतात, "तुला कोणता वर पाहिजे"? तो सांगतो कीं, त्याला ह्या खाईतून बाहेर काढावे. त्याची ती मामुली मागणी ऐकून देव आणखीनच त्याच्यावर संतुष्ट होतात. देव त्याला खरे सोम प्यायला देतात. त्यावेळी सरस्वती नदी तेथे उपस्थित होते, त्रिताला उचलून वर आणते. बाहेर आल्यावर त्रिता त्या सगळ्या देवतांचे व सरस्वती नदीचे आभार मानतो. सगळे आपापल्या ठिकाणी जातात. त्रिता मोठ्या आनंदाने त्याच्या घरी जातो वेदातील कवनं गात. घरी आल्यावर त्याला त्याचे भाऊ तेथे दिसतात. त्याला त्यांचा फार राग येतो. तो त्यांना कठोर बोलून त्यांची निर्भत्सना करतो. त्याला खाईत सोडून जाणे त्यांना शोभले नाही असे बोलून तो त्यांना दोष देतो. त्यांच्या स्वार्थीपणा बद्दल त्यांची कानउघडणी करतो. तो त्यांना शाप देतो कीं ते भयंकर लांडगे होतील. त्यांची संततिसुद्धा तशीच हिंस्र श्वापदाच्या रुपात जगात वावरेल असा तो शाप होता. त्या शापामुळे लवकरच तो दोघे त्या प्रमाणे श्वापदात रुपांतरित होतात. त्या मुळे ते तिर्थक्षेत्र म्हणून समजले जाऊ लागले. बलराम त्या नदीत स्नान करतात. ते दानं करतात, त्यानंतर बलराम त्याच्या आश्रितांच्या बरोबर विनाशन तिर्थी जातात. तेसुद्धा सरस्वतीच्या किनारी आहे.

सल्य पर्व भाग छत्तिसावा संपला.

# सल्य पर्व

## भाग सदोतिसावा

वैशंपायन पुढे सांगतात, बलराम विनाशन तिर्थाकडे निघतात. तेथे सरस्वती नदी भूगर्भात लुप्त होते कारण तिने शुद्र आणि अभिरांचा उपमर्द केला होता. त्या कारणामुळे ती लुप्त होते म्हणून ऋषी व ब्राह्मण त्या तिर्थक्षेत्राला विनाशन असें संबोधतात. तेथे स्नान केल्यानंतर तो सुभूमिक नावांच्या तिर्थक्षेत्री जातो. त्या तलावात कित्येक सुंदर अप्सरा, गंधर्व खेळत बागडत असतात. अनेक देव त्या स्थानाला वेळोवेळी भेट देत असतात. असें समजतात कीं, साक्षात ब्रह्म तेथे निवास करतात. तेथे बलराम ब्राह्मणाना दान धर्म करतो. तेथे अप्सरांची स्वर्गीय गाणी तो ऐकतो. तेथे त्याला देवांच्या सावल्या दिसतात. गंधर्व आणि राक्षस सुद्धा त्या तिर्थाला जात असतात. विश्ववसूच्या नेतृत्वाखाली अनेक गंधर्व तेथे जात असतात. तेथे ब्राह्मणांना खाण्यासाठी शेळ्या, मेंढ्या दान केल्या बलरामाने. त्याशिवाय भार वाहक पशू उंट, खेचर सुद्धा दान केले जातात त्या तिर्थावर. अशा दानामुळे ब्राह्मण संतुष्ट होऊन दात्याला आशिर्वाद देतात. बलराम त्यानंतर त्याच्या बरोबर असलेल्या ब्राह्मणांना घेऊन तो गर्गस्रोत नावांच्या तिर्थक्षेत्री जातो. असे समजतात कीं, प्राचीन ज्योतिषी गर्गमुनी तेथे साधना करत होते. म्हणून ते तिर्थक्षेत्र झाले होते. तेथे अनेक ऋषी गर्गाची भेट घेण्यासाठी जात असत. त्यानंतर निळे कपडे नेसणारा कृष्णाचा मोठा भाऊ शंख नावांच्या क्षेत्री जातो. तेथे एक मोठा वृक्ष दिसतो. त्या वृक्षाचे नांव आहे महाशंख. मेरू सारखा अवाढव्य पूर्ण शुभ्र, ज्याच्या दर्शनासाठी ऋषी जात असतात. तेथे यक्षांची, राक्षसांची व विद्याधर ह्यांच्या वस्त्या तो पहातो. तेथे सिद्ध असंख्य तो पहातो. ते सर्वत्याग केलेले तपस्या करत असलेले तो पहातो. तेथे महाप्रतापी पिशाच्चसुद्धा तो पहातो. ते सामान्य माणसांना दिसत नाहीत. ते तिर्थक्षेत्र जगप्रसिद्ध आहे. तेथे बलराम दुभत्या गायींचे दान ब्राह्मणांना करतो. त्याप्रमाणे तांब्याची, चांदीची भांडीसुद्धा दान करत होता. त्याची पुजा दान स्वीकारणारे ब्राह्मण करतात. त्यानंतर तो द्वैत सरोवराकडे निघतो. तेथे अनेक योगी त्यांच्या विविधपूर्ण पेहेरावात वावरत असलेले तो पहातो.

त्यानंतर सरस्वती नदीच्या दक्षिण तटाकडे तो जातो. तेथून तो नागधन्वन क्षेत्री पोहोचतो. तेथे दिवसा ढवळ्या विविध प्रकारचे साप वावरत होते. तेथे हजारो ऋषी कायम वस्ती करून असतात. तेथे नागांचा राजा वासुकी रहातो असे म्हणतात. तेथील साप चावत नाहीत म्हणून तेथे वावरण्यात कांहीं धोका नव्हता. त्यानंतर तो पूर्वेकडे प्रवास करू लागतो, वाटेत अनेक छोटी मोठी क्षेत्रे तो पहातो. तेथे स्नान करणे व उपोशण करणे असे व्रत तो आचरत त्याची यात्रा करत असतो. त्याठिकाणाहून तो ते संन्याशी सांगत त्या प्रमाणे प्रवास करत विविध क्षेत्रे पहात जात असतो. त्याचे प्रवास सरस्वती नदीच्या किनार्याचे होत होता. आता तो निमिषारण्याकडे पोहोचतो. तेथे नदी तिची प्रवाह दिशा बदलत होती. ते पाहून त्याला नवल वाटत होते.

जनमेजय बोलतो, "नदी तिचा प्रवाह पूर्वेकडे कां वळवते ते सांगा, ब्राह्मणा, तुम्ही ते मला सांगितले पाहिजे. ते नदीचे पात्र दिशा बदलते ते पाहून यदू राजाला नवल कां वाटले ते सुद्धा सांगा. ती अतिप्राचीन नदी तिचे पात्र कां वळवते ते मला सांगा".

वैशंपायन सांगतात, कृत युगात निमिषात रहाणारे संन्याशी मोठे यज्ञ करत असतं. ते बारा वर्षे चालत असतं. त्यातील पुष्कळ यज्ञाचे झाल्यावर एकत्रपणे इतर तिर्थ क्षेत्री जात असतं. त्यांच्या मोठ्या संख्येमुळे नदीच्या तटावर माणसांच्या मोठ्या वस्त्या झाल्या होत्या. कांहीं तपस्वी त्या वस्त्यात कायम राहू लागले होते. त्याला समंतपंचक पर्यंत पसरलेले होते. त्या सगळ्या प्रदेशात वेदाचे आवाज उठत होते. यज्ञ केले जात होते. वालखिल्य (आंगठ्या एवढे), अस्मकुट (दगडाने कणसं फोडणारे), दंतोलखलीन (दाताने कणसं सोलणारे), सत्नप्रक्षंत (जमिनीवर सांडलेले वेचून खाणारे) आणि इतर तेथे मोठी वस्ती करत होते. त्या शिवाय केवळ हवा पिणारे, केवळ पाणी पिणारे, केवळ पानं खाणारे, केवळ फळं खाणारे असेसुद्धा तेथे व्रतस्थ ऋषी रहात होते. कांहीं जमिनीवर झोपणारे तर कोणी पानांवर झोपणारे कोणी दगडावर झोपणारे असेंसुद्धा तपस्वी तेथे नदीच्या तटावर रहात होते. त्यांची ध्यान साधना सातत्याने होत होती त्यामुळे तेथे मोठ्या प्रमाणात अध्यात्मिक उर्जा विकसित होती व म्हणून तो परिसर पवित्र झाला होता. अशा क्षेत्रांना तिर्थक्षेत्र समजले जात होते. सरस्वती नदी स्वर्गातील मंदाकीनीच्या योग्यतेची झाली होती. त्या संन्याशांची संख्या वाढत होती त्या

सगळ्यांसाठी तेथे पुरेशी जागा नव्हती. सरस्वती पहाते कीं, त्या सगळ्यांना पुरेल इतकी जागा तिच्या किनार्यावर नाही. ऋषीच्या कृपेने तिचे पात्र पश्चिमेकडे वळते ज्यामुळे जास्त जागा उपलब्ध होते त्यां ऋषीना त्यांचे यज्ञ करण्यासाठी. त्या नवीन प्रदेशात मोकळी जागा मिळाल्याने नदीचे पात्र विशाल झाले त्यामुळे अधिक ऋषी त्यांचे यज्ञ करू शकत होते. ती बोलते, "माझे पात्र विशाल झाले आहे त्यामुळे जास्त ऋषी तेथे यज्ञ करू शकतील. अशारितीने त्या नदीने एक मोठे कार्य केले होते. त्या नवीन प्रदेशात निमिषारण्याचा विस्तार झाला. तेथे बलरामाने ब्राह्मणांना दानं केली. त्यानंतर तो कुरुक्षेत्री पोहोचतो. तेथे तो यज्ञ करतो. नदीचे विशाल पात्र पाहून रामाला आनंद होतो. त्या सगळ्या सरस्वती नदीच्या किनारी असलेल्या तिर्थक्षेत्रांना सप्तसारस्वत असें म्हणतात. त्याठिकाणी विविध रंगीबेरंगी पक्षी असतात. वड, इंगुड, काश्मर्य, पलाश, अश्वत्थ, विभितक, कंकोळ, पिलू असे वृक्ष मोठ्या संख्येने होते. सरस्वती नदीचा किनारा त्यांनी भरलेला होता. त्याशिवाय करूशक, बिल्व, अमृत, अतिमुक्ती, कशांद, पारिजात अशा फुलांच्या वृक्षाने डवरलेला होता. त्याशिवाय सर्वत्र कर्दळीची वन होती. त्या वनश्रीने भरलेल्या सदैव प्रसन्न असणार्या प्रदेशात विविध प्रकारे साधना करणार्या अनेक संन्याशांच्या टोळ्या वस्ती करून होत्या. तेथे वेदांचा घोष होत होता. वासना विरहीत असलेले पवित्र लोक तेथे रहात होते. तेथे विविध प्रकारचे प्राणी सुद्धा रहात होते. सगळे एकमेकांना सांभाळून रहात होते. बलराम सप्तसारस्वत क्षेत्री पोहोचला. त्या क्षेत्री महान ऋषी मनकानक मोठी तपस्या करत होता.

सल्य पर्व भाग सदोतिसावा संपला.

# सल्य पर्व
## भाग अडोतिसावा

जनमेजय विचारतो, "अहो ब्राह्मणा, मला सांगा त्या प्रदेशाला सप्त सारस्वत असे नांव कां दिले गेले? मनकनक कोण होते? त्याला कसले यश प्राप्त झाले? त्याच्या साधनेतील व्रतस्थता कशाची होती? तो कोणाचा मुलगा होता, कोणत्या पुस्तकांतून त्याने ज्ञान मिळवले"? मला ते सगळे सांगा.

वैशंपायन सांगतात, अरे राजन, सरस्वती सगळ्या जगात पसरलेली आहे. विविध रुपाने. कोणी महान ऋषी त्यांना बोलावतो तर ती त्याच्याकडे उपस्थित होते असा परिपाठ आहे. त्या सात प्रकारच्या असतात. सुप्रवा, कांचनाक्षी, विशाल, मनोरमा, ओघवती, शरयू, विमलोदका अशी त्याची नांवं आहेत. ब्रह्मदेवांने एकदा यज्ञ केला तेव्हां त्यासाठी मोठे ऋषी आले होते, यज्ञाच्या परिसरात मंत्रघोष होत होता. त्या यज्ञाची व्यवस्था अशी होती कीं देव त्यावर बेहद्द खूष झाले होते. त्या यज्ञाचा उद्देश सगळ्यांना समृद्धी प्राप्त व्हावी असा होता. तो यज्ञ करतांना कांही गोष्ट पाहिजे असेल तर ती आपोआप तेथे उपस्थित होत होती. गंधर्व गात होते व अप्सरा नृत्य करत होत्या. त्याच्या साथीला दैवी वाद्यवृंद होते. त्या व्यवस्थेने देव संतुष्ट झाले होते मग माणसाची काय कथा. तो यज्ञ पुष्कर स्थानी होत होता. कांहीं मान्यवर ऋषी तक्रार करतात कीं, त्यांत सरस्वती नदीला आमंत्रण नाही हे योग्य झाले नाही. त्या बरोबर ब्रह्मदेव सरस्वतीचे स्मरण करतात. त्याबरोबर सरस्वती सुप्रवा म्हणून उपस्थित झाली. ती ब्रह्मदेवाला नमन करते. अशारितीने पुष्कर मध्ये सरस्वती सुप्रवा म्हणून आढळते. पुन्हा एकदा अनेक ऋषी नैमिषात असतांना वेदाचा अभ्यास करतांना ते सरस्वतीचे स्मरण करतात. तेथे ती कांचनाक्षी म्हणून अवतरते. ती तेथून वाहू लागते. जेव्हां राजा गया यज्ञ करत होता, तो सरस्वतीला बोलावतो, तेव्हा ती विशाल रुपात उपस्थित होते. राजा औदलक यज्ञ करतो तेव्हां तो सरस्वतीचे स्मरण करतो तेव्हां ती मनोरमा नावांने तेथे अवतरते. महान राजा कुरु एकदा यज्ञ करतांना त्याचे पौरोहित्य करणारे वसिष्ठ सरस्वतीचे स्मरण करतात, तेव्हां ती ओघवतीच्या रुपाने तेथे उपस्थित होते. फार

प्राचीन काळी दक्ष प्रजापति गंगेच्या काठी सरस्वतीचे स्मरण करतो तेव्हां शरयू उत्पन्न होते. पुन्हा एकदा ब्रह्मदेव यज्ञ करत असतांना सरस्वतीचे स्मरण करतात, तेथे ती सगळ्या सात रुपात अवतरते. त्या ठिकाणी बलराम गेला होता. त्या सगळ्या एकत्र होत्या म्हणून त्याना सप्त सारस्वत असे नांव मिळाले. अशारितीने त्या नद्यांची नांव झाली.

आता ऋषी मनकनकाची गोष्ट सांगतो. मनकनक त्याच्या बालपणापासून ब्रह्मचर्य पालन करत होता. नदीत अर्घ्य देतांना त्याला एक अतिसुदर कन्या दिसते. ती जवळच स्नान करत होती. तिचे उघडे शरीर त्याला दिसते. त्या दृष्यामुळें त्याचे वीर्य नकळतपणे नदीत सांडते. तो ते त्याच्या हाताच्या ओंजळीत घेतो. ते तो एका मडक्यात ठेवतो. ते सात भागात विभागले जाते आपसुकपणे. त्यांच्या पासून सात ऋषी जन्मतात. तेसुद्धा ब्रह्मचारी होते. त्यांतून एकोणपन्नास मरुत जन्मतात. ते मुळ ऋषी त्यांच्या नांवाने ओळखले जातात. ती अशी आहेत वायूवेग, वायूहन, वायूमंडल, वायूजात, वायूरेत, वायुचक्र, वायूबंध ते मरुतांचे पुर्वज समजले जातात. त्याची आणखीन विशेष गोष्ट आता सांगतो ती ऐक, त्या मरुतांच्या वागण्याची तर्हा विशेष होती. पुढे जेव्हां मनकनक त्याच्या तपस्येने पूर्णात्वाला गेला, त्याने एकदा स्वताला गवताच्या कुसाने जखम केली. त्यातून रक्ता ऐवजी वनस्पतीचा रस वाहू लागला त्याच्या इच्छेमुळे. ते पाहून त्याला अत्यानंद झाला व तो नांचू लागला. त्याला नांचतांना पाहून सगळे चराचर आश्चर्य करू लागले. सगळ्या वनस्पती सुद्धा नाचू लागल्या. ते पाहून ब्रह्मदेव व इतर ऋषी त्याचा विचार करू लागले. जे घडले ते योग्य नाही असें ते समजतात. ते त्याला विचारतात, "अहो ब्राह्मण, आपण असें कां नांचत अहात"? महादेव ते समजतात. ते त्याला बोलतात, "अरे जे घडले ते सृष्टीच्या नियमां विरूद्ध आहे. त्यात एवढा संतोष करण्यासारखे काय आहे"? ऋषी बोलतो, पहा वनस्पतीचा रस माझ्या नसातून वाहत आहे. ते अवचित पाहून मला गंमत वाटली म्हणून मी नांचत आहे. ते पाहून महादेव त्याला सांगतात कीं, त्यात विशेष असे काय आहे. असे बोलून महादेव त्यांच्या हाताला जखम करतात. तेव्हां त्यातून उदी येऊ लागते. ते पाहून मनकनक नवल करतो. त्याला स्वताची शरम वाटू लागते. मनकनक महादेवाला

बोलतो, "आपण साक्षात रुद्र अहात जगाचे कर्ते अहात. जगाच्या अंती सगळे आपल्यामध्ये विसावते. आपल्याला समजणे देवांनासुद्धा शक्य होत नाही मग मला कसे समजणार"? "आपल्या कृपेमुळें देव मजेत रहात असतात. माझ्या कडून मोठी चूक झाली कीं, मी ब्रह्माच्या इच्छे विपरीत इच्छा केली, अज्ञानामुळे. जग चालण्यासाठी जे नियम केले आहेत ते मोडणे पाप आहे. ते माझ्याकडून झाले आहे त्या करता मला क्षमा करा"? मनकनकाला समजते कीं मर्यादा राखून आपली सिद्धी वापरावयाची असते. महादेव त्याला प्रेमांने सांगतात कीं जे घडले ते तू मुद्दाम नियम मोडण्यासाठी केले नव्हतेस. म्हणून तुला पाप लागत नाही. तो एक बालिशपणा होता. महादेव त्याला बोलतात कीं, त्याची तपस्या अशीच वृद्धीगत होत जाईल. त्यांने त्याची सिद्धी ब्रह्माला सृष्टी चालवण्याच्या कामासाठी द्यावी व ब्रह्माला मदत करावी जसे सगळे सिद्ध ऋषी करतात. निसर्गाचे नियम मोडणे असुरांचे, दैत्यांचे काम आहे. ते तू करू नकोस. तू एक चांगला ऋषी आहेस म्हणून तसेच काम कर. मनकनक ते मान्य करतो. त्यानंतर मनकनक मोठा सिद्ध झाला. तो वायूपासून सुकन्येला झाला होता.

सल्य पर्व भाग अडोतिसावा संपला.

# सल्य पर्व

## भाग एकोणचाळीसावा

वैशंपायन सांगतात, एक रात्र तेथे तो बलराम रहातो. तेथे असलेल्या देवतांची पुजा करतो. मनकनकाला अभिवादन करतो. ब्राह्मणांना दानं करतो, दुसर्या दिवशी तेथून निघतो. त्यानंतर तो उशनास नांवाच्या तिर्थक्षेत्री जातो. त्या तिर्थाचे दुसरे नांव कपालमोचन असे आहे. पूर्वी दशरथाच्या रामाने राक्षस मारून त्याचे डोके लांब फेकले होते. ते ऋषी महोदराच्या मांडीवर पडले होते. त्या ठिकाणी स्नान केल्यानंतर तो मुक्त झाला होता. महाऋषी कवी अर्थात शुक्र येथेच तपस्या करत होते. शुक्राच्या नांवाने जे मुत्सद्दी विद्या जाणली जाते ती त्याला येथेच सुचली होती. तो दैत्य आणि दानवांचा गुरू होता.

जनमेजय विचारतो, "त्या क्षेत्राला कपालमोचन असं कां म्हणतात? ते राक्षसाचे शिर त्याच्या मांडीला कां चिकटले"?

वैशंपायन सांगतात, दशरथाचा राम त्या काळी दंडकारण्यात वनवासात होता तेव्हाची कथा आहे. तो ऋषींना त्रास देणार्या राक्षसांना ठार मारत होता. जनस्थानी तो एका वाईट राक्षसाचे मुंडके उडवतो. ते उंच उडून दूर जंगलात त्या ऋषीच्या मांडीवर जाऊन पडते. त्यावेळी तो ऋषी महोदर वनात भटकत होता. त्यामुळें तो ऋषी कोठे जाऊ शकत नव्हता. त्याच्या अंगाला चिकटलेले ते मुंडके कांही केल्या निघेना. सगळ्या तिर्थक्षेत्री जातो पण व्यर्थ. त्याला चौकशी केल्यावर ह्या उशनास तिर्थक्षेत्राचे समजते. महोदर तेथे जातो व स्नान करतो तेव्हां ते मुंडके त्याच्या पासून सुटे होते. तो सगळ्यांना तो प्रकार सांग सुटतो. ते ऐकणारे ऋषी त्यानंतर ह्या क्षेत्राला ते नांव देतात. तेथून बलराम ऋषंगू नावाच्या तिर्थक्षेत्री जातो. तेथे ऋषी अर्ष्टीसेनाचा आश्रम आहे. तेथे विश्वामित्रानी तपस्या केली होती. तेथे केलेली इच्छा पूर्ण होते असे समजतात. त्यानंतर तो त्या ठिकाणी जातो जेथे ऋषंगूने देहत्याग केला होता. ऋषंगू एक वृद्ध ब्राह्मण होता. त्याची तपस्या मोठी होती. तो त्याच्या मुलांना बोलतो कीं, त्याला अशा ठिकाणी न्यावे जेथे भरपून पाणी आहे. ते मुलगे त्यांच्या अतिवृद्ध पित्याला सरस्वती

नदीकडे नेतात. तो वृद्ध ब्राह्मण त्याच्या मुलांना सांगतो कीं त्याचा देह नदीच्या पलिकडील किनार्यावर न्यावा. तेथे जो मरेल त्याला मरण येणार नाही. बलराम त्या तिर्थ क्षेत्री स्नान करतो व दान करतो. त्यानंतर तो ब्रह्मदेवाने तयार केलेला पहाड पहातो. ज्याचे नांव होते लोकाकूल. तेथे महान ऋषी अर्ष्टीसेना जो कुरु वंशाचा होता, ब्रह्मऋषी झाला होता. त्या ठिकाणी ऋषी सिंधूद्विप आणि देवपी आणि विश्वामित्र अंतीम ज्ञान प्राप्त करून राहिले होते.

सल्य पर्व भाग एकोणचाळीसावा संपला.

# सल्य पर्व
## भाग चाळीसावा

जनमेजय बोलतो, "मला सांगा ऋषी अर्ष्टीसेन कां घोर तपस्या करतात. त्याच प्रमाणे सिंधूद्विपसुद्धा का ब्राह्मण होण्याचा प्रयत्न करतात? तसेंच देवपी, विश्वामित्र ते ब्राह्मण का होण्यासाठी तपस्या करतात? मला सांगा कारण त्यात मला उत्सुकता आहे".
वैशंपायन सांगतात, प्राचीन काळी कृतयुगात अर्ष्टीसेना नांवाचा ब्राह्मण होता. तो त्याच्या गुरूच्या घारात रहात होता. तो त्याचा अभ्यास नियमितपणे करत असे तरीसुद्धा तो वेदाचा अभ्यास पाहिजे तसा करू शकत नाही. त्यामुळे तो फार निराश झाला होता. ते सोडून तो तपस्या करू लागतो. त्या तपस्येमुळें त्याला वेदाचे ज्ञान होते. ते ह्या ठिकाणी होते. तेव्हां तो ह्या क्षेत्राला वर देतो कीं, जो कोणी येथे तपस्या करील व सरस्वती नदीत स्नान करील त्याला वेदाचे ज्ञान होईल. त्याप्रमाणे होऊ लागते व हे तिर्थक्षेत्र झाले. अर्ष्टीसेना आणखीन बोलतो कीं, ह्या ठिकाणी सर्प कोणालाही दंश करणार नाहीत.तसेंच कोणी श्वापद माणसाला त्रास देणार नाहीत. त्याप्रमाणे होत होते. त्याच युगात पुढे सिंधूद्विप आणि देवपी नावांचे क्षत्रिय येथे राहून ज्ञान प्राप्त करतात. त्याना ब्राह्मणपद प्राप्त होते. तसेंच राजा कौशिकाचा मुलगा घोर तपस्या करून ब्राह्मण पदाला जातो. एक मोठा क्षत्रिय राजा होता त्याचे नांव गधी. तोसुद्धा तसांच तपस्या करून सिद्ध झाला ह्या तिर्थ क्षेत्री. गधीचा मुलगा विश्वामित्र मोठाशूर योद्धा होता. गधी पुढे ज्ञानसाधनेसाठी गादी विश्वामित्राच्या हवाली करतो. विश्वामित्र ब्राह्मणांचा तिरस्कार करणारा होता. त्याला त्याच्या क्षात्रतेजाचा अभिमान होता. त्याला त्याच्या राज्याला त्रास देणार्या राक्षसांचे पारिपत्य करावयाचे होते. त्यासाठी तो वनात जातो. तेथे तो वसिष्ठ ऋषींच्या आश्रमात जातो. तेथे त्याला कामधेनू दिसते. ती मिळवण्यासाठी तो वसिष्ठांवर जबरदस्ती करतो. तेव्हां वसिष्ठ त्या कामधेनूला तिचे संरक्षण करण्यास सांगतात. त्यावेळी तिच्यातून असंख्य मायावी योद्धे बाहेर येतात व विश्वामित्राचा पराभव करतात. त्यातून विश्वामित्र समजतो कीं ब्राह्मण शक्ती क्षत्रियांपेक्षा वरचढ आहे. तो ब्राह्मण होण्यासाठी खूप प्रयत्न करतो. त्याचा तपोभंग करण्याचा

प्रयत्न देव करतात पण तो निश्चयाचा पक्का शेवटी ते साध्य करतो. त्याच्या तपस्येच्या प्रकाशापुढे सूर्य फिक्का पडला होता. अखेरीस ब्रह्मदेव त्याला ब्राह्मणपद देतात. ते पद प्राप्त झाल्यावर तो विश्वामित्र सगळी पृथ्वी फिरतो. त्याला ब्रह्मपद ह्या तिर्थक्षेत्री प्राप्त झाले होते. त्या नंतर बलराम वकाच्या आश्रमाकडे निघतो. जेथे दिल्व्य वक नांवाचा मुनी रहात असे.

सल्य पर्व भाग चाळीसावा संपला.

# सल्य पर्व

## भाग एकेचाळीसावा

वैशंपायन पुढे सांगतात, बलराम वकाच्या आश्रमाकडे जातो जेथे दिल्व्य वक नांवाचा ऋषी रहात असे. तेथे वेदांचा आवाज गाजत होता. त्याने रागाच्या भरात धृतराष्ट्राचे साम्राज्य यज्ञात आहूती म्हणून दिले होते. त्याचा यज्ञ बारा वर्षे होत होता. त्या यज्ञाच्या दरम्यान त्यातील भाग विश्वजित पूर्ण करून तो पांचालांच्या राज्यात जातो. ते त्याचे यथोच्च स्वागत करतात. त्याच्या कडे ऋषी एक वीस उत्तम वासरे दक्षिणा म्हणून मांगतो. त्याच्या बरोबर इतर ब्राह्मण असतात. तो त्यांना सांगतो कीं, तो आणखीन मोठ्या राजाकडे जाऊन दान मागणार आहे तेव्हां ह्या गाई तुम्ही वाटून घ्या. असें बोलून तो ऋषी मोठ्या आशेने हस्तिनापुरी धृतराष्ट्राच्या कडे जातो. तेथे तो धृतराष्ट्राकडे गाईचे दोन मागतो. त्याच सुमारास त्याच्या कांहीं गाई मरतात. त्यामुळें राजा रागावून वकाचा अपमान करतो. तो बोलतो तुझ्या अशुभ पायांमुळें त्याच्या गाई मेल्या. ते ऐकून नितीतत्त्व जाणणारा तो मुनी त्याला समजावतो कीं, त्याच्या गाई त्यांच्या प्राक्तनानुसार मेल्या आहेत त्यात माझा काय दोष? त्यानंतर झालेल्या अपमानामुळे संतापलेला तो ऋषी धृतराष्ट्राच्या नाशाची प्रतिज्ञा घेतो. आपल्या आश्रमात आल्यावर तो मेलेल्या गाईचे मांस काढून पवित्र अग्नी चेतावतो आणि होत असलेल्या यज्ञात त्या मांसाबरोबर धृतराष्ट्राचे राज्य आहूती म्हणून देतो. त्या नंतर धृतराष्ट्राचे राज्य विस्कळीत होऊ लागले. पुढे काय झाले ते आपण पहात आहोतच. त्याच्या राज्यात पाऊस पडेनासा झाला. लोकांनी वनातील झाडे कापून वनं नष्ट केली. शेती चांगली होईना. एका मागोमाग अरिष्ट उभी पाहू लागली. त्यात गृह कलहाने भर घातली होती. धृतराष्ट्र त्यामुळें चिंतेत होता. तो ब्राह्मणांचा सल्ला घेत असें पण कोणी त्यावर उपाय सांगू शकत नव्हता. राज्याला उतरती कळा लागली होती ती कांहीं केल्या थांबेना. त्याचे ब्राह्मण सुद्धा हवालदील झाले होते. राजा ते थांबवण्याचा उपाय शोधत असतो. त्याचे ज्योतिषी सांगतात कीं, त्याने मेलेल्या गुरांवरून कोण्या ऋषीचा शाप घेतला आहे त्यामुळे हे होत आहे. राजाला तो रागाने वकाला जे बोलला ते आठवते. वकाने तुझे

राज्य यज्ञात आहुती केले आहे गाईच्या मांसाबरोबर असें सांगितले. म्हणून हे अरिष्ट उत्पन्न झाले आहे. राजाला ते सांगतात कीं, त्याने वकाकडे जाऊन श्रमा याचना करावी. त्यानंतर सगळे सुधारेल. राजा वकाकडे जातो, त्याच्या पाया पडतो व केल्या चुकीची माफी मांगतो. माझ्यावर कृपा करा असें बोलतो. मी स्वार्थाने अंध झालो होतो म्हणून तसे बोललो अशी कबुली देतो. वकाला त्याची दया येते. तो त्याचे राज्य शापापासून मुक्त करतो. त्याचा राजावरील राग संपलेला असतो. त्या करतां पुन्हा तो यज्ञात दुसरी आहुती देतो व त्याला त्यातून मुक्त करतो. राजा त्याला अनेक पशू दान करतो. त्यामुळें वक संतुष्ट होतो. त्यापुढे धृतराष्ट्राचा उत्कर्ष होतो. त्या तिर्थात बृहस्पती असुरांच्या पारिपत्यासाठी व लोकांच्या भल्यासाठी मांसाच्या आहुत्या देत असे. ब्राह्मणांना घोडे, हत्ती ह्यांचे दान करत असे.

बलराम त्यानंतर ययाति नावांच्या तिर्थक्षेत्री जातो. तेथे ययाति, नहुषाचा मुलगा, यज्ञ करत असें. त्यानंतर ययाति स्वर्गात गेला. तेथे जी इच्छा कराल ती पूर्ण होते असे समजले जाते. ती सरस्वती नदी याचकाला जे हवे ते देत असते. ते ब्राह्मण ययातिचे कौतुक करत जातात. देव आणि गंधर्व त्याच्यावर संतुष्ट झाले होते. बलरामसुद्धा तेथे मोठी दानं करत असतो. त्यानंतर तो वसिष्ठ पवहा नांवाच्या क्षेत्री जातो.

सल्य पर्व भाग एकेचाळीसावा संपला.

# सल्य पर्व

## भाग बेचाळीसावा

जनमेजय पुढे विचारतो, "अहो ब्राह्मणा, मला सांगा त्या जागी सरस्वतीचा प्रवाह वेगवान कां होतो? असे काय झाले कीं नदी वसिष्ठ ऋषीला घेऊन जाते? वसिष्ठ आणि विश्वामित्रात कोणता वाद होता"? असे अनेक प्रश्न तो विचारतो वैशंपायनाना.

वैशंपायन बोलतात, वैराग्य पूर्णते बाबतच्या वादातून जे वितुष्ट त्या दोघांत उत्पन्न झाले होते ते अनेक कथांचे कारण आहे. स्थानू नांवाच्या क्षेत्री वसिष्ठ रहात असतं. ते सरस्वती नदीच्या तटावर होते. त्याच्या पलिकडील किनार्यावर विश्वामित्राचा आश्रम होता. प्राचीन काळी स्थानूने मोठी तपस्या केली होती. स्वर्गातील ऋषी अजून त्याच्या कथा सांगत असतात. त्याचे तिर्थ तेथे झाले म्हणून त्याला स्थानू तिर्थ असे नांव पडले. तेथे स्कंध देवांचा सरसेनापति सुद्धा होता. त्या समोर विश्वामित्र त्याचा आश्रम तयार करतो. वैराग्याच्या उच्चते वरून त्यांच्यात चढाओढ होत असें. त्यात विश्वामित्राचे जास्त लक्ष असें. वसिष्ठांच्या स्वाभाविक (सात्त्विक) वैराग्याशी विश्वामित्र त्याच्या रजोगुणी वैराग्याची तुलना करत असें. एकदा विश्वामित्र सरस्वती नदीला सांगतो कीं, माझ्या वैराग्याच्या शक्तीने तो तिचा प्रवाह वेगवान करून त्यात वसिष्ठाना पकडून त्यांच्याकडे त्याच्या आश्रमात आणेल. तसे झाले कीं मी त्याचा वध करीन. ते ठरते. त्यामुळे सरस्वती वैतागते. तिला ते आवडत नाही. परंतु, त्याच्या सिद्धीपुढे तिचे चालत नाही. त्या प्रकारामुळें नदी दुःखी झाली होती. कारण तिला माहित होते कीं, सात्त्विक वैराग्य रजोगुणी वैराग्यापेक्षा कितीतरीपट श्रेष्ठ असते. ती विश्वामित्राला विचारते मी तुमच्यासाठी काय करावे ते सांगा. तो रागात सांगतो, त्या समोरच्या बाजूस वसिष्ठ आहे त्याला माझ्याकडे घेऊन ये जेव्हां तो तुझ्यात स्नानासाठी उतरेल. कारण मी त्याला ठार मारणार आहे. सरस्वती वसिष्ठाकडे जाते व त्याला विश्वामित्राचे सांगते. तिला दोघांच्या शापशक्तीची कल्पना असते म्हणून ती घाबरलेली असते. ते ऐकल्यावर वसिष्ठ तिला सांगतात, "अहो सरस्वती, तू काळजी करू नकोस. त्याच्याकडे मला घेऊन जा, तसे नाही केलेस तर तो तुला शाप देईल, माझी काळजी करू नकोस. ते

ऐकल्यावर नदीला वसिष्ठांचे श्रेष्ठत्व जाणवते. ती विचार करू लागते आता काय करावे? वसिष्ठ माझ्याबद्दल कितीतरी समजूतदार आहेत. ती ठरवते कीं, कांहीं झाले तरी वसिष्ठ सुरक्षित रहातील असें केले पाहिजे. ती पहाते कीं, वसिष्ठ ध्यानात बसले आहेत व दुसरीकडे विश्वामित्र तसेंच आहेत. नदीचा प्रवाह अचानकपणे वेग घेतो त्यात वसिष्ठ सापडतात. ते तिची स्तुती करू लागतात. ते बोलतात, "ब्रह्माच्या मनस सरोवरातून तू जन्म घेतला आहेस, सगळ्या जगाला तू तुझे पवित्र पाणी देत आहेस, तुझ्या पाण्यामुळे ढगं पुष्ट झाली आहेत. अहो नदी देवते, तुझ्या तटावर आम्ही योगी ज्ञान प्राप्त करतो, तूंच पुष्ठी, द्युती, सिद्धी, किर्ती आणि उमा आहेस माझ्यासाठी. तूच वाणी आहेस, तूंच स्वाहा आहेस, सगळे जग तुझ्या पाण्यावर अवलंबून आहे. तुझ्यामुळे सगळे चराचर जीवन जगतात", ते स्तुती करत असतांना ते विश्वामित्राकडे जातात. त्याला पाहून विश्वामित्राला राग येतो. त्या ब्राह्मणाला ठार मारण्यासाठी हत्यार शोधू लागतो. ते होत असतांना तो पहातो कीं, वसिष्ठ पुनः त्यांच्या आश्रमाकडे गेले आहेत त्याच लाटेमुळे. विश्वामित्र समजतो कीं, नदीने विश्वासघात केला आहे. त्याला नदीचासुद्धा राग येतो. तो नदीला बोलतो तू माझा विश्वासघात केला आहेस, तो तिला शाप देतो कीं तुझे पाणी रक्त हो, राक्षस ते पितील. ते ऐकल्यावर घाबरून ती वसिष्ठाला पुन्हा विश्वामित्राच्या किनार्यावर नेते. तरी सरस्वतीमध्ये एक वर्षासाठी रक्त मिसळलेले दिसत होते. गंधर्व आणि अप्सरा त्यात विहार करण्यास तयार नव्हत्या. अशा कारणाने ह्या तिर्थाला वसिष्ठ पवहा असें नाव पडले आहे.

सल्य पर्व भाग बेचाळीसावा संपला.

# सल्य पर्व

## भाग त्रेचाळीसावा

वैशंपायन पुढे सांगतात, विश्वामित्राच्या शापामुळे ती रक्ताने भरलेले पाणी वाहत होती. तेथे अनेक राक्षस आले व ते पाणी पिऊ लागले. रक्त पिण्यास मिळाल्यामुळे ते आनंदाने नाचू लागतात जणूकाय त्याने स्वर्ग जिंकला आहे. काही काळानंतर अध्यात्मिक संपत्ती असलेले ऋषी तेथे येतात. त्याना समजते सरस्वतीच्या पाण्यात रक्त असते. त्यामुळे ती दुषित झाली आहे. तेथे राक्षस वावरत असलेले ते पहातात. ते ऋषी सरस्वतीला शुद्ध करण्यासाठी प्रयत्न करतात. ते नदीला विचारतात ती अशाप्रकारे दुषित कां झाली? ती सगळे सांगते. ते दैवी ऋषी तिला आश्वासन देतात कीं ते त्यांची अध्यात्मिक उर्जा वापरून तिला त्या शापापासून मुक्त करतील. ते महादेवाला सांगतात सरस्वतीचे दुःख. महादेवाच्या कृपेने ते ऋषी तिला शुद्ध करतात तो शाप काढून. तेव्हां राक्षस त्या मुनींना सांगतात कीं, आमचे खाद्य तुमच्या मुळे नाहिसे झाले आहे. ते बोलतात, आम्ही सगळे कसे रहाणार जर ते रक्त पाण्यात नसेल. ते राक्षस सांगतात, आम्ही मुळचे ब्राह्मण, परंतु, आमच्या पापमय जीवनामुळे आम्ही माणसाचे ब्रह्मराक्षस झालो आहोत. जे क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र खर्या ब्राह्मणांचा द्वेष करतात ते राक्षस होतात. आमचीसुद्धा त्या योनीतून सुटका करा. ते ऐकल्यावर ऋषी नदीची स्तुती करू लागतात. ते धानस्थ होतात. त्यांच्या उर्जेने ते सगळ्यांना त्यांच्या पापातून मुक्त करतात. ते ऋषी राक्षसांना सांगतात, ज्या खाद्यावर शिंकले आहे, ज्या खाद्यात किडे पडले आहेत, ज्या खाद्यात केस मिसळले आहेत, ज्या खाद्यात अश्रू मिसळले आहेत, ज्या खाद्यावरून कोणी चालत आहे, ते खाण्याने माणूस पुढच्या जन्मी राक्षस होतो. ती नदी शुद्ध होते. त्यानंतर ते ऋषी तिला सांगतात कीं, ती नदी त्या राक्षसाना मुक्ती देईल. सरस्वती नवीन रुप धारण करते त्याचे नांव अरुणा होते. ती सरस्वतीची उपनदी होते. त्या राक्षसांना त्यात आंघोळ करण्यास सांगतात. त्यानंतर ते राक्षस त्यांच्या पापातून मुक्त होतात.

जनमेजय विचारतो, "अहो ब्राह्मण मला सांगा इंद्राला ब्रह्महत्त्येचे पाप कसे लागले. तो सुद्धा ह्या तिर्थात स्नान करून मुक्त झाला असे सांगतात"?
वैशंपायन सांगू लागतात, मी तुला ते सगळे सांगतो, ऐक नीटपणे, वसवा (इंद्र) प्राचीन काळी नमुची नांवांच्या असुराशी केलेला समझौता तोडतो कारण नमुची उलटतो. तरी नमुची पुन्हा इंद्राशी समझौता त्याला घाबरून करतो. ते दोस्त होतात. इंद्र त्याला आश्वासन देतो कीं तो त्याला ओल्या, सुक्या अशा कोणत्याही साधनाच्या मदतीने हत्त्यार म्हणून मारणार नाही. तो आणखीन सांगतो कीं, तो दिवसा अथवा रात्री त्याला मारणार नाही. अंधारात नाही अथवा प्रकाशात मारणार नाही, असा करार होतो व त्याप्रमाणे नमुचीला एका प्रकारे अभय मिळते. तरी नमुची त्याचे पापकारक उद्योग कमी करत नाही तेव्हां इंद्र त्याला एका तिन्हीसांजाच्या वेळी धुके असतांना पाण्याचा फेस आयुध म्हणून वापरतो व त्याचे डोके कापून काढतो. नमुचीचे डोके इंद्राच्या मागून जात रहाते. तो त्याला दोष देतो कीं, त्याने त्याचा विश्वासघात केला आहे व जो मित्राचा घात करतो तो नरकात जातो म्हणून तूसुद्धा नरकात जाणार आहेस असें सारखे सांगत असतो. त्याला कंटाळून इंद्र ब्रह्माकडे जातो. त्याला जे घडले ते सांगतो. ब्रह्मा त्याला एक यज्ञ करावयाला सांगतो व त्यानंतर स्नान करावयाला सांगतो. ते ह्या तिर्थक्षेत्री करावयाचे होते. पवित्र सरस्वती अरुणा बनून जोराने वाहू लागते. इंद्र यज्ञ करतो व मोठी दानं देतो ब्राह्मणांना. ते केल्याने तो शुद्ध होणार होता. ब्रह्माच्या आदेशानुसार तो ते सगळे करतो. त्यानंतर अरुणात स्नान करतो. त्यामुळे तो मित्राचा विश्वासघात करण्याच्या दोषापासून मुक्त होतो. इंद्र मोठ्या समाधानाने त्याच्या घरी स्वर्गात जातो. अरुणात स्नान केल्यामुळे नमुचीचे डोके त्या पाण्यात पडते. त्यामुळे त्यालासुद्धा मुक्ती मिळते. असे ह्या तिर्थक्षेत्राचे महत्व आहे. वैशंपायन सांगतात.
वैशंपायन पुढे सांगतात, बलराम तेथे स्नान करतो. त्याचे पुण्य त्याला मिळते. त्यानंतर तो सोमक्षेत्री जातो. आता सांगतो सोमक्षेत्राचे महत्व. तो राजसूय यज्ञ करतो. तो संपताच एक मोठे युद्ध देव आणि दानवांत होते. दानवांना राक्षस आणि दैत्य मदत करत असतात. त्या युद्धाला तारकासुराचे युद्ध म्हणून ओळखतात. त्यात देवांचे सरसेनापति स्कंध तारकासुराचा वध करतात. स्कंधाला महासेन म्हणून पदवी त्यावेळी

मिळते.  त्या सोमतिर्थावर एक प्रचंड अश्वत्थ वृक्ष आहे.  त्याच्या छायेत कार्तिकेय अथवा कुमार रहात असतो.

सल्य पर्व भाग त्रेचाळीसावा संपला.

# सल्य पर्व
## भाग चव्वेचाळीसावा

जमनेजय विचारतात, "अहो ब्राह्मणा, आपण सरस्वतीचे चांगले गुण सांगितले आहेत. मला कार्तिकेयाचे राज्याभिषेकाबद्दल समजून घ्यावयाचे आहे ते सांगा. स्कंधाची नेमणूक केव्हां कशी झाली ते मला ऐकावयाचे आहे. तो दानवांचा संहार कसा करतो ते मला सांगा".

वैशंपायन सांगतात कीं, तुझा जन्म कुरु वंशाचा आहे म्हणून तुला ते सगळे समजले पाहिजे, जनमेजया. जे मी आता सांगणार आहे ते ऐकून तुला आनंद मिळेल. मी तुला सगळे सांगतो. प्राचीन काळी महेश्वराचे वीर्य अग्नीमध्ये पडते. अग्नी ते जाळू शकत नाही. त्या उलट अग्नी जास्त बलवान होतो त्या वीर्यामुळे. महेश्वराच्या आज्ञेने तो ते वीर्य गंगेत सोडतो. गंगासुद्धा ते सांभाळू शकत नाही. म्हणून ते ती हिमालयाच्या कुशीत सोडते. त्यानंतर तेथे तो अग्नीचा मुलगा म्हणून तेथे वाढू लागतो. त्याच्या अध्यात्मिक उर्जेने तो सगळे विश्व चमकवत असतो. ते होत असतांना सहा कृत्तिका ते पहातात. त्या पहातात कीं, अग्नीचा मुलगा हिमालयातील गवतात पडला आहे. त्या पुन्हा पुन्हा ओरडतात, "ते बाल माझे आहे". त्या सहा मातांचे मन समजून ते बाळ त्या सगळ्या मातांचे दूध पिऊ लागतो. त्याला त्यावेळी सहा मुख त्यासाठी उत्पन्न झाली. ते दृष्य मोठे विलक्षण व पहाण्यासारखे होते. त्याच्या करण्याने त्या सहा माता संतुष्ट होतात. तो ज्या शिखरावर वाढत होता ते सोन्यासारखे चमकू लागते. त्या मुलाच्या वाढण्यामुळे सगळी पृथ्वी प्रसन्न झाली होती. ते बाळ त्या सहा कृत्तिकांचे आहे असे समजले जाते म्हणून त्याला कार्तिकेय असें नांव मिळाले. त्या आधी त्याला देव गंगेय म्हणून संबोधत होते. ते बाळ त्याच्या उच्च अध्यात्मिक उर्जेमुळे वैराग्यपूर्ण झाले होते. कार्तिकेय वाढत होता झपाट्याने. तो सोमासारखा तेजस्वी दिसत होता. ते बाळ त्या सोनेरी गवतावरच वाढत होते. त्याची गंधर्व स्तुती करत असतं. संन्यासीसुद्धा त्याचे गुणगान करत असतं. अप्सरा त्याच्या भोवती फेर धरून नांचत असतं. गंगा स्वतः त्याची काळजी वहात असें. पृथ्वीमाता त्याला तिच्या मांडीवर घेऊन खेळवत असें. त्याच्या जन्माचे

विधी साक्षात बृहस्पति करत होते. सर्व ज्ञान शाखा त्याच्या पुढे हात जोडून उभ्या होत्या. सगळी शस्त्र विद्या त्याला स्वाभाविकपणे प्राप्त होत होती. एकदा तो कार्तिकेय महेश्वराला उमेसह बसलेला पहातो. त्याच्या भोवती असंख्य भूतं पिशाच्च वावरत होती. ते भयंकर दिसत होते. त्यांच्या अंगावर विचित्र प्रकारची आभूषणं होती. त्या शिवाय विविध प्रकारचे श्वापद तेथे हजर होते. त्यांना त्या त्या प्राण्यांची मुख होती. त्याशिवाय पहाड, नद्या, जंगलं, वाळवंट अशी सुद्धा व्यक्त रुपात तेथे हजर होती. सगळे जग तेथे तसे व्यक्त रुपात उपस्थित होते. सात मित्र तेथे होते. सिद्धी, विश्वदेवता तेथे हजर होत्या. मरुत, रुद्र, आदित्य, दानव, पक्षी, ब्राह्मण असे सगळे तेथे त्या शिवाच्या पुढे हजर होते. ते कार्तिकेय पहातो. ते सगळे कार्तिकेयाला पहातात. त्याशिवाय नारद, मार्कंडेय, अनेक ऋषी, बृहस्पती, यम, धर्म, जे जे ह्या सृष्टीचे काम पहात होते ते समस्त त्याला पहातात. महादेव त्याला जवळ येतांना पहातात. शिव, अग्नी, उमा आणि गंगा अशा सगळ्यांच्या मनात एकच शंका असते कीं, हे बाळ नेमके कोणाचे ठरते. प्रत्येकाला वाटते कीं ते त्याचे आहे. म्हणून ते पहात असतात कीं कार्तिकेय कोणाकडे जातो. कार्तिकेयाला समजते त्यांचे विचार व म्हणून तो त्याच्या योगी शक्तीने चार रुप धारण करतो. तीन रुप शख, विशख, नैगमेय तयार होतात. त्यानंतर आणखीन चार रुप तो घेतो व त्या चार जनकांच्या कडे जातो. त्याचे स्कंध रुप रुद्राकडे जाते. विशख उमाकडे जाते, शख जे स्कंधाचे वायू रुप आहे ते अग्नीकडे जाते. नैगमेय गंगाकडे जाते. ते सगळे कमीजास्त प्रमाणात सारखेच दिसणारे तेजांने चमकत होते. ते पाहून देव आणि दानव मोठ्याने ओरडून त्याचे स्वागत करतात. त्यानंतर देवी उमा, गंगा, अग्नी ब्रह्माकडे पहातात. ब्रह्मा कार्तिकेयाच्या भल्यासाठी बोलतात, "तुम्ही ह्या बालकाचे पालन करणार अहात. त्याला त्याचे अधिकार द्या". ते बोलल्या नंतर ब्रह्मदेव स्वतः विचार करतात, ते त्या बालकासाठी काय करणार आहेत? त्याने आधी सगळी संपत्ती वाटून टाकली होती जी सगळे देव, राक्षस, भूतं, गंधर्व, पक्षी, यक्ष आणि नाग उपभोगत होती. ते ठरवतात कीं, हा स्कंध देवांचा सरसेनापति होईल. कारण तो अध्यात्मिक उर्जेत प्रबळ होता. ते इतर देवांच्या श्रेष्ठींना आदेश देतात कीं, ह्यापुढे ते स्कंधाची आज्ञा मान्य करतील. त्यानंतर ते सगळे

ब्रह्माबरोबर हिमालयाकडे जातात. ते सरस्वती नदीचा तट त्यासाठी निवडतात. तेथे सामंतपंचक तिर्थक्षेत्री, गंधर्व, देव तेथे आनंदाने जातात. कारण त्यांची इच्छा ब्रह्माने मान्य केली होती.

सल्य पर्व भाग चव्वेचाळीसावा संपला.

## सल्य पर्व

## भाग पंचेचाळीसावा

वैशंपायन पुढे सांगतात, शास्त्रात सांगितल्या प्रमाणे सगळी सामुग्री ते जमा करतात जी अभिषेकासाठी आवश्यक असते. बृहस्पति होमात अर्घ्य देतात. रत्नजडीत आसनावर स्कंध बसतो. देव त्यासाठी सगळी व्यवस्था करत असतात. जी अशा विधीसाठी आवश्यक असते. सगळे देव जसे सूर्य, चंद्रमा, धृती, विष्णू, विधात्री, वायू, अग्नी, पुशन, भाग, अर्यमन, अंश, विवस्वत, रुद्र, मित्र, सगळे आठ वसू, बारा आदित्य, अश्विनी, विश्वदेव, सगळे मरुत, साध्य, पितर, गंधर्व, अप्सरा, यक्ष, राक्षस, पनंग, असंख्य ऋषी, वालखिल्य, असे विविध सिद्ध तेथे उपस्थित होते. ते सगळे वायूवर जगत होते. त्यात भृगू व अंगिरसाचे वंशज होते. कित्येक यति, विद्याधर होते ज्यांचे अध्यात्मिक सामर्थ्य वाखाणण्यासारखे होते. अनेक ब्रह्माचे मानस पुत्र जसे अंगिरस, काश्यप, अत्री, मरिच, भृगू, कृत, हर, प्रचेता, मनू, दक्ष, सगळ्या मोसमाच्या देवता, वेद, समपद्र, सगळी तिर्थक्षेत्रे, पृथ्वी, आकाश, सगळ्या दिशा, सगळ्या वृक्षदेवता, ब्रह्माची कन्य अदिती, ह्रीं, श्रीं, स्वाहा, सरस्वती, उमा, सांची (इंद्राची पत्नी), शिनवली, अनुमति, कुहु, दिवसाच्या देवता, सगळ्या देवांच्या भार्या, ऐरावत, विध्य, मेरू, काळ देवता, पशू देवता (ज्या देवता पशूंचे पहातात), उच्चश्रैव, वासुकी, अरुण (सूर्याचा सारथी), गरूड, गवताच्या देवता, यमाबरोबर काळ, मृत्यू असतात. अशी आमंत्रितांची यादी खूप मोठी आहे. ती सगळी देता येणार नाही. स्कंधाचे सरसेनापति विधीसाठी असे सगळे प्रतिष्ठीत तेथे उपस्थित होते. अशा सगळ्या देवता त्या विधीनुसार त्यांची आंदणं आणत असतात. पवित्र जलाचा अभिषेक त्याच्या माथ्यावर केला जातो. ते सगळे प्रत्येक त्यांचे आणलेले पवित्र जल त्याच्यावर अभिषेक म्हणून सोडतात. अशारितीने तो सर्वमान्य असा सरसेनापति होतो. ब्रह्मदेव त्याला चार मदतनिस देतात त्यांची नांव अशी, नंदीसेन, लोहीताक्ष, घन्नकर्ण आणि कुमुदरालिन. महादेव त्याला एक मदतनिस देतात जो भ्रमविद्येत पारंगत असतो. असुर व दैत्यांचा

पराभव करण्यासाठी त्या विद्या आवश्यक होत्या. त्यानंतर देव त्याच्या सुपूर्द करतात ती देवांची सेना जी असुर, दैत्य, राक्षस आणि दानवांचा नाश करण्यासाठी तयार केली होती. त्यानंतर सगळे आमंत्रित त्याच्या नावांचा जयघोष करतात. यमदेव त्याला दोन साथी देतो जे यमासारखे असतात. त्यांची नांव उन्मथ व प्रमथ असतात. सूर्य त्याला देतो दोन मदतनिस सुभ्रज व भास्वर. चंद्र देतो शुभ्र हार गळ्यात घातलेले मनी व सुमनी. अग्नी देतो ज्वालाजिभा व ज्योती. अग्नी देतो परिघ, वट, भिम, दहती, दहन ते सगळे फार शक्तीमान होते. इंद्र देतो उत्क्रोश, पंचल त्यांच्यात वज्राची व गदेची ताकद होती. त्यांचा वापर करून इंद्राने अनेक लढाया जिंकल्या होत्या. विष्णू देतो चक्र, विक्रम आणि संक्रम. आश्विनी देतात, वर्धन आणि नंदन जी विज्ञानाची असतात. धात्री देते कुंद्य, कुसुम, कुमुद, दंवर, अदंवर. तश्त्री देतो, चक्र आणि अनुचक्र. मित्र देतो सुव्रत, सत्यसंध ज्यांत मोठी वैराग्याची शक्ती असते त्यांच्यामुळे स्कंध कोणालाही वर देऊ शकत होता. विधात्री देते दोन सुप्रभ आणि शुभकर्मन. पुशान देतो पनित्रक आणि कलिक जे भ्रमविद्येत पारंगत होते. वायू देतो वल आणि अतिवल. वरूण देतो घास व अतिघास. ते कांहींही गिळंकृत करू शकत होते. हिमालय देतो सुवर्चस व अतिवर्चस. मेरू देतो कांचन व मेघमलिन. मनू देतो स्थीर व अस्थीर. विध्य देतो उश्विर आणि अग्नीस्मृग. समुद्र देतो संग्रह व विग्रह. ते गदा घेऊन असतं. पार्वती देते उन्माद, शंकूकर्ण व पुष्पदंत. वासुकी देतो जय आणि महाजय. आता सांगतो त्याच्या सैन्याच्या योद्ध्यांची नांव.

ते होते, शंकूकर्ण, निलकुंभ, पद्मा, कुमुद, अनंत, द्वादशभूजा, कृष्ण, उपकृश्रक, घनश्रवल, कपीस्कंध, जालंधम, अक्षसंर्जन, कुंद्दीका, तंभूभ्रकृत, एकाक्ष, द्वादशाक्ष, एकजात, सहस्त्रबाहू, विकट, व्यघ्राक्ष, क्षिकंपन, पुण्यनाम, परिश्रृत, कोकोनद, प्रायामल्यानुलेपन, अजोदर, गसशिरस, स्कंधाक्ष, शतलोचन, ज्वालाजीभा, कराल, सितकेश, जती, हरी, कृष्णकेश, जटाधर, चतुरदंशत्र, अष्टजिव्हा, मेघानंद, पृथूश्रवस, विद्युताक्ष, धनुर्वक्त्र, जठार, मरुत्सन, उदराक्ष, राधाक्ष, वज्रनाभ, वसुरप्रभा, समुद्रवेग, सैलकंपीन, वृष, मेषप्रवाह, नंद, उपनंद, धुम्र, स्वेत, कलिंग, सिद्धार्थ, वरद, प्रियक, नंद,

गोनंद, आनंद, प्रमोद, स्वस्तिक, ध्रुवक, क्षेमवह, सुवह, सिद्धीपात्र, गोव्रज, कनकपिडा, गयान, हसन, वण, खड्ग, वैताली, अताली, कथक, वटीक, हंसज. पक्षधिग्दांक, समुद्रोमदन, रंतोकत, प्रशस, श्वेतसिध्द, नंदक, कलाकंथ, कुंभंदक , कलाकक्ष, सीत, भूतलोमंथन, यज्ञवन, देवजाली, सोमप, मजाल, क्रथ, तुहर, चित्रदेव, मधूर, सुप्रसदा, किर्तीन, वत्सल, मधूवर्ण, कलसोदर, धर्मद, मन्म, थकर, सुचिवक्त्र, श्वेतवक्त्र, सुवक्त्र, चारूवक्त्र, पंदूर, दंडवाहू, सुवाहू, राजस, कोकीलक, अचल, कनकाक्ष, वलकराक्ष, संचरक, कोकनाद, गृध्रपात्र, जंबुवक, लोहजवक्त्र, संचारक, कुंभक , मुंदग्रीवा, कृष्णौजस, हंलवक्त्र, चंद्रभा, पनीकुर्चा, पंचवक्र, शिक्षका, चसवक्त्र, खरव्क्त्र, कंचक असे कित्येक होते. ते सगळे वैराग्यपूर्ण होते. त्यांना वसना बाधत नव्हत्या. म्हणून ते पूर्णतया वासनामुक्त होते. असेंच स्कंधाचे योद्धे होण्यास पात्र होते. त्यातील कांहीं तरुण व कांहीं वयस्क व कांही वृद्ध होते. त्यांचे चेहरे विविध प्रकारचे होते. त्यांचे चेहरे ज्या प्राण्याचे त्या प्राण्याचे ते दर्शक होते. कांहींची तोंड त्यांच्या छातीकडे तर कांहींची त्यांच्या पायाशी असे विलक्षण सगळे होते. फार थोडे माणसासारखे दिसत होते. कांही किड्या मुंगीसारखे तर कांहीं जंतूंसारखे होते. त्याबद्दल कोणताही नियम नव्हता. कांहीं वनस्पती सारखे होते. परंतु त्याना पायासारखे भाग होते ज्यामुळे ते चालत असतं. कांहींच्या अंगावर केसा एवढी खवलं होती. कांहींच्या डोक्यावर केस होते कांहींच्या डोक्यावर एकच केस होता. कांहींच्या डोक्यावर पगड्या होत्या. कांहीं नागडे होते तर कांही वस्त्र नेसलेले होते. ते सगळे सामान्य माणसाला न दिसणारे होते. त्यांना पहाण्यासाठी अध्यात्मिक उर्जा असावी लागत होती. मनुष्य कल्पना करू शकणार नाही अशा विविध स्वरुपात ते होते. ते विलक्षण वाणी बोलत होते पण सगळे परावाणी समजत होते. त्या एका वैश्विक वाणीमुळे ते एकमेकांशी संभाषण करत होते. त्यांचे रंग सुद्धा विविध होते, कांहीं काळे, कांही शुभ्र, राखाडी, लाल, पिवळे, जांभळे, निळे असे होते. कांहींना शेपट्या होत्या, त्याच्या अंगावर अलंकार होते. तेसुद्धा विविध प्रकारचे होते ज्याचे वर्णन करणे सोपे नाही. कांहीं सोन्याचे चांदीचे, लोखंडाचे, चामड्याचे असे दागिने होते. ते सगळे

संचलन करत स्कंधाला सलामी देत होते. त्यांच्या हातात चक्र, शतघ्नी, सोटे, दगडधोंडे, भाले, बाण, सुया, नलिका अशी विविध प्रकारची शस्त्रं होती. त्यांचे मुख्य अस्त्र होते त्यांची अध्यात्मिक उर्जा. संचलन करतांना ते स्कंधाजवळ आल्यावर नांचून त्याचे स्वागत करत होते. त्यातील कांहीं दैवी होते, कांहीं पृथ्वीवरील होते. कांहीं पिशाच्च लोकातील होते. ते स्कधाचा परिवार झाले होते. संचलनात कांहीं उडत होते तर कांहीं सरपटत होते तर कांहीं चालत होते. ते हजारोने होते.

सल्य पर्व भाग पंचेचाळीसावा संपला.

# सल्य पर्व

## भाग शेहेचाळीसावा

वैशंपायन पुढे सांगतात, आता मी तुला सांगतो स्कंधाच्या अनेक मांतांची माहिती. त्या माता स्कंधाला दुध पाजत होत्या. सगळी चराचर सृष्टी त्यांच्या कृपेवर चालत असते. त्यांची नांव अशी, प्रभावती, विशलाक्षी, पलिता, गोनशी, श्रीमती, वहुला, बहुपुत्रिका, अप्सुजाता, गोपाली, बृहदमवलिका, जयावती, मालतिका, धृवरत्ना, भयंकरी, वसुदामा, सुदामा, विसोका, नंदीनी, एकचुडा, महाचुडा, चक्रनेमी, उत्तेजना, जयत्सेना, कमलाक्षी, शुभना, शतृंजया, सलभी, खरी, मगधी, शुभवक्ता, तिर्थसेनी, गितीप्रीया, कल्याणी, कोदृरोमा, अमितसेना, मेधस्वना, भोगवती, शुभ्रू, कनकावती, अलतक्षा, विर्यवती, विद्यात्जिव्हा, पद्मावती, सुनकक्षत्रा, कंदरा, बाहूयोजना, संतानिका, कमला, महावती, सुदामी, सुप्रभा, जसस्विनी, नृत्यप्रिया, सतोलुखलामेखला, सरघंता, सतानंदा, भागानंदा, भवानी, वपुस्मती, चंद्रसिता, भद्रकाली, झंकारीका, निशकुंतिका , वरणा, शत्वारवासिनी, सुमंगला, स्वतिस्मती, वृद्धीकामा, जयप्रिया, धनदा, सुप्रसदा, भवदा, जनेश्वरी, इदी, भेदी, समेधी, वेतालजननी, कंदुती, कलिका, देवमित्रा, तम्वुशी, केतकी, चित्रसेना, अचला, कुक्कुतिका, शंखलर्का, शकूनिका, कुंद्रीया , कोकीलीका, कुंभिका , शतोदरी, उत्कर्थीनी, जलेला, महावेगी, कनकना, मनोजवा, कांताकीनी, प्रदशा, पुतना, खेसया, अंतर्धंती, क्रोसना, तडीतप्रभा, मंदूरी, तुहुंडी, कोतरा, मेघवाहीनी, शुभगा, तंबिनी, लम्वा, वसुची, ईला, विकंथीनी, उर्धवेणीधारा, पिंगक्षेमी, लोहमेखला, पृथूवक्रा, मधुलिका, मधूकुभा, यकशालिका, मत्सुनिका, जरायू, जर्जरना, ख्याता, दहादहा, खग्डबंधा, पुशना, मणिकुट्टीका, अमोधा, लंवयोधरा, वेणूवीणाधरा, पिंगाक्षी, लोदमेक्षला, कृष्णा, खरजंघा, महाजेवा, कुमारमुखी, स्वेता, लोहीताक्षी, विभिषवना, जतालिका, कामचारी, दीर्घजिव्हा, वलोतका, कलहीका, वामनिका, मुकुता, लोहीताक्षी, महाकाया, हरीपिंडा,

एकत्वचा, सुकुसुमा, कृष्णकर्णी, क्षुरकर्णी, चतुष्कर्णी, कर्णप्रवरा, चतुष्पदनिका, गोकर्णी, महीशानना, खारकर्णी, महाकर्णी, भेरीश्वनेसवना, चंकक्षकुंभेश्वरा, भगदा, गणा, सुगणा, बिन्नी, कामदा, भूतिर्था, अन्यगोचरा, पसुदा, वित्तदा, शुक्बदा, महायासा, पयदा, गमहिशदा, सुविशाला, प्रतिष्ठा, सुप्रतिष्ठा, रोचमना, सुरोचना, नौकर्णी, महाकर्णी, विसरा, मंथीनी, एकवक्त्रा, मेघारवा, मेघमाला आणि विरोचना ह्या स्कंधाच्या माता आहेत. त्यांची खरी संख्या हजाराने आहे, मी येथे थोड्या सांगितल्या आहेत. त्या विविध रुपात असतात व त्या स्कंधाबरोबर असतात. वस्तुतः त्या विविध देवता असून त्या सृष्टीच्या कार्यात लोकपाल देवतांना (इंद्र, वायू, वरुण, वैश्रावण, यम, कुबेर) मदत करण्यासाठी असता. त्या सृष्टीतील चराचराचे प्रतिनिधी असतात. म्हणून त्याची रुप त्या त्या चराचरासारखी असतात. त्यांना स्कंधाच्या माता असें म्हणण्याचा अर्थ त्या स्कंधाला त्याच्या कामात मदत करण्यासाठी असतात. ह्या ठिकाणी माता, भगिनी व कन्या ह्या त्या अर्थी घ्यावयाच्या असतात. म्हणजे ती माता अथवा भगिनी अथवा कन्या असते स्कंधासाठी. स्त्रिची हि तीन रुप पवित्र मानली जातात. पत्नी (भोगिनी) हे रुप दुषित समजले जाते कारण त्यात काम दोषाचा अंतर्भाव असतो. स्कंध ब्रह्मचर्याची देवता समजली जाते. म्हणून सगळे खरे ब्रह्मचारी स्कंधाचे अनुयायी समजले जातात त्यांना गुह्यक असे समजतात. ब्रह्मचर्य पालनासाठी त्या माणसाला सगळ्या स्त्रियांत माता, भगिनी अथवा कन्या दिसली पाहिजे म्हणजे त्याला ब्रह्मचर्य पालन सहजपणे आचरता येते. स्त्रिचे चारित्र्य कसेही असो त्याचा विचार न करता ब्रह्मचारी त्या बाईशी आदराने व सहानुभूतीनेच वागला पाहिजे. कारण, त्याच्यासाठी ती स्त्री माता, अथवा भगिनी अथवा कन्या असते. त्या मातामधील कित्येक कुलदेवता म्हणून पुजल्या जातात ज्यांचे चेहरे मानवी असतात. अमानवी चेहरे व देहयष्टी असलेल्या माता कुलदेवता नसतात. त्यांची मनोभावे आराधना करणार्याचे संरक्षण त्या करतात असे समजले जाते.

(*दक्षिणेकडे कांहीं स्कंधाच्या मंदिरात स्त्रीयांना प्रवेश नाकारला जातो त्या परंपरेला शास्त्रात आधार नाही. तेथील अज्ञानी व विकृत मनोवृत्ती असलेल्या पुरोहितांमुळे तशा*

*चुकीच्या प्रथा प्रचारात येतात. स्कंधाचे दर्शन स्त्रीसाठी लाभदायक असते म्हणून जर बायकांनी स्कंधाची आराधना केली तर त्याचा त्या मुलीला फायदा होत असतो.* )

कांहीं बालकांचे संरक्षण करतात. कार्तिकेय अर्थात गुहा, त्याला त्या सृष्टीच्या कामात मदत करत असतात. कार्तिकेयाच्या भक्तांना गुह्यक असें म्हणतात. सृष्टीची उभारणी व नाश असे दोनही प्रकारचे कार्य त्या माता करतात. स्कंधाच्या सैन्याला धनंजय असे म्हणतात. त्याचे सैन्य अभेद्य असते. ब्रह्माच्या कृपेमुळे कार्तिकेय सदैव अजिंक्य असतो.

देवांचे सरसेनापतिपद मिळाल्यावर तो त्याच्या अद्भूत सैन्यानिशी दैत्यांवर चालून जातो. त्यामुळे सगळे देवगण त्याच्यावर खूष होतात. त्याच्या रथाच्या दांड्यावर घंटा होत्या त्यांचा आवाज होत होता. त्याशिवाय शंखू व ढोलकी वाजत होती. त्याचे विलक्षण सैन्य त्यांची विचित्र वाद्ये वाजवू लागतात. त्यामुळें शत्रूच्या हृदयात भिती उत्पन्न होते. स्कंध देवांना आश्वासन देतो कीं, तो त्यांचे शत्रू मारून टाकेल. त्या संचलनाच्या पुढे अप्सरा नांचत जात होत्या. त्यामुळें ती मिरवणूक सुंदर दिसत होती. गंधर्व गात होते स्कंधाची स्तुतीपर गाणी. त्यानंतर स्कंध दैत्यांच्या विनाशासाठी निघाला. जगाच्या भल्यासाठी अध्यात्मिक उर्जा वाढण्यासाठी जी दैत्य, असुर, राक्षस इत्यादि पापाचरणाने नष्ट करत होते ती पुन्हा सुस्थितीत राखण्यासाठी स्कंधाची नेमणूक झाली होती. सगळे वेद शास्त्र देहधारण करून त्याला मदत करत होते. ते त्याचे सैनिक झाले होते. कांहीं गदा झाले होते तर कांहीं तलवार, कुर्हाडी, भाले, बाण, असे विविध रुपात ते सगळे स्कंधाच्या सैन्याला मदत करत होते. त्यांच्यापुढे गुह होते जे स्कंधाचे भक्त होते. ते सैन्य पाहून दैत्य, दानव , राक्षस, असुर काळजीत पडले. स्वर्गीय स्कंधाचे लष्कर त्यांच्या मागे लागले. त्या सगळ्या नकारात्मक शक्ती पळून जाऊ लागल्या, ते पाहून देवांचा जोर वाढला. स्कंध त्याच्या शरांनी दैत्यांना मारत होता. त्याचे शर खास अग्नीने तयार केले होते. त्यामुळें त्यांच्या माराने दैत्य, दानव, राक्षस मारसे जात होते. त्या युद्धामुळे पृथ्वीवर एकच गोंधळ उडाला होता. ते पाहून स्कंधाला आनंद झाला. शेवटी तो तरकासुराला मारतो. त्यांनंतर तो त्याचे दैत्य सैन्य मारून टाकतो. त्यानंतर तो महिशासुराला धरतो. त्याचे शेकडो साथी तो मारतो.

त्यानंतर स्कंध हृदोदराचा वध करतो. त्याचे अब्जावधी साथी तो मारतो. पृथ्वीवरील पाप त्यामुळे कमी झाले होते. स्कंध आनंदाने नाचू लागला. स्कंधाच्या शरातून बाहेर येणारा अग्नी सगळे जाळून टाकत होता. त्याच्या रथावर वाजणार्या घांटानादाने कित्येक असुर मेले होते. अशारितीने त्यांने देवांच्या शत्रूंचा नाश केला होता. ती त्याची पहिली कामगिरी होती. देवांची पुण्यशक्ती वाढलेली होती. त्यानंतर वणासुर आला त्याच्याशी लढण्यासाठी. त्यात वणासुर क्रौच पर्वताच्या आत लपतो. तो पर्वत बगळ्यासारखा ओरडत होता म्हणून त्याला ते नांव दिले होते. क्रौच पर्वतावर साल वृक्षाची जंगलं होती. तेथे वानरं आणि हत्ती रहात होते. त्याशिवाय मांसाहारी प्राणी जसे वाघ, सरभ सुद्धा तेथे होते. स्कंधाच्या येण्यामुळें ते सगळे पळून गेले. त्या पर्वताच्या शिखरावर रहाणारे विद्याधर आकाशात उडून गेले. तेथे रहाणारे किन्नर व्यथीत झाले होते. स्कंधाच्या शरांमुळें त्या पर्वताला आग लागली. जे लपलेले होते तेसुद्धा बाहेर आले. स्कंध दैत्यराजाचा मुलगा वली मारून टाकतो. जसे प्राचीन काळी इंद्राने वृत्राचा वध केला होता. अग्नीपुत्र स्कंध पाहून इतर देवांना हुरूप आला व तेसुद्धा त्या संहारात सामील झाले. स्कंधाची सगळे वहाव्वा करू वागतात. क्रौच पर्वताचा नाश झाला जेथे दैत्य रहात होते. त्यानंतर चांदचा मुलगा तो मारतो. त्याबरोबर स्वर्गातील महिला त्याच्यावर फुलांचा वर्षाव करतात. आता देव पुन्हा त्यांचे यज्ञ करू लागतात जे दैत्यानी थाबवलेले होते. कांहीं स्कंधाची तुलना सनतकुमाराशी करतात जो ब्रह्माचा ज्येष्ठ मुलगा आहे. निरनिराळे स्कंधाची तुलना इतर शूर देवांशी करतात. कोण त्याला गंगापुत्र समजतात, कोण त्याला अग्नीपुत्र समजतात. कोण त्याला पार्वतीचा समजतात. कोणी त्याला योगिनीचा समजतात. ज्याला जे योग्य वाटेल तसे ते समजत होते. कार्तिकेयाची स्थापना कशी झाली ते सांगितले. आता तुला सांगतो इतर पवित्र तिर्थ क्षेत्रींची माहिती. दैत्यांच्या नाशा नंतर ती पृथ्वी दुसरे स्वर्ग झाले. स्कंधाने त्याची व्यवस्था उत्तम केली होती.

प्राचीन काळी वरुण जलदेवता, देवांनी स्थापन केली होती. तेथे स्कंधाने स्नान केले होते. तेथे बलराम जाऊन स्नान करतो. तेथे एक रात्र रहातो.

सल्य पर्व भाग शेहेचाळीसावा संपला.

# सल्य पर्व
## भाग सत्तेचाळीसावा

जनमेजय विचारतो, "अहो ब्राह्मणा, आपल्याकडून हा जो इतिहास मी ऐकला तो फारच रोचक वाटला. मला असें वाटले कीं माझी शुद्धी झाली ते ऐकल्यामुळे. आता मला सांगा वरुणदेवाची स्थापना त्या तिर्थक्षेत्री कशी झाली व कोणी केली"

वैशंपायन सांगतात, ऐक आता ते सांगतो, आधीच्या कल्पात ते झाले. तेव्हां कृतयुग होते. सगळे देव वरुणदेवाला भेटतात व बोलतात, "जसे शक्र आमचे सदैव संरक्षण करतात तसा तू ह्या नद्यांचा शक्र हो व त्यांचे संरक्षण कर. तू नेहमीच समुद्रात रहातोस, ते तुझे क्षेत्र आहे. तेथे बसून तू चंद्राला कला लावतोस". वरुण बोलतो, "ते झाले आता पुढे काय ते बोला". त्यानंतर वरुणाचे स्थान समुद्र ठरते. त्यानंतर सगळे देव आपापल्या ठिकाणी जातात. वरुण सागराचे व नद्यांचे संरक्षण करू लागतो. त्या तिर्थक्षेत्री बलराम स्नान करतो व दानं देतो.

देव ब्रह्माकडे जातात व तक्रार करतात की, अग्नी कोठे सापडत नाही. जर तो नाहीसा झाला तर सगळे प्राणी नष्ट होतील. आपण पुन्हा अग्नी उत्पन्न करावा.

जनमेजय विचारतो, "अग्नी का नाहीसा झाला"? मला सांगा.

वैशंपायन सांगतात, अग्नी भृगूंच्या शापाला फार घाबरत होता. म्हणून तो सामी वृक्षाच्या डोलीत जाऊन लपला होता. अग्नी नाहीसा झाल्याने देवांचे यज्ञ होईनात. इंद्रापासून सगळे विचारात पडले. सगळे अग्नीला शोधत होते परंतु, तो मिळत नव्हता. शेवटी त्यांना तो सामीच्या लाकडात लपलेला दिसला.अग्नी मिळाल्याने ते सगळे आनंद करतात. भृगुच्या शापामुळे अग्नी सर्वभक्षी झाला होता. त्या क्षेत्रात बलराम स्नान करतो. त्यानंतर तो ब्रह्मयोनी नांवाच्या तिर्थक्षेत्री जातो. जेथे ब्रह्मदेवाने सृष्टी उत्पन्न करण्याचे कार्य प्रारंभ केले होते. फार प्राचीन काळी सगळ्या देवांना घेऊन ब्रह्माने तेथे स्नान केले होते. तेथून बलराम कौवर क्षेत्री जातो. तेथे प्रसिद्ध ऋषी ऐलविलाने तपस्या केली होती. त्याच्या सिद्धीमुळे सगळ्या प्रकारची धनदौलत त्याच्याकडे आपसुकपणे जात असे.

तेथून बलराम कौवराच्या वनात फिरतो. ते यक्षाचे स्थान होते कारण तेथे यक्षाधिपती कुबेर रहात होता. तेथे त्यांने तप केले व अनेक सिद्धी प्राप्त केल्या होत्या, तेथेच त्याला देवत्व प्राप्त झाले. रुद्राची कृपा झाली. त्याचा मुलगा नवकुबेर त्याचे उत्तर दिशेकडे राज्य स्थापन झाले. त्याला मरुत मिळाले, त्याला दैवी रथ मिळाला. असा तिर्थक्षेत्र बलराम स्नान करतो. बलराम पुढे निघतो. त्याचे नांव असते वडरापचन. त्या तिर्थाचे खास असें कीं, तेथे सदैव उत्तम फुलं व फळं विपुल प्रमाणात मिळतात.

सल्य पर्व भाग सत्तेचाळीसावा संपला.

# सल्य पर्व
## भाग अठ्ठे चाळीसावा

वैशंपायन पुढे सांगतात, बलराम वडरपचन तिर्थक्षेत्री तो रहातो. तेथे रहात असलेल्या संव्याशांना भेटतो. तेथे भारद्वाजाची मुलगी श्रृववती वैराग्यपूर्ण जीवन जगत असते. ती कुमारी होती आणि ब्रह्मचर्य पालन करत होती. ती घोर तपस्या करत होती कारण तिला इंद्र नवरा म्हणून हवा होता. अखेरीस पक तिच्या तपश्चर्येने प्रभावित झाला व एकदा वसिष्ठ ऋषीच्या रुपात तिच्या आश्रमात गेला. श्रृववती त्याला बोलते, आपली काय आज्ञा आहे ती सांगा. मला जमेल तशी ती पुरी करीन फक्त माझा हात मागू नका. कारण तो मी आधीच इंद्राला दिला आहे. ते ऐकल्यावर तो तिला सांगतो कीं, मुली मला माहीत आहे तुझ्या मनात काय आहे तेव्हां ती तुझी इच्छा ती पुरी होणार आहे. तू जशी तपस्या करत आहेस तशी तपस्या करणारे मृत्यूनंतर देवपदाला जातात. त्यानंतर तो तिला पांच फळं देतो व सांगतो कीं ती तिने उकळावीत. ती कांहीं केल्या उकळत नव्हती. कारण त्याने मंत्राने तसे घडवले होते. तिच्या तपस्येची तो परीक्षा घेत होता. ते तिर्थक्षेत्र त्याच्या नांवाने ओळखले जाऊ लागले. शेवटी ती उकळू लागली व ती त्या परीक्षेत उत्तीर्ण झाली. तरी ती नरम होत नव्हती. तिचे जळण संपले होते. ती तिचे अवयव त्यासाठी जाळू लागली. ती ते करत होती कारण तिला त्या ऋषीचे समाधान करावयाचे होते. ते करत असतांना तिला दुःख होत नव्हते उलट आनंद होत होता. अग्नीदेवांने तिचा पाय जाळला होता. ते पाहून इंद्र संतुष्ट झाले. इंद्र वसिष्ठाच्या सोंगात तिला सांगतो कीं, तिची इच्छा सफल होईल आणि तू वदूरपाचन नांवाने ओळखला जाशिल. त्या तिर्थक्षेत्री ते सात ऋषी हिमालयात जाण्याआधी वसिष्ठाच्या पत्नीला, अरुंधतीला त्या क्षेत्रा सोडतात. ते खाण्यासाठी फळं गोळा करण्यासाठी गेले होते. ते ऋषी त्या वनात बारा वर्षे रहातात. त्यावेळी अरुंधती सुद्धा तपस्या करत होती. अरुंधती तपस्या करत आहे हे पाहून शंकर तिच्यावर प्रसंन्न होतात. महादेव ब्राह्मणाच्या वेषात तिच्या कडे जातात. तो दान मांगतो. ती सांगते तिच्याकडे देण्यासाठी अन्न नाही. तेव्हां शंकर त्यांच्या कडील कंद काढतोत व तिला सांगतात हे शिजव आणि मला

दे. ती ते कंद भाजावयाला ठेवते. ते होत असतांना तो ब्राह्मण तिला निरनिराळ्या देशांच्या कथा ऐकवतो. त्या ऐकण्यात ती रमते. तशी बारा वर्षे जातात. जणूकाय तो एक दिवस होता. त्या सुमारास तिचे पति (वसिष्ठ) व इतर ऋषी तेथे येतात. ते ऋषी महादेवाचे स्वागत करतात. महादेव सांगतात, त्याची पत्नी फार सत्त्वशिल आहे. स्थानू सांगतात त्यान ऋषींना कीं, त्या सातजणानी हिमालयाच्या शिखरावर जाऊन जे मिळवले त्यापेक्षा जास्त अरुंधतीने तिच्या घरात राहून मिळवले आहे. त्यानंतर ते तिला बोलतात, "मुली सांग, तुला कोणता वर पाहिजे". ती बोलते की, जर आपल्याला वर द्यावयाचा असेल तर ही जागा एक तिर्थक्षेत्र होऊद्या. त्याचे नांव वदूरपाचन असें ठेवावे. ते सिद्धांचे आवडते तिर्थक्षेत्र होईल. महादेव सांगतात, **एक गृहिणी संसारात राहून जे पुण्य संपादन करते ते वनात राहून व तपस्या करून पुरूषाला मिळत नाही.** कारण संसार हा ब्रह्माची सेवा करण्यासारखा योग आहे. त्यानंतर महादेव त्याच्या ठिकाणी जातात. ते ऐकल्यावर संतुष्ट झालेले वसिष्ठ अरुंधतीला आणखीन एक वर देतात कीं, त्या तिर्थात स्नान करणारा मृत्यूनंतर मोक्ष प्राप्त करील. ही गोष्ट सांगितल्यावर इंद्र स्वर्गात जातात. त्यानंतर स्वर्गातून श्रृववतीवर फुलांचा वर्षाव होतो आकाशातून. त्यानंतर ती इंद्राची भार्या होते.

जनमेजय विचारतो, "श्रृववतीची माता कोण होती? तिचे लालन पालन कसे झाले"?

वैशंपायन सांगतात, भारद्वाज मुनी घृताचीच्या प्रेमात पडतात. तिच्यामुळे त्यांचे वीर्य सांडते. ते तो मुनी त्याच्या ओंजळीत घेतो. त्यानंतर ते तो एका द्रोणात ठेवतो. तेथे श्रृववती वाढत मोठी होते. ऋषींच्या समोर तिचे नांव श्रृववती ठेवले जाते. त्यानंतर भारद्वाज हिमालयात जातात.

बलराम त्या तिर्थक्षेत्री स्नान करतो. त्यानंतर तो इंद्राच्या तिर्थक्षेत्री जातो.

सल्य पर्व भाग अठ्ठेचाळीसावा संपला.

# सल्य पर्व
## भाग एकोण पन्नासावा

वैशंपायन पुढे सांगतात, बलराम इंद्राच्या क्षेत्री जातो. तेथे स्नान करतो व दानं करतो. इंद्राने त्या क्षेत्री शंभर यज्ञ केले होते. त्यावेळी तो बृहस्पतीला मोठा दानं करतो. हे फार पुर्वी झाले होते. त्यानंतर इंद्राला शतक्रतू असें नांव मिळाले, बलराम तेथे ब्राह्मणांची पुजा करतो. त्यानंतर तो भार्गवाच्या तिर्थक्षेत्री जातो. परशुरामाने तेथे वाजपेय यज्ञ केला होता. त्यासाठी त्याला काश्यपांनी मदत केली होती. काश्यपाना तो सगळी पृथ्वी दान करतो. त्या तिर्थात बलराम स्नान करतो. तेथे रहाणार्या संन्याशांची पुजा करतो. तेथून तो यमुना तिर्थाकडे जातो. वरुणाने त्या ठिकाणी यज्ञ केला होता. त्याआधी त्याने सगळे वाईट लोक मारले होते ज्यात दैवी शक्ती होत्या, त्याशिवाय गंधर्व, यज्ञ राक्षस होते. तो यज्ञ होत असतांना देव व दानवांची लढाई सुरू झाली. त्यात जिंकल्यानंतर तो राजसूययज्ञ करतो. बलराम तेथील ऋषींची पुजा करतो. त्यानंतर आदित्य नावांच्या क्षेत्री जातो. तेथे सूर्यदेव यज्ञ करतो त्यामुळे त्याला त्याचे तेज प्राप्त होते. तेथे विश्वदेव, मरुत, गंधर्व, अप्सरा कृष्णद्वैपायन, शुक, जनार्दन, यज्ञदेव, राक्षस, पिशाच्च असे विविध हजाराच्या संख्येने स्नान करण्यासाठी नित्य जातात. त्या सरस्वती नदीच्या किनार्यावरील तिर्थक्षेत्री विष्णू असुरांना मारल्यानंतर स्नान करण्यासाठी जात असें. व्यासानी तेथे यज्ञ केल्यानंतर त्याना ज्ञानप्राप्त झाले. ऋषी असित-देवल, तेथेच ज्ञानी झाले.

सल्य पर्व भाग एकोणपन्नासावा संपला.

# सल्य पर्व

## भाग पन्नासावा

वैशंपायन बोलतात, त्या तिर्थक्षेत्री एक महान ऋषी रहात होते त्यांचे नांव असित-देवल असें होते. ते गृहस्थी जीवन जगत होते. ते त्यांच्या सद्‌गूणाबद्दल प्रसिद्ध होते. ते विरक्त प्रवृत्तीचे होते. सर्व प्राणिमात्रांबद्दल ते सहिष्णू होते. त्यांचा क्रोध नगण्य होता. त्यांना मित्र व शत्रू सारखेच होते. त्यांच्या बोलण्याने कोणाला दुःख होत नसे. ते ब्रह्मचर्य (सर्व स्त्रियांबद्दल सन्मानाची भावना बाळगणे) पाळत असें. एकदा एक बुद्धीमान वैरागी ज्याचे नांव होते जैगिशव्य जो योगी होता, ध्यान साधनेत तरबेज होता, आणि जो जोगीसुद्धा होता, असित-देवलांच्या कडे पाहूणा म्हणून आला होता. तेथे त्याला त्या आश्रमात अंतिम ज्ञानाचा अनुभव आला. देवल त्याची सेवा करत होते. ते तशाप्रकारे एकत्र बराच का राहीले होते. एकदा तो बैरागी कोठे दिसेनासा झाला. जेवणाची वेळ आली परंतु, तो आला नाही. थोड्या वेळांनी तोच बैरागी देवलांकडे भिक्षा मांगण्यासाठी आला. देवल त्याची पुजा करतात. देवलांना एका गोष्टीचे वाईट वाटत होते कीं, तो संन्यासी त्यांच्याबरोबर बोलत नसे. त्या स्थितीत देवल एकदा त्यांचे मातीचे भांडे घेऊन समुद्राकडे गेले होते. तेथे तो सन्यासी आधीपासून बसलेला होता. तो केव्हां व कसा आला ह्याचे देवलांना आश्चर्य वाटते. देवल मंत्र जागरण करू लागले. त्यानंतर ते त्याच्या आश्रमाकडे गेले. त्यांचे मडके पाण्याने भरलेले होते. तो संन्यासी त्यांच्याबरोबर बोलत नव्हता. परंतु, त्याच्या आश्रमात रहात होता. तो संन्यासी देवलांना सगळीकडे दिसत होता एकाच वेळी ह्याचे त्यांना आश्चर्य वाटत होते. एकदा देवल त्यांचे मंत्र बोलत आकाशात गेले. तेथे त्यांना आकाशात अनेक साधू ढगावर बसून ध्यान करत होते. तेथेसुद्धा तो संन्यासी होता. ते पाहून देवलांना क्रोध अनावर झाला. तो संन्यासी यमापासून सोमापर्यंत सगळीकडे त्याला दिसत होता. असा ते सगळ्या लोकात देवलांना दिसत होता. यज्ञात प्राण्यांच्या आहुत्या देऊन तो जैगिशव्य पुन्हा स्वर्गात जातांना दिसत होता. पुन्हा घरी आल्यावर तो त्यांना त्यांच्या आश्रमात दिसत होता. जेथे यज्ञ होत होते तेथे तो देवलाना दिसत होता. सर्वकडे तो जैगिशव्य

दिसत होता. पितरात जेथे स्त्रिया असतात तेथेसुद्धा तो होता. तो एक महान योगी होता. तो कधा दिसे तर कधी अदृष्य होत असें. पुढे तो त्याला कायमचा दिसेनासा झाला तेव्हां देवल सिद्धाना विचारतात कीं, तो योगी कोठे आहे. तेव्हां ते सांगतात कीं जैगिशव्य मोक्षप्राप्त करून गेले आहेत. ते परब्रह्मात विलीन झाले आहेत.
वैशंपायन पुढे सांगतात, ब्रह्मतत्रात रहाणार्या त्या सिद्धाचे ते ऐकून देवल त्याला बोलतात, मी तेथे जाण्याचा प्रयत्न केला पण मी खाली पडलो. ते सिद्ध देवलाला सांगतात कीं, तू अजून तेवढा मोठा झालेला नाहीस, म्हणून खाली पडलास. त्यानंतर देवल त्यांच्यात सुधारणा करतात आणि अंतिम स्थानी जातात. तेथे त्यांना जैगिशव्य भेटतो. त्याला विनंती करतो, "मला मोक्ष प्राप्ती करावयाची आहे त्यात आपण मला मार्गदर्शन करावे". त्याप्रमाणे त्यांची तयारी होते. देवलांचे सगळे पितर ते पहात असतात. ते रडू लागतात जेव्हां त्यांना समजते कीं, त्यांचे देवल मोक्षास जात आहेत. रडण्याचे कारण मोक्ष प्राप्ती हा एक प्रकारे आत्म्याचा मृत्यू असें समजले जाते कारण त्यानंतर त्या आत्म्यास स्वतंत्र अस्तित्व रहात नाही तो परमात्म्यात एकरुप झालेला असतो. त्यांच्यात वाद होऊ लागतो, त्यात मोक्ष श्रेष्ठ कां गृहस्थाश्रम ते ठरवावयाचे होते. देवल मोक्ष श्रेष्ठ मानतात व त्याप्रमाणे त्यांचे जीवन होते. दैवी लोक जैगिशव्याचे कौतुक करतात. नारद तेथे येतात व बोलतात, "जैगिशव्य देवलात गुंतला आहे त्यामुळे त्याचे मोक्ष स्थान बरोबर नाही. हे ऐकून सगळे घाबरतात. ते नारदाला सांगतात, "असे कांहीं बोलू नका". ते दोघे एकरुप झाले होते त्यामुळे देवलांचे भले होणार आहे. बलराम त्या क्षेत्रात स्नान करतो. त्यानंतर तो सोमतिर्थी जातो.
सल्य पर्व भाग पन्नासावा संपला.

## सल्य पर्व

## भाग एकावन्नावा

वैशंपायन पुढे सांगतात, त्या ठिकाणी सोमाने राजसूययज्ञ केला होता कल्पाच्या आधी. त्यानंतर एक मोठेयुद्ध झाले, त्यात तारकासूर मुख्य होता. तेथे स्नान करून तो बलराम पुढे निघाला. पुढचे तिर्थ होते सारस्वत. ते त्या नांवाच्या मुनीच्या नांवावरून तसे समजले जात होते. तेथे बलराम स्नान करतो पुढे निघतो. प्राचीन काळी त्या मुनीने ब्राह्मणांना वेद शिकवले होते. जनमेजय विचारतो, "सारस्वत मुनी ब्राह्मणांना बारा वर्षे वेद कां शिकवत होते जर त्या काळात दुष्काळ पडला होता".

वैशंपायन सांगतात, त्या प्राचीन काळी, दधीची नांवाचा ऋषी रहात होता. त्याची इंद्रिय त्याच्या पूर्ण नियंत्रणात होती. तो ब्रह्मचारी होता. त्याच्या घोर तपस्येमुळें इंद्राला त्याच्या बद्दल आसुया वाटू लागली. त्याला वाटले किं, दधीची त्याचे इंद्रपद घेईल. इंद्र त्याच्या वासनांची परीक्षा घेण्याचे ठरवतो. तो एका अतिसुंदर अप्सरेला त्याच्याकडे धाडतो. तिचे नांव अलमवुषा होते. तिला पाहून दधीचीचे वीर्य सरस्वती नदीत पडते. ती ते सांभाळते. तिला दिवस जातात. यथावकाश तो गर्भ वाढत गेला व एक बालक जन्मले. ते घेऊन नदी एका ऋषीकडे गेली. ती त्या दधीची ऋषीला पहाते. त्याच्या हवाली ते बाल करते तेव्हां बोलते कीं, "अहो ब्राह्मणा, हे तुझे बालक आहे. तुझ्यावरील भक्तीखातर मी ते वाढवले माझ्या गर्भात. आता तू त्याच्यावर संस्कार कर. ऋषीला ती आठवण करून देते कीं, अवलवुषा पाहून तुझे वीर्य निघाले ते माझ्या पाण्यात पडले होते ते मी वाढवले होते. तुझे वीर्य व्यर्थ जाऊ नये म्हणून ते मी केले आहे. त्याचा स्वीकार कर. ऋषी ते बालक स्वीकारतो. त्याच्या स्पर्शाने त्याला आनंद होतो. तो त्याच्या पुत्राचे कपाळ हूंगतो. त्याला मिठी मारतो. दधीची सरस्वतीला वर देतो कीं, ह्यापुढे विश्वदेव, ऋषी, गंधर्व, अप्सरा तुझ्या पाण्याचे अर्घ्य देतील. तुझ्या किनार्यावर तिर्थक्षेत्र वसेल. तो तिला सांगतो कीं, तिने त्याच्यावर मोठी कृपा केली आहे त्याचा मुलगा त्याला देऊन. त्यानंतर त्या मुलाचे नांव तो ठेवतो, सारस्वत. तो तिला सांगतो कीं, त्याच्या नांवामुळे तुला सगळे

ओळखतील. पुढे येणार्या बारा वर्षाच्या अवर्षणाच्या काळात तो ब्राह्मणांना वेद शिकवेल. माझ्या कृपेमुळे तू मोठी नावाजलेली नदी होशिल. ते ऐकून नदीला आनंद होतो. ती त्या बालकाला घेऊन जाते त्या बालकाच्या संगोपनार्थ. त्या सुमारास देव आणि दानव युद्ध सुरू होते. शस्त्र सामुग्रीसाठी इंद्र तिनही जग फिरत असतो. परंतु, त्याला दानवांना मारू शकतील अशी शस्त्रं मिळाली नाहीत. तो दधीचीकडे जातो व त्याची व्यथा सांगतो. दधीची त्याला स्वताची हाड देतो व सांगतो कीं, ह्या हाडांची शस्त्रं बनव व त्याने दानवांना पराभूत कर. ताबडतोब दधीची समाधी घेतात. त्यांचा अस्थी इंद्र घेतो व त्यापासून वज्र बनवतो. जे सर्वात जास्त शक्तीशाली शस्त्र असते. दानवांचा पराभव करतो. दधीची परमात्म्यात विलीन झाले होते. दधीची भृगूची संतान होती. त्या युद्धानंतर एक मोठा दुष्काळ सुरू होतो. तो बारा वर्षे होता. अनेक ऋषी अन्नासाठी परदेशात जातात. ते पाहून सारस्वत ठरवतो की, तोसुद्धा परदेशी जाईल. त्याची माता सरस्वती त्याला सांगते, तू जाऊ नकोस मी तुला खाद्य पुरवीन. त्यात मांसे असतील. ते खाऊन तू व तुझे शिष्य जगू शकाल. ते ऐकल्यावर सारस्वत त्याच्या शिष्यांसह तेथे सरस्वतीच्या तटावर राहू लागला. त्यांचा मुख्य आहार मांसें झाला होता. (*आजसुद्धा त्यांचे वंशज, स्मार्त ब्राह्मण सारस्वत, मुख्यत्वे मासळी व मांस खातात. त्यांच्या वस्त्या बंगाल व महाराष्ट्रात व काश्मीर येथे आहेत.*) त्यांचे वेदाचे अध्ययन अव्याहतपणे चालू होते. इतर ब्राह्मण समाज वेद विसरून गेले कारण त्यांचा सगळा काळ अन्न मिळवण्यासाठी खर्च होत होता. अशारितीने त्या कठिण प्रसंगी वेद सारस्वतांनी सांभाळले होते. नंतर ते पुन्हा इतर ब्राह्मणांनी शिकण्यास सुरूवात केली. कित्येक ब्राह्मण त्यांचे संस्कार हरवून गेले होते. दुष्काळ संपल्यावर साठ हजार ब्राह्मण विविध देशातून त्यांच्याकडे वेद शिकण्यासाठी आले होते. अशी आहे ह्या सारस्वत क्षेत्राची कहाणी. बलराम तेथे स्नान करतो. त्यानंतर तो एका तिर्थक्षेत्री जातो जेथे साधवी रहात होती.

सल्य पर्व भाग एकावन्नावा संपला.

# सल्य पर्व

## भाग बावन्नावा

जनमेजय विचारतो, "मला सांगा अहो ब्राह्मणा, ती संन्यास कां घेते? ती काय मिळवण्यासाठी संन्यास आचरते व त्याने तिला काय मिळाले ते मला ऐकावयाचे आहे. ती कथा विलक्षण आहे, मी ती तुमच्याकडून आधीसुद्धा ऐकली आहे पण पुन्हा ऐकण्याची इच्छा आहे".

वैशंवायन पुढे सांगतात, फारपूर्वी एक महान ऋषी हेऊन गेला त्याचे नांव होते कुनीगर्ग. त्याच्या तपस्येच्या काळात त्याला एक कन्या होते त्याच्या इच्छा शक्तीपासून. तिचे केस पिंगट असतात. तिला पाहून तो फार सतुष्ट होतो. त्यानंतर तो समाधी घेतो व निजधामाला जातो. ती निर्दोष मुलगी बापाच्या संस्कारात जे शिकली ते व्रतस्थ जीवन जगत असते. ती तिच्या पित्याची व देवांची पुजा करत असें. तशी ती अनेक वर्षे रहात असते. तिच्या पित्याला तिचा विवाह करावयाचा होता परंतु, तिला लग्न करावयाचे नव्हते. ती पितर आमि देवांची पुजा करत असे. अशाप्रकारे आयुष्य गेल्यावर ती अतिवृद्ध झाला अशीं कीं, तिचे अवयव तिला वापरता येत नव्हते. ती अपंग झाली होती. दुसर्याच्या मदतीशिवाय ती कांहीं करू शकत नव्हती. ती मरण्याचा विचार करत असे. एक दिवस नारदमुनी तिच्याकडे येतात. ते तिला सांगतात कीं, तू स्त्री असून लग्न केले नाहीस त्यामुळे तुझ्याकडून ब्रह्माची सेवा (संसार करणे म्हणजे ब्रह्माची सेवा) झालेली नाही, म्हणून तुला कोणताही लोक मिणार नाही. तू अशीच लटकत रहाशिल. तुझे वैराग्य तुला कामी येणार नाही. ती मात्र स्वताला आनंदी समजत असते. ते नारदाचे ऐकून ती ऋषीमंडळाकडे विचारणा करते किं, "त्यात कांहीं तथ्य आहे कां"? नंतर ती तेथे असलेल्या तपस्यांना सांगते कीं, ती तिचे अर्धे पुण्य त्याला देईल जो तिच्याशी लग्न करील. ते ऐकल्यावर तेथे असलेला ऋषी, जो गलवाचा (गुराख्याचा) मुलगा होता त्याचे नांव श्रृंगवत होते तिचा हात धरतो. तो बोलतो अहो वृद्धा मी तुझ्याशी लग्न करत आहे, आपण फक्त एक रात्र एकत्र रहाणार आहोत. त्यांचा विवाह होतो. त्या रात्री ती पुन्हा पूर्वीसारखी सुंदर होते, तिचे वृद्धत्व नाहीसे झाले होते. दागदागिने

घालून ती नटून थटून तयार होते. तो चमत्कार पाहून श्रृंगवत फार खूष होतो. ते एक रात्र एकत्र रहातात. त्यानंतर ती साध्वी त्या तिर्थाला आशिर्वाद देते कीं, जो येथे एक रात्र सौभाग्याची काढेल त्याला माझ्या वया एवढे ब्रह्मचर्य (५८ वर्षे) पालन केल्याचे श्रेय मिळेल. त्यानंतर ती साध्वी स्वर्गात जाते. तिला गेलेले पाहून सगळे ऋषी खिन्न होतात. श्रृंगवत सुद्धा तिच्या मागून स्वर्गात जातो. तिच्या पुण्याईमुळे त्याचा उद्धार झाला होता. ते बलराम ऐकत असतांना त्याला युद्धाच्या वार्ता मिळत असतात त्यात त्याला समजते कीं, सल्य मारला गेला आहे. ते ऐकल्यावर तो समंतपंचका बाहेर जातो व कुरुक्षेत्राची काय बातमी आहे ते विचारतो. त्याला दुःख होते. ते ऋषी त्याला सगळे सांगतात.

सल्य पर्व भाग बेचाळीसावा संपला.

# सल्य पर्व
## भाग त्रेपंन्नावा

ऋषी सांगतात, अहो बलराम, हे समंतपंचक ब्रह्माचे उत्तर दिशेकडील शेवटचे स्थान आहे. त्या क्षेत्राला कुरु वंशाच्या पूर्वजानी विकसित केले आहे. म्हणून त्याला कुरु क्षेत्र असें नांव पडले आहे. बलराम त्यांना बोलतो ह्या कुरुक्षेत्राची माहिती मला सांगा. प्राचीन काली कुरु येथे कृषी करण्याचा प्रयत्न करत होता. स्वर्गातून एकदा इंद्र आला व त्याला विचारतो कीं, तो हे काय करत आहे? तो राजा सांगतो, मी अशासाठी हे करत आहे कारण जे ह्या ठिकाणी लढतांना मरतील ते स्वर्गात जावेत. ते ऐकून इंद्राला हसू आवरत नाही. त्यानंतर तो त्याच्या ठिकाणी जातो. इंद्र पुनः पुनः त्याला विचारतो व कुरुतेंच उत्तर देतो. त्यानंतर तो त्याच्या देवांना बोलावतो व कुरु जे सांगत होता ते सांगतो. ते सुचवतात कीं, जर ते थांबावयाचे असेल तर त्याला त्या प्रकारचा आशिर्वाद देऊन टाका. ते इंद्राला पटते. तो पुन्हा खाली येतो व सांगतो कीं, हे तुझे उद्योग बंद कर व मी काय सांगतो ते ऐक, "जर तुझ्या म्हणण्या प्रमाणे लोक येथे मरून स्वर्गात जाऊ लागले तर कोणी देवांसाठी यज्ञ करणार नाही. आम्ही कसे जगणार"? मी तुला एक आशिर्वाद देतो कीं, "जे लोक येथे मरतील ते स्वर्गात जातील". इंद्र त्याला तथास्तू बोलून आशिर्वाद देतो. इंद्रसुद्धा मजेत निघून जातो.

इंद्र त्यासाठी एक कवन करतो त्यात ते सांगितले जाते, सगळे ब्राह्मण ते गात असतात. कुरुक्षेत्राच्या स्तुतीचे ते कवन होते. अरे बलरामा, येथील धूळ सुद्धा पापी माणसाचे शुद्धीकरण करत असते. त्या काळापासून येथे मोठे मोठे राजे येऊन यज्ञ करत असतात. तरंतुक आणि अरंतुक मधील प्रदेश आणि भार्गव सरोवर ते शामचक्र हा प्रदेश कुरुक्षेत्र समजला जातो. समंतपंचक हा त्याचा उत्तरेकडील भाग आहे. हा प्रदेश पवित्र समजला जातो. म्हणून ह्या ठिकाणी पांडव आणि कौरव त्यांचे युद्ध करत होते. म्हणजे त्यात जे गेले ते थेट स्वर्गात गेले. असा साक्षात शक्राचा वादा आहे, ऋषी सांगतात. त्याला ब्रह्म, विष्णू व महेश्वर मान्य करतात.

सल्य पर्व भाग त्रेपंन्नावा संपला.

# सल्य पर्व

## भाग चौपन्नावा

वैशंपायन सांगतात, कुरुक्षेत्राला भेट देऊन तो कृष्णाचा ज्येष्ठ बंधू पुढे निघतो. तो एक मोठा आश्रम होता. तेथे विविध फळांचे वृक्ष होते. त्या अमृत, आंबा, प्लक्ष, न्युग्रोध, फणस, अर्जुन असे वृक्ष होते. ती पवित्र जागा पाहून बलराम आनंदी झाला. तेथे रहाणारे ऋषी तो पहातो. तो विचारतो त्यांना कीं, तो आश्रम कोणाचा आहे. त्याला ते सांगतात ते तुला मी सांगतो ते ऐक. ह्या ठिकाणी भगवान विष्णू घोर तपस्या करत होते फार प्राचीन काळी. येथे तरूण ब्रह्मचारीणी तपस्या करत असतं. शांडील्य ऋषीला एक कन्या होते. ती मोठी तपस्या करते जशी साधारण बाई करू शकणार नाही. त्यानंतर ती स्वर्गात जाते. म्हणजे तो आश्रम शांडील्य मुनीचा होता. तेथे तो सगळे पावित्र्य वाढवणारे विधी करतो. तेथून तो एका एकांतात असलेल्या तिर्थाकडे जातो. त्या तिर्थाचे नांव होते प्लक्षप्रश्रवण. तेथून तो कर्पवन नांवाच्या क्षेत्री जातो. तेथे तो एक रात्र रहातो. त्यानंतर तो मित्रवरुण फार पूर्वीचे क्षेत्र पहातो. तेथून तो सरस्वती नदी सोडून यमुना तटी पोहोचतो. तेथे इंद्र अग्नी आणि आर्यमन एकत्र रहात होते ती जागा तो पहातो. तेथे स्नान करतो. तेथे असलेल्या सिद्धांशी तो बोलतो. त्याला तेथे चांगली माहीती मिळते. तो ती जागा पहातो जेथे नारद नेहमी येत असतात. असें सांगतात कीं तेथे नारद नाचत असतं. बलराम बसलेला असतांना नारद तेथे येतात. ते त्याला त्या युद्धाचे सगळे सांगतात. ते ऐकून बलरामाला फार वाईट वाटते. नारद त्याला सांगतात भिष्म, द्रोण व सिंधचा राजा मारले गेले आहेत. विकर्तन सुद्धा कामी आला आहे. सल्यसुद्धा मारला गेला आहे. दुर्योधनासाठी लढणारे सगळे मेले आहेत. आता हयात असलेल्यात दुर्योधन आहे कौरवांचा. त्याशिवाय त्याला साथ देणारे तिघे आहेत कृप, कृतवर्मन आणी अश्वत्थामा. बाकीचे पळाल्यामुळे वाचले आहेत. कौरवांचे सगळे फार दुःखात आहेत. दुर्योधन एका तलावात लपून बसला आहे. पांडव त्या तलावाकडे गेले आहेत पण दुर्योधन बाहेर येत नाही. ते त्याची बाहेर येण्याची वाट पहात आहेत. दुर्योधन त्याची गदा घेऊन पाण्यात गेला आहे. त्यानंतर

तो भिमाशी द्वंद्व करण्यासाठी राजी झाला आहे. ते द्वंद्व आजच होणार आहे. जर तुला पहावयाचे असेल तर त्वरित त्या तलावाकडे जावे लागेल. ते दोघे तुझे शिष्य आहेत हे विशेष. सिद्ध (नारद) सांगावयाचे थांबतो.

वैशंपायन पुढे सांगतात, नारदाचे ते ऐकून बलराम त्यांचा निरोप घेतो व त्या तलावाकडे निघतो. सगळ्या त्याच्या बरोबर असणार्या ब्राह्मणांनासुद्धा जाण्यास सांगतो. त्याची तिर्थयात्रा संपली असें तो त्यांना सांगतो. त्यांना द्वारकेला जाण्याचे सांगतो. तोसुद्धा त्या वनातून प्रयाण करतो. तो प्लक्षप्रश्रवण तिर्थ सोडतो. सरस्वतीचे गुणगान करत ते यात्री द्वारकेला निघतात. बलराम एक वेगवान रथ घेतो व निघतो दुर्योधन व भिम ह्यांना भेटावयाला. त्याला ते द्वंद्व पहावयाचे असते.

सल्य पर्व भाग चौपन्नावा संपला.

[सरस्वती नदी व तिच्या तीरावरील तिर्थक्षेत्रे आज अस्तित्वात नाहीत.]

# सल्य पर्व

## भाग पंचावन्नावा

वैशंपायन पुढे सांगतात, "अशाप्रकारे झालेल्या त्या भयंकर युद्धाबद्दल धृतराष्ट्र बोलतात, बलरामाला येतांना पाहून, अरे संजया, मला सांग माझ्या मुलांने काय केले"?

संजय सांगतो, बलरामाला आलेले पाहून दुर्योधन आनंदी झालेला दिसतो. बलरामाला आलेला पाहून युधिष्ठीर उठून त्याला अभिवादन करतो. त्याला बसण्यासाठी आसन देतो. त्यानंतर राम त्याचे त्याला मिळालेल्या यशाबद्दल कौतुक करतो ते असें, "मला अनेक ऋषींना सांगितले आहे की, हे कुरुक्षेत्र फार पवित्र क्षेत्र आहे. तेथे मरणार्याचे सगळे पाप धुतले जाते. ते स्वर्गा इतके शुद्ध आहे. देव, ऋषी आणि ब्राह्मण तेथे जाऊन यज्ञ करतात त्यांच्या उत्कर्षासाठी. जे येथे मरतात लढाईत ते थेट स्वर्गात पोहोचतात. म्हणून मी त्वरेने समंतपंचकाकडे निघालो. त्याला देवांची यज्ञभूमी समजतात व त्याची वेदी सर्वात जास्त श्रेष्ठ समजली जाते". ते ऐकल्यावर कुंतीचा मुलगा तथास्तु म्हणतो. ते समंतपंचकाकडे निघतात. तेथे दुर्योधन त्याची भलीमोठी गदा घेऊन क्रोधात पांडवांकडे जाऊ लागतो. त्याला तसे जात असतांना पाहून आकाशातील प्रेक्षक त्याचे टाळ्या वाजवून स्वागत करतात. ते ऐकून दुर्योधनाला उत्तेजन मिळते. त्याला अनेक हत्तीचे बळ येते. शंखूनादाने सगळे आसमंत दणाणून निघाले होते. ढोलकी, नगारे वाजू लागतात. ते एक उत्तम तिर्थक्षेत्र होते. तेथील जमिन वाळूमय नव्हती म्हणून तिची निवड त्या द्वंद्वांसाठी केली होती. भिम त्याच्या गदेनिशी सज्ज होता द्वंद्वांसाठी. तुमचा मुलगा, सुमेरू पर्वतासारखा तेजस्वी दिसत होता. ते दोघे एकमेकांना डोळ्याने आव्हानं देत होते. दोघे दांत ओठ चावत त्यांचा जोर व्यक्त करत होते. ते दोघे भयंकर रागावलेले दिसत होते. ते दोघे बलरामाचे शिष्य होते. ते मधू आणि केतभाच्या जोडीसारखे वाटत होते.

द्वंद्वाच्या प्रारंभाचे सुचक झाल्यावर ते दोघे एकमेकांकडे धावू लागतात. दोघे भरताचे वंशज होते परंतु, एकमेकाच्या जीवावर उठले होते. दांतओठ चावत ते त्यांच्या गदा

एकमेकांवर मारतात. जसे दोन दैत्य युद्धात भिडले आहेत. दुर्योधन युधिष्ठीराकडे पहात बोलतो, "कैकेया व पांचालांच्या संरक्षणाखाली आता सगळे येथे जमलेले राजे पहा आमचे द्वंद्व". ते बोलल्यानंतर सगळे राजे व इतर जमलेली मंडळी तेथे त्या दोघांच्या भोवती रिंगण करू बसतात ते युद्ध पहाण्यासाठी. त्या बसलेल्यांमध्ये निळ्या अंगरख्यात बसलेला गोरापान बलराम उठून दिसत होता.

ते होत असताना भिम व दुर्योधन एकमेकांचा अपशब्दाने उद्धार करत होते. आता केव्हांही त्यांची टक्कर लागणार होती.

सल्य पर्व भाग पंचावन्नावा संपला.

# सल्य पर्व

## भाग छप्पन्नावा

वैशंपायन सांगतात, त्यावेळी त्या दोघा योद्ध्यां एक मोठा वाद झाला, तो धृतराष्ट्राबद्दलचा होता. धृतराष्ट्र बोलतात, कीं, त्यांचा धिक्कार असो. माझा मुलगा अकरा चमूंचा धनी होता. त्याच्या नियंत्रणाखाली सगळे पृथ्वीचे राजे होते, त्यांचा सम्राट म्हणून तो गाजत होता, अरेरे, आता तो स्वतः गदा घेऊन लढण्यासाठी उभा आहे, काय दुर्दैव आहे पहा. त्याला म्हणतात दुर्भाग्य!

अरे संजया, माझ्या मुलाच्या दुःखाचे काय सांगावे. कोठे होता व कोठे येऊन पडला आहे पहा. असें बोलून तो अंध राजा गप्प बसतो. संजय बोलतो, घोघर्या आवाजात जो थोडा दबलेला सुद्धा होता, ओरडून भिमाला आव्हान देतो. त्यावेळी कांहीं अशुभ लक्षणं दिसत होती. जोराने वारे वाहून लागले. आकाशातून विचित्र ध्वनी येत होते, धुळीचे वाद सुरू झाले होते. सगळ्या दिशा मंद झाल्या होत्या. आकाशात गडगडाट ऐकू येत होता. आकाशात अशनिंचे फिरणे दिसत होते. विविध प्रकारचे पशू सैरावैरा धावू लागतात मोठमोठ्याने ओरडत. आकाशातून मोठे दगड पडू लागतात. डोंगरांची शिखरं कोसळून खाला आली होती. अशुभ पशू वावरतांना दिसू लागले. विहीरीतील पाणी एकदम उसळू लागले. जमिनीतून विचित्र आवाज येऊ लागले. अशी अनेक दुर्लक्षणं ठिकठिकाणी दिसू लागली. ती सक्षणं पाहून वृकोदर युधिष्ठीराला बोलतो, हा दुर्योधन मला हरवू शकणार नाही. मी माझा सगळा राग त्याच्यावर काढणार आहे. जी माझी फार पूर्वीची इच्छा आहे ती आज मी पुरी करणार आहे. माझ्या काळजात जे शर खुपसले आहेत ह्यांने इतक्या वर्षात ते सगळे मी आज उपटून काढणार आहे. त्याचा वध मी ह्या गदेने केल्यानंतर तुझ्या गळ्यात मी यशमाला घालणार आहे. त्याच्या शरीराचे शेकडो तुकडे मी करणार आहे. तो पुन्हा ह्या हत्तीच्या नगरात दिसणार नाही. आमच्या बिछान्यात साप ठेवणे, मला विष खायला देणे, मला पाण्यात बुडवण्याचा प्रयत्न करणे, आपल्याला जीवंत जाळण्याचा प्रयत्न करणे, पुन्हा पुन्हा अपमान करणे, आणि आपल्याला वनवासी करणे अशी अनेकविध पाप ह्या बदमाषाने केली आहेत त्याचा

जाब तो आज मला देणार आहे. आज त्याचा अंत होणार हे निश्चित. शंतनुच्या वंशाचा हा काळा ढब्बा आज कायमचा पुसला जाणार आहे. त्याचा पिता त्याच्या सगळ्या कुकर्माचा पाढा वाचणार आहे संजया पुढे.

दुर्योधनाला रुबाबात त्याची मोठी गदा खांद्यावर ठेवलेला असा भिम पहातो व त्याची सणक जाते. तो ओरडून दुर्योधनाला बोलतो, "अरे चांडाळा, ते सगळे आठव जे तू आमच्याशी केले आहे. द्रौपदीची विटंबना, द्युताचा खोटा खेळ, असें सगळे आठवं आणि युद्धाला तयार हो. तेथे गंगापुत्र शरशय्येवर समाधीस्थ आहेत. बाकीचे तुझे खास स्वर्गात तुझी वाट पहात आहेत. तुझी अक्कल शकूनी, तो सुद्धा नरकात तुला बोलवत असेल. त्याच्या बरोबर दुःशासन सुद्धा नरकात तुझी वाट पहात असेल. तुझ्या मूर्खपणा मुळे कित्येक सज्जन राजे मारले गेले आहेत. तू सुद्धा तसांच कोठेतरी जाणार आहेस आज".

तुझा मुलगा त्याला उत्तर देतो, "तुझी फालतू बडबड संपली असेल तर ये, आणि माझ्या हातून मरण्यास तयार हो. माझ्याशी लढून ते सगळे जे तू बोलत आहेस ते सिद्ध कर. अरे, किड्यासारखा वळवळणारा तू, मला मारून दाखव. मी म्हणजे कोणी तसा नाही कीं तू सहज मारू शकशिल. मीसुद्धा तुला गदायुद्धात ठार मारण्याची संधी पहात होतो ती आज मला मिळाली आहे. म्हणून खर्या योद्ध्यासारखा लढण्यास ये वेळ दवडू नकोस बडबडण्यात. तुझ्या सगळ्या शक्तीनिशी माझ्याशी लढ".

ते आव्हान ऐकल्यावर सोमकांचे व इतर योद्धे टाळ्या वाजवून प्रोत्साहन देतात. भिम त्याची गदा उचलून दुर्योधनावर चालून जातो, जसा मातलेला हत्ती जावा. पांडव आपापली शस्त्रं उचलून भिमाला उत्तेजना देतात.

सल्य पर्व भाग छप्पन्नावा संपला.

# सल्य पर्व

## भाग सत्तावन्नावा

संजय पुढे सांगतो, दुर्योधन मोठ्या ताकदीने भिमावर चालून जातो. त्यांच्या गदा एकमेकात अडकल्यासारख्या झाल्या होत्या. एकमेकावर गदेचे फटके मारत होते व ते चुकवण्याचे सुद्धा प्रयत्न होत होते. जणूकाय इंद्र व प्रल्हाद लढत होते. त्यांची शरीरं सगळी रक्तेने भरलेली होती. थोड्या काळाने ते दोघे थकल्यामुळे थांबतात. पुन्हा एकमेकावर हल्ला करू लागतात. त्यांच्या गदा आपटत तेव्हां मोठा आवाज होत होता व त्या आघाताने ठिणग्या उडत होत्या. त्यांचे युद्ध पहाण्यासाठी आकाशातील प्रेक्षक ढगावर बसून गर्दी करत होते. त्यात देव व गंधर्व जास्त होते. त्यातील कोण जिंकणार ह्यावर त्यांच्यामध्ये चर्चा जोरात होत होती. जसे ते गदेने फटके मारत पांडव आणि श्रींजय जोराने ओरडून भिमाला उत्तेजना देत होते. भिम गोल फीरत दुर्योधनावर गदेचा प्रहार करत होता व दुर्योधन तो चुकवत होता. असे सारखे होत होते. भिमाचे गोल फिरणे पाहून दुर्योधनाला नवल वाटत होते. त्याला समजत नव्हते कीं, नेमके कसे भिमावर वार करावेत. दुसर्यावर वार करत असतांना स्वतावर वार होणार नाही ह्याची ते खबरदारी घेत होते. गदायुद्धाचे भिमाचे ज्ञान समजत होते, त्यात दुर्योधन जास्त कसबी वाटत होता तर भिमाचा जोर त्याच्या शक्तीमान फटक्यावर होता. जर एक फटका दुर्योधनाला बसला तर तो संपला असता परंतु, दुर्योधन त्याचे जोरदार फटके शिताफीने चुकवत होता. त्याशिवाय तो कमी थकत त्याचे डाव खेळ होता. भिम दुर्योधनाला हूल देत त्याच्यावर वार करत होता. जसे उजवी कडून वार करणार असे दाखवत अचानरपणे तो डावीकडून वार करत असे. त्यातील जे दुर्योधनाला लागत होते त्यामुळे त्याची ताकद कमी होत होती. दोघेही गोल फिरत एकमेकांचे अंदाज चुकवत होते. अधूनमधून उंच उटी मारून ते प्रतिस्पर्ध्याची चाल चुकवत होते. तर कधी ते गदा फेकून मारत होते. असे सारखे होत होते. कोणी हार मानत नव्हते. दोघे तरबेज गदावीर आहेत असे सगळे समजत होते. मध्येच ते दोघे थांबत होते आणि अचानक वार करत होते. त्यात कोण जास्त चपळ आहे ते समजत होते. बर्याच वेळा ते गदायुद्ध

करत आहेत कां खेळत आहेत असा प्रेक्षकांना प्रश्न पडत असे. त्यांची शरीर रक्ताने भरलेली होती. तोंडावर येणारे रक्त त्यांना पुसावे लागत होते. डोळ्यात गेलेल्या रक्तामुळें काहीवेळी त्यांना दिसत नव्हते अशावेळी अंधाप्रमाणे ते गदा फक्त गोल फिरवत होते.

दुर्योधन उजव्या बाजूने वार करत होता तर भिम डाव्या बाजूने करत होता. अचानक दुर्योधन भिमावर वार करतो व तो वर्मी लागल्यामुळें तो खाली कोसळतो. ते पाहून पांडवांचे मोठ्याने आकांत करू लागतात. दुर्योधन त्या खाली पडलेल्या भिमाकडे पहात हसतो व नंतर तेथे जमलेल्या बघ्यांकडे पहातो. आपण जिंकत आहोत असे तो त्यांना सुचवू इच्छित होता. कांहीं क्षणात तो उठतो व त्याची गदा घेऊन कौरवावर हल्ला करतो. जसे यमाने वार करावा त्याच्या सोट्याने असे ते होते. मोठा गदारोळ होतो. दुर्योधनाची सरशी होते आहे असें दिसत होते ते कृष्णाला आवडत नाही असें त्याच्या चेहर्यावरून समजत होते. बलराम खूष दिसत होता. त्यांच्या गदा हवेत फिरत असतांना हवेचा आवाज होत होता. त्या आवाजावरून त्या गदेची ताकद समजत होती. दुर्योधनाची गदा जास्त वजनदार होती. दुर्योधन वेगाने धावत भिमावर गदेचा वार करत होता व त्याला भिम अडवत होता. त्यावेळी त्या गदांच्या प्रहारामुळें मोठा आवाज होत होता व ठिणग्या निघत होत्या. भिमाच्या एका वारामुळें दुर्योधनाच्या हातातून गदा खाली पडते. त्यामुळे त्याचा संताप होतो. ते त्याला सहन होत नाही. दुर्योधन गदा उचलतो व भिमावर चालून जातो. भिमावर एक जोरदार फटका तो मारतो परंतु, भिम जागचा हलत नाही. ते पाहून सगळे खूष होतात. दुर्योधनाला सुद्धा नवल वाटते. त्यानंतर तो दुर्योधनावर त्याची गदा जोराने फेकतो. दुर्योधन उडा मारतो व तो वार चुकवतो. त्यानंतर तो भिमावर गदा मारतो त्या फटक्याने भिमाला घेरी येते. पांडवांच्या बाजूचे नाराज झालेले दिसतात. अशारितीने ते एकमेकांवर गदा फेकून मारत असतात. भिम तुमच्या मुलावर एक जोरदार फटका मारतो व त्यामुळे दुर्योधन खाली कोसळतो. थोड्या वेळांनी तो त्याच्या गुडघ्यावर बसतो. श्रींजय मोठ्याने त्यांचा आनंद व्यक्त करतात. दुर्योधन खुनशी नजरेने भिमाकडे पहातो. तो उठतो व वेगांने वृकोदराकडे जातो. भिमाच्या डोक्यावर वार करतो. तरी भिम हलत नाही. भिमाच्या ताकदीला तो फटका

विशेष नव्हता. त्यानंतर तो त्याच्या लोखंडी गदेने दुर्योधनावर नेम धरून वार करतो. त्या फटक्याने दुर्योधन खाली कोसळतो. मोठा सालवृक्ष कोसळावा असें वाटते. पांडवांचे मोठ्या आनंदाने आरडाओरड करू लागतात. त्यांना फार आनंद झालेला होता. भिम त्या खाली पडलेल्य प्रतिस्पर्ध्याकडे तुच्छपणे पहात होता. दुर्योधन सावध होतो व उठून भिमावर वार करतो. थकल्यामुळे असेल कदाचित, भिम खाली कोसळतो. दुर्योधन मोठ्याने ओरडून आपली जीत सांगत होता. त्या फटक्याने भिमाचे संरक्षक कवच तो तोडतो. ते पाहून स्वर्गातील अप्सरा जोरा जोराने त्यांची गाणी गाऊ लागतात. सुगंधी फुल त्या खाली फेकतात. ते पाहून पांडवांच्या गोटात भितीचे वातावरण उत्पन्न होते. भिम उठतो, त्याचा चेहरा पुसतो जो रक्ताने भरला होता. डोळे गरागरा फिरवत तो स्वताला स्थीर करतो.

सल्य पर्व भाग सत्तावन्नावा संपला.

# सल्य पर्व

## भाग अठ्ठावन्नावा

संजय पुढे सांगतो, धनंजय आणि कृष्ण ते द्वंद्व निरखून पहात असतात. अर्जुन कृष्णाला बोलतो, "तुला काय वाटते, ह्यातील कोण जास्त सरस आहे"? कृष्ण सांगतो, "भिम शक्तीमध्ये जास्त आहे परंतु, कसब पाहीले तर दुर्योधन सरस आहे. म्हणून जर भिम त्याच्याशी नियमानुसार लढला तर कदाचित मार खाऊ शकतो. अशा परिस्थितीत चलाखी महत्वाची असते. जिंकण्यासाठी जेव्हां कसब कमी पडते तेव्हां चलाखी कामाला येत असते. प्राचीन काळी असुराना देवानी चलाखीने हरवले होते, विरोचन हरला कारण शक्राने चलाखीने काम केले होते. वलाचा वध करणार्याने वृत्राचा पराभव चलाखीनेच केला, चलाखी म्हणजे लुच्चेगिरी! त्याशिवाय यश सहसा मिळत नाही. कोणतेही यश मिळण्यासाठी चलाखी लागते केवळ ताकद अथवा कसब असून भागत नाही. म्हणून भिमाला सुद्धा त्याच्याशी लुच्चेगिरी करावी लागणार आहे जेव्हां दोघे तपल्यबळ असतात. नाहीतर मुष्कील होणार आहे कारण तुझ्या मूर्ख भावाने दुर्योधनाशी असे बोलणे केले आहे कीं, जर भिम हरला तर तुम्हाला पुन्हा वनवासात जावे लागेल. मोठ्या मुष्कीलीने मिळवलेले राज्य हातातून निघून जाईल. एक गोष्ट आपल्याला करता येईल ती अशी कीं, भिम दुर्योधनाच्या मांडीवर गदेने प्रहार करील असा कीं, त्याच्या मांडीचे हाड मोडेल. चलाखी करतांना ती सुद्धा बुद्धी वापरून करावयाची असते. तुला आठवत असेल, द्युताच्या वेळी भिमाने दुर्योधनाची मांडी मोडण्याची प्रतिज्ञा केली होती. ती त्याला आता पूर्ण करावी लागेल. दुर्योधन स्वतः सर्व गोष्टी चलाखीनेच करत आला आहे म्हणून त्याच्याशी चलाखी करणे नितीशस्त्राप्रमाणे योग्य आहे. जशास तसे हा नितीशस्त्राचा नियम आहे. चांगल्याशी चांगले व वाईटांशी वाईट हे नितीशास्त्रात दिले आहे. त्यामुळे तसे करणे योग्य होईल. सज्जन नेहमी बदमाषांपुढे कमी ठरतात त्याचे कारण हेंच आहे कीं, सज्जन त्या वाईट लोकांशीसुद्धा चांगले वागतात. तेथेच त्याचा पराभव होतो. जे लढाईत गेले ते तहात मिळवले असें होऊ शकते जर भिम हरला. कांहींतरी युक्ती केली पाहिजे त्यासाठी तू भिमाला त्याच्या प्रतिज्ञेची आठवण करून दे.

गेली तेरा वर्षे तो गदा लोखंडी पुतळ्यावर चालवत तालीम करत आहे. तो पुतळासुद्धा भिमाचा होता. त्याने असे कित्येक पुतळे त्या तालमीत तोडले आहेत, गोष्ट साधी नाही. त्यानंतर अर्जुन भिमाची नजर स्वताकडे खेचण्याचा प्रयत्न करू लागतो. भिमाची नजर त्याच्याकडे पडत होती तेव्हां तो त्याला खूणेने मांडी दाखवत होता. भिम त्याच्या खूणेचा अर्थ समजतो. त्यानंतर तो दुर्योधनाच्या मांडीवर प्रहार करण्याचा प्रयत्न करू लागतो. गदा नाचवत तो असे दाखवत होता कीं, तो गदेच्या विविध चाली दाखवत आहे. दुर्योधन त्यात रमला त्याला भिमाचा उद्देश समजला नाही. मग तो त्याची गदा हवेत गोल फिरवत असतो. ते होत असताना ते दोघे थकत होते. पुन्हा लढू लागले. एकमेकांवर गदचे प्रहार करत होते. एकदा भिम गदा उंच उडवतो अशीं कीं, ती दुर्योघनाच्या अंगावर पडेल. पण दुर्योधन चपळाईने दूर होतो व भिमाचा नेम थोडक्यात हुकतो. दुर्योधन त्याच्याकडे पाहून हसतो. गदा नसलेल्या भिमावर तो जोराचा वार करतो. भिमाला घेरी येते. दुर्योधनाला वाटते कीं, आता भिम उठणार नाही म्हणून तो थोडा बेसावध रहातो. त्याचवेळी भिम मोठ्या ताकदीने त्याच्या वर गदा मारतो. ती दुर्योधनाच्या मांडीवर बसते. ज्याला गदातंत्रात अवस्थान म्हणतात. म्हणजे अशी जागा जेथे गदा मारावयाची नाही. तो फटका फारच जबरदस्त होता. दुर्योधनाच्या दोनही मांडींची हाडं मोडतात. दुर्योधन खाली कोसळतो. त्याला उठता येत नाही. जरी मेला नव्हता तरी द्वंद्वाच्या तंत्रानुसार तो हरला होता. कारण त्याला आता कधीच उभे रहाता येणार नसते. भिम जिंकला होता. त्या बरोबर पुन्हा कांहीं अशुभ चिन्ह दिसू लागतात. वारे जोराने वाहू लागतात. आकाशातून मोठे अशनि येऊन जमिनीवर आदळू लागतात. रक्तमिश्रीत पाण्याचा पाऊस पडू लागतो. आकाशात यक्ष, राक्षस, पिशाच्च जमा झाली होती. ते विचित्र आवाज करत होते. एकंदर भयाचे वातावरण तयार झाले होते. पांडवांचे लोक मोठ्याने ओरडू लागले होते. जमिनीतून विचित्र आवाज येऊ लागतात. कोल्हे ओरडू लागतात. खेचरं खिंकाळत असतात. त्याच वेळी आकाशातून शंखनाद ऐकू येतात. पांचाल, श्रींजय, सोमक, आनंदाने नाचूं लागतात. आकाशात जमलेले देव, दानव, ऋषी निघून जातात. सगळे बोलतात, एक उत्तम द्वंद्व पाहिले. सल्य पर्व भाग अठ्ठावन्नावा संपला.

# सल्य पर्व

## भाग एकोणसाठावा

संजय पुढे सांगतो, दुर्योधन एकाद्या वृक्षासारखा मातीत कोसळलेला पाहून पांडवांकडचे आनंदाने जल्लोष करू लागतात. त्यांच्या आनंदात सोमक आणि पांचालसुद्धा सामील असतात. तो खाली पडलेला पाहून भिम त्याच्या जवळ जाऊन त्याला ओरडून बोलतो, "अरे नीचा, तू आमच्या द्रौपदीला हसत होतास काय? तिचे केस धरून तुम्ही तिला सभेत आणलेत, तिच्या अंगावर वस्त्र नाही ह्याचासुद्धा विचार केला नाहीत तुम्ही, आम्हाला डरपोक म्हणून हिणवत होतात, आम्हाला संन्याशाच्या वस्त्रात वनात जाण्यास भाग पाडलेस, असं बोलून तो रागावलेला वृकोदर त्याच्या डोक्याला लाथ मारतो. ते राजे तेथे जमलेले पहात असतात. भिमाचे डोळे लाल झाले होते. "जे आमच्यावर नाचले आता आम्ही त्यांच्यावर नाचणार आहोत. द्युतात आम्ही सरळ खेळलो व तुम्ही चलाखीने, त्याची किंमत आता तू देत आहेस. तसे बोलून तो जोराजोराने हसू लागला. तुझ्या ह्या परिस्थितीला तूंच जबाबदार आहेस. आम्हाला तीळाचे दाणे म्हणतोस काय? तुमचे सगळे सवंगडी आम्ही मारले आहेत ते काय तीळाच्या दाण्याने कां? हा सगळा तुमच्या कर्मफळाचा प्रभाव आहे"? मेल्यानंतर आपण कोठे जातो ते पहाणे निरर्थक असते, येथे काय केले त्याचाच अखेरीस विचार होत असतो. पुन्ह एकदा तो त्याची गदा उचलतो, दुर्योधनाला पुन्हा एकदा लाथ मारतो. अनेक सोमक ते पाहून नाराज होतात कारण ती कृती नितिशास्त्रानुसार चुकीची होती. ते व्यक्त करण्यासाठी ते त्यांचा माना वळवतात. युधिष्ठीराच्या ते लक्षात येते. पुन्हा एकदा लाथ मारल्यावर तो नांचू लागतो. ते पाहून युधिष्ठीर भिमाला आवरण्यासाठी उठतो व त्याला बोलतो, "अरे भिमा, मारलेल्याला आणखीन मारत नाहीत हे तुला माहीत नाहीकां? असे पापकारक कृत्य कृपया करू नकोस. अशारितीने तू मोहाच्या आहारी गेलास तर तुझा अध्यात्मिक र्हास होईल ते लक्षात घे. इतर गोष्टीसुद्धा पहावयाच्या असतात. तो एक राजा होता, तो अकरा अक्षौहिणी सैन्याचा स्वामी होता, तो तुझा आप्तसुद्धा आहे, त्याशिवाय आता त्याचे सगळे नष्ट झाले आहे आमच्या कारवाईमुळे,

तो राजासुद्धा राहिलेला नाही, त्याचे मुलगे, भाऊ, इतर नातवाईक सगळे तुम्ही मारले आहेत, आणखीन काय करावयाचे. तू एक गुणी इसम आहेस व तू तसाच रहावा असें मला सुचवावयाचे आहे. त्याचे श्राद्ध करावयाला सुद्धा आता कोणी नाही अशा दुर्भागीच्या डोक्यात लाथ कशाला मारावयाची. आपल्या अयोग्य वागण्याने आपण आपल्यात मित्रांच्या नजरेतून उतरलो तर ते योग्य होणार नाही". एवढे बोलल्यानंतर तो दुर्योधनाकडे जातो व त्याला उद्देशून बोलतो, "भिमाच्या वर्तुणूकीचे वाईट वाटून घेऊ नकोस, हे मात्र खरे कीं, आज जी तुझी अवस्था झाली आहे त्याची सगळी जबाबदारी तुझीच आहे. तुझ्या कर्माचे फळ तू भोगत आहेस. आता तू आम्हाला निसर व आम्ही तुम्हाला विलरणार आहोत. त्यामुळे ते नको असलेले वैर संपुष्टात येईल असे मी समजतो. ह्या युद्धाचा आग्रह तुझा होता. आम्ही सतत समझौता मागत होतो, परंतु, तुझ्या आग्रहामुळे हा नरसंहार झाला ज्यात तुझे सर्वस्व नष्ट झाले आहे. जसे करावे तसे भरावे, असा न्याय आहे सृष्टीचा त्याची प्रचिती तू घेत आहेस. वस्तुतः तुझ्याबद्दल दया करण्याची तुझी योग्यता नाही. परंतु, तुझ्यावर राग काढताना आमची अध्यात्मिक अवनती होऊ नये म्हणून मी माझ्या भिमाला रोखले आहे. आमचेसुद्धा सगळे आप्त ह्या समरात मारले गेले आहेत व म्हणून आम्हीसुद्धा मोठ्या सुतकात आहोत. युद्ध जिंकून सुद्धा मला तो आनंद होत नाही परंतु, केवळ समाधान आहे कीं, आम्ही सत्याची जीत करण्यात कामयाब झालो आहोत. पापशक्तीचा बिमोड करण्यासाठी क्षात्रतेज वापरावयाचे असते ते आमच्या क्षत्रियांनी केले ह्यात मला समाधान आहे. कुरुक्षेत्री तू मरत आहेस म्हणून तू ह्यापुढे स्वर्गात जाशिल जे आवाहन सतत करत तू तुझ्या निष्पाप योद्ध्याना मृत्यूच्या खाईत ढकलत होतास त्या खाईत आता तू जात आहेस. आम्ही मात्र येथे तूझ्यामुळे नष्ट झालेले पुन्हा उभारण्यात गुंतणार आहोत. उराशी आप्ताच्या विरहाचे दुःख ठेवून ते करावयाचे आहे. तुमच्या विधवांचे व लहानग्यांचे संरक्षण आम्ही प्राणपणाने सन्मानपूर्वकपणे करणार आहोत. त्याबद्दल निश्चिंत रहा. तुमचे नंतर जन्मणारे वंशज आमच्या रोषाला बळी पडणार नाहीत अशी दक्षता मी बाळगणार आहे. तुमच्या वरील राग त्यांच्यावर काढला जाणार नाही असें मी तुला आश्वासन देतो. असे बोलून त्याचे दुःख तो लपवत असतो. सल्य पर्व भाग एकोणसाठावा संपला.

# सल्य पर्व

## भाग साठावा

धृतराष्ट्र बोलतो, "माझा मुलगा अवैधरित्या हरवला गेला हे पाहून त्याचा उस्ताद अर्थात बलराम काय बोलला"?

संजय सांगतो, दुर्योधनाच्या मांडीवर गदा मारल्याचे पाहून बलराम चिडतो. त्याचे शस्त्र नांगर घेऊन तो भिमावर धावण्याच्या तयारीत असतो तेव्हां त्याचा भाऊ कृष्ण त्याला आवरतो व सांगतो, "असे क्षणात रागावणे हा तुझा दोष आहे हे मला ठाऊक आहे. त्यासाठी जरा मी काय सांगतो ते ऐक. माणसाच्या प्रतिक्रीया भावनेवर असतील तर त्यामुळे त्याचे मोठे नुकसान होत असते. म्हणून तू तुझ्या भावना काबूत ठेव व मी काय सांगतो ते नीटपणे ऐक. नितीशास्त्राप्रमाणे माणसाच्या प्रतिक्रीया विवेकाने त्याने केल्या पाहिजेत. आता असे पहा, व्यवहार शास्त्रा प्रमाणे, सहा प्रकारे माणसाने आपले धोरण ठरवावयाचे असते. ते असे, आपले भले कशात आहे, त्यानंतर आपल्या मित्राचे कशात आहे त्यानंतर त्या मित्राच्या मित्राचे कशात आहे अशा रितीने धोरणं आखावयाची असतात. जर हा नियम येथे लावावयाचा तर आपल्या शत्रूचा नाश, त्यानंतर आपल्या मित्राच्या शत्रूचा नाश, त्यानंतर आपल्या मित्राच्या मित्राच्या शत्रूचा नाश ह्यात आपले हित असते. ह्या प्रमाणे पांडव आपले जवळचे आप्त व मोठे हितचिंतक आहेत. म्हणून त्यांच्या भल्यात आपले भले आहे. हे लक्षात घे. त्याशिवाय कौरवांनी पांडवांवर जे अनन्वित अत्याचार केले त्याचासुद्धा तुला विचार करावा लागेल. त्याशिवाय भिमाची प्रतिज्ञा होती कीं तो त्याची गदा दुर्योधनाच्या मांडीवर मारेल, अशी प्रतिज्ञा करण्याचे कारण दुर्योधनाने त्यांची पत्नी द्रौपदीला त्याच्या मांडीवर बसण्यास सांगितले होते, त्यावेळी भिमाने प्रतिज्ञा केली किं, द्रौपदी ऐवजी त्याची गदा दुर्योधनाच्या मांडीवर बसेल. त्या प्रतिज्ञेनुसार त्याने केले तेव्हां त्यात गदायुद्धाच्या नियमांचा संबंध येत नाही. त्याशिवाय ऋषी मैत्रेय ह्यानी दुर्योधनाला शाप दिला होती कीं, भिमाच्या गदेने त्याच्या मांड्या फुटतील. तो शाप सिद्ध झाला आहे त्यात भिमाला सर्वस्वी कसे तू जबाबदार ठरवतोस"? म्हणून भिमावर रागावणे तुला शोभत नाही".

कृष्णाचा युक्तीवाद ऐकल्यानंतर शात झालेला बलराम बोलतो, नितिशास्त्र हे एक दुधारी शस्त्र असते. जर त्याचा योग्य उपयोग झाला तर ते फायद्याचे असते. फायद्याची इच्छा, सुखाची इच्छा आणि हिताची इच्छा ह्यांत मेळ घालणे बर्याचवेळी कठीण होते. कोणते अधिक चांगले ते परिस्थितीनुसार ठरवले जाते. त्यांत नेहमीच सापेक्षता असते. तरी तू सांगतोस म्हणून मी पांडवांना जास्त जवळचे समजतो त्या प्रमाणे जे घडले ते हिताचेच आहे असें दिसते. मी तुझे मान्य करतो. असें बोलून बलराम शांत होतो. कृष्ण त्याला बोलतो, "अरे बंधू लक्षात ठेव कलीयुग सुरू होणार आहे नजिकच्या काळापासून, पांडवांनी त्यांचे शब्द खरे केले आहेत व त्यासाठी जे घडले ते जरूरीचे होते".

संजय बोलतो, तरी एकंदर ते द्वंद्व अन्यायकारक झाले हे बलराम त्याला सांगतो व पुढे बोलतो कीं, पुढे येणार्या कलियुगात लोक सांगतील की, दुर्योधनाचा पराभव अवैध पद्धतीने करण्यात आला. जसे सगळे दैत्यांचे, दावनांचे पराजय इंद्राने नेहमीच अवैध पद्धतीनेच केले होते, तसेंच झाले. असे बोलून बलराम त्याची भिमाबद्दलची नाराजी व्यक्त करतो. त्यानंतर तो द्वारकेला प्रस्थान करतो. युधिष्ठीर नेहमीप्रमाणे पुन्हा दुःखी होतो कारण दुर्योधन दगा फटक्याना मारला गेला होता. नैतिकतेचे अवडंबर माजवणारा तो कुंतीपुत्र कांहीं बोलत नाही पण मनातल्या मनात खूष असतो कीं, त्याचे राज्य आता सुरक्षित झाले आहे. पाप करावयाचे नाही असे सांगणारा तो पाखंडी पांडव त्या पापामुळे मिळणारे फळ खाण्यास मात्र तयार होता!

वासुदेव त्याला बोलतो, "अरे धर्माच्या मुला, तुझ्या भिमाने त्या नराधमाला लाथ मारली ह्याचे तुला एवढे कां वाईट वाटते. अभिमन्यूवर जे अन्याय झाले त्याच्या पुढे हे कांहींच नाही असे असतांना त्या गोष्टीचा बाऊ कां करत आहेस? युद्धात ते करणे आवश्यक असते शत्रूचा नाश करण्याच्या पद्धतीत ते बसते".

युधिष्ठीर बोलतो, "भिमाचे क्रोधाने तसे वागणे मला आवडलेले नाही. कौरवाने आपल्याला फार वाईट वागवले तरी आपण तसे वागू नये असे मला वाटते. दुर्योधनाला त्यांने त्याच्या स्वभावानुसार शिक्षा केली असें मी समजतो मग ते योग्य का अयोग्य ते महत्वाचे नाहीच".

संजय पुढे सांगतो, कृष्ण ते मान्य करतो व भिमाचे करणे श्रेयस्कर समजावे कारण नैतिकतेत "जशास तसे", हा न्याय आहे व भिमाचे वागणे त्या प्रमाणे योग्य होते ते धर्माच्या मुलांने मान्य केले होते. आता त्यात वाद नसावा असे कृष्ण बजावतो युधिष्ठीराला व तो विषय तेथे संपतो.

त्यानंतर मनातल्या मनात खूष झालेला भिम युधिष्ठीराला नमस्कार करून त्याच्यापुढे नम्रपणे उभा होतो. बोलतो, अहो राजे, आजपासून हि पृथ्वी तुमची झाली आहे. आता राज्यकारभाराचे पहावे. आपला कोणी शत्रू राहीलेला नाही. **शत्रू कसा संपवावा ते युद्धशास्त्र ठरवते नितीशास्त्र नाही हे आपण लक्षात घ्याल तर बरे होईल. कौरवानी किती नितिशास्त्र पाळले ते मला सांगा. चांगुलपणा जो नितिशास्त्राचा गाभा आहे तो एकतर्फी असू शकत नाही. तो दोनही बाजूंने सारखाच असावा लागतो. कौरवांचे कोणते कृत्य तुमच्या नितिशास्त्रानुसार वैध होते ते मला सांगा. आपण जे तथाकथित नैतिकतेचे अवडंबर नेहमी माजवता व त्यामुळे आम्हा भावंडाना अनन्वीत हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या त्याचे काय समर्थन आहे तुमच्या कडे ते मला सांगा.**

युधिष्ठीर गप्प असतो नंतर थोडा सहज होतो, बोलतो, "शत्रूत्व संपले हे चागले झाले. आपण सगळे कृष्णाच्या मार्गदर्शनाने केले म्हणून त्याचा त्या राज्यावर सारखाच हक्क असेल. तू जे केलेस त्यामुळे तू द्रौपदीचे ऋण फेडले आहेस हेसुद्धा महत्वाचे आहे. तू म्हणाला होतास कीं, तू सगळे कौरव ठार मारशिल ते खरे केलेस हे सगळे तितकेच जरूरीचे होते हे मी मान्य करतो. आता आपण नव्या राज्य कारभारावर लक्ष केंद्रीत केले पाहिजे.

## - सल्य पर्व एक संपले -

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७७ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे ४० खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी

तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चाने शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे,

माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा

मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळिराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता,

जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यंत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.

esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद,